CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १२ जून २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १९४ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# भारताच्या जहाजावर अमेरिकेचा हल्ला

## ४८ तासांत तिसऱ्यांदा आगळिक; २० खलाशांची सुखरूप सुटका



क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर भारतीय जहाजाला लागलेली आग

◆ **मस्कत, ११ जून**

इराणकडून होत असलेल्या प्रखर विरोधामुळे जगभरात नाचक्की होत असल्याचे पाहून चवताळलेल्या अमेरिकेने आता मालवाहू जहाजांना लक्ष्य करणे सुरू केले आहे. एकीकडे भारताला मित्र म्हणविणाऱ्या अमेरिकेने दुसरीकडे आगळीक करीत गुरूवारी भारताच्या आणखी एका जहाजावर क्षेपणास्त्राने मारा केला. मात्र, ओमानच्या बचावपथकाने सर्व २० खलाशांची सुखरूप सुटका केली. या घटनेचा भारताने तीव्र शब्दात निषेध केला आहे.

ओमानच्या शिनास बंदराजवळ 'एमटी जलवीर' या भारतीय मालवाहू जहाजावर अमेरिकेच्या नौदलाने हेलफायर क्षेपणास्त्राचा मारा केला. यानंतर जहाजाला आग लागली. भारतीय खलाशी असलेल्या जहाजावर अमेरिकेने ४८ तासात केलेला तिसरा हल्ला आहे.

भारतीय खलाशी असलेल्या जहाजांनी सूचनांचे पालन केले नसल्याने क्षेपणास्त्राचा मारा केल्याचे अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने निवेदनात म्हटले आहे. होर्मुझ जलमार्गात या जहाजांनी निर्धारित मार्गाचा अवलंब केला नाही. नाकाबंदीचे उल्लंघन करून त्यांनी सूचनांचे उल्लंघन केले, त्यामुळे अमेरिकेच्या नौदलाने क्षेपणास्त्राचा मारा करावा लागला. नाकाबंदी मोडणाऱ्या कोणत्याही देशाच्या जहाजांवर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. *(वृत्तसंस्था)*

### परराष्ट्र मंत्रालयाकडून घटनेचा निषेध

**साप्ताहिक पत्रकार परिषदेला संबोधित करताना, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी मध्यपूर्वेतील सामुद्रधुनीत व्यापारी जहाजांवर होणाऱ्या हल्ल्याचा निषेध केला. बुधवारी झालेल्या हल्ल्याचा निषेध नोंदवण्यासाठी अमेरिकेच्या सीडीए (प्रभारी राजदूत) यांना बोलावून उत्तर मागितले आहे.**


# सर्वच देशांसाठी होर्मुझ बंद

## अमेरिका-इराण यांचा परस्परांवर क्षेपणास्त्रांचा मारा

◆ **तेहरान, ११ जून**

इराण-अमेरिका यांच्यात सुरू असलेला संघर्षविराम पूर्णपणे संपुष्टात आला असून, गुरुवारी दोन्ही देशांनी परस्परांवर हल्ले चढवल्याने मध्यपूर्वेत पुन्हा युद्धाचा भडका उडाला आहे. अमेरिकेच्या हल्ल्याने संतप्त झालेल्या इराणने होर्मुझ जलमार्ग सर्व देशांच्या जहाजांसाठी बंद करत असल्याची घोषणा केल्याने जगासमोर पुन्हा इंधनाचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

होर्मुझ खाडीत कोणत्याही देशाच्या जहाजाने प्रवेश केल्यास जिवानीशी मारले जाल, असा इशारा इराणने दिला आहे. अमेरिकेचे वायुदल आणि नौदलाने होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ इराणच्या हवाई संरक्षण प्रणाली,



जमिनीवरील नियंत्रण केंद्रे आणि रडार प्रणालींना लक्ष्य केले. लढाऊ विमानांनी बंदर अब्बास, सिरिक, किश्म बेट आणि हेंगम बेट यासह अनेक ठिकाणांना लक्ष्य केले. दक्षिण इराणच्या अनेक भागांमध्ये स्फोट झाले, यात ५० पेक्षा अधिक लोक जखमी असल्याची माहिती इराणच्या वृत्तवाहिनीने दिली. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर लगेचच इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) जॉर्डन, कुवेत आणि बहरीनमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्रे आणि आत्मघाती ड्रोनचा मारा केला. याशिवाय होर्मुझ जलमार्गातील अमेरिकेच्या नौदलावरही हल्ले चढवले. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने आत्मसंरक्षणात्मक हल्ले केल्याची माहिती दिली. *(वृत्तसंस्था)*

### तेलसाठे ताब्यात घेणार : ट्रम्प



राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, आम्ही इराणला करार करण्यासाठी अनेकदा संधी दिली, मात्र त्यांनी दुर्लक्ष केले. अमेरिकेचे सैन्य काही तासातच इराणवर मोठे हल्ले करून त्यांचे तेल साठे ताब्यात घेईल. इराणची अवस्था व्हेनेझुएलासारखी होईल. आम्ही खार्ग बेट आणि इतर तेल संबंधित पायाभूत सुविधा ताब्यात घेऊ आणि त्यांच्या तेल आणि वायू बाजारावर नियंत्रण मिळवू.

# संघभावनेमुळेच देशाच्या विकासाला गतीः पंतप्रधान

## नागरिकांचा समग्र विकास सुनिश्चित करणार

◆ **नवी दिल्ली, ११ जून**

केंद्र आणि विविध राज्य सरकारे संघवादाच्या भावनेने काम करत देशाच्या विकासाला गती देत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी येथे केले.



राष्ट्रपती भवन परिसरातील एका सभागृहात नीती आयोगाच्या संचालन समितीच्या ११ व्या बैठकीला मोदी संबोधित करत होते. केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल आणि नीती आयोगाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी सगळ्यांची साथ आणि सहकार्य आवश्यक आहे, असे मोदी म्हणाले.

विकसित भारत २०४७ साठी समावेशी मानव विकास ही यावर्षीच्या नीती आयोगाच्या बैठकीची संकल्पना आहे. देशातील प्रत्येक नागरिकाचा समग्र विकास आणि कल्याण सुनिश्चित करणे, मग ती व्यक्ती कोणत्याही वयाची, धर्माची, भाषेची, क्षेत्राची, लिंगाची आणि कोणत्याही सामाजिक आर्थिक पार्श्वभूमीची असो त्याचे कल्याण करणे, हा या संकल्पनेचा उद्देश आहे.

केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात उत्कृष्ट असा समन्वय स्थापित करणे, तसेच समावेशी आणि टिकाऊ विकासासाठी मार्गदर्शक तत्व तयार करणे, हा या बैठकीचा उद्देश असल्याचे नीती आयोगाने स्पष्ट केले. कौशल विकास आणि देशाच्या आर्थिक विकास आराखड्यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

समावेशी मानव विकासासाठी चार घटकांवर विशेष लक्ष देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला, यात मजबूत मानवी भांडवल आणि भविष्यासाठी तयार कौशल, उत्पादक रोजगार आणि उद्यमिता आधारित विकास, स्वास्थ आणि पोषणासह चांगला जीवनस्तर आणि सर्वांसाठी समान संधी आणि प्रतिष्ठा हे ते चार घटक आहेत. *(वृत्तसंस्था)*

### डेटाआधारित निर्णयप्रणाली आवश्यक

**विकासाच्या योजनांचा फायदा समाजातील सर्व वर्गांना मिळाला पाहिजे, तसेच राज्यांच्या विकासाच्या दृष्टीची सांगड विकासाच्या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी घातली पाहिजे, याची आवश्यकता या बैठकीत व्यक्त करण्यात आली. विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सुशासन, डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर( डीपीआय) , विविध विभागांसोबत समन्वय, भागिदारी मॉडेल तसेच डेटाआधारित निर्णयप्रणाली आवश्यक असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले.**

## विचारपुष्प



शिल्पकार ओल्या मातीचा गोळा घेतो, हातात एक छोटे साधन घेऊन त्या गोळ्यास इच्छित मूर्तीचा आकार देण्यासाठी त्या साधनाने गोळ्यातील अनावश्यक भाग कोरून कोरून काढून टाकतो. ओल्या मातीतून हळूहळू मूर्ती तयार करतो. आपण सुद्धा त्या शिल्पकाराप्रमाणेच विचार केला पाहिजे आणि कार्य केले पाहिजे.

**स्व. सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### रुपयाच्या घसरणीने शेअर बाजारातही मंदीचे सावट

**मुंबई :** जागतिक बाजारातील मंदीचे संकेत आणि वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर, भारतीय शेअर बाजारात गुरुवारी प्रचंड चढ-उतार पाहायला मिळाले. चौफेर विक्रीच्या दबावामुळे दोन्ही प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. मात्र, या घसरणीतही फार्मा, खाजगी बँका आणि मीडिया क्षेत्रातील शेअर्सनी चांगली कामगिरी करत बाजाराला काहीसा सावरण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेतील वाढती महागाई आणि मध्यपूर्वेतील वाढता संघर्ष यांमुळे जागतिक पातळीवर चिंतेचे वातावरण होते. याचे थेट पडसाद भारतीय बाजाराच्या सुरुवातीवर उमटले. बाजार उघडताच विक्रीचा जोर वाढल्याने निफ्टी २३,१०० च्या खाली घसरला. या सुरुवातीच्या धक्क्यानंतर बाजाराने पुन्हा उभारी घेतली. काही बड्या शेअर्समध्ये गुंतवणूकदारांनी खरेदीचा ओघ वाढवल्याने निफ्टीने २३,३०० चा टप्पा ओलांडला.

### आरबीआयकडून एनबीएफसी कंपन्यांचे परवाने रद्द

**नवी दिल्ली :** भारतीय रिझर्व्ह बँकेने नियमांचे उल्लंघन आणि आर्थिक अनियमितता आढळल्यानंतर देशभरातील तब्बल १३५ बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांचे (एनबीएफसी) नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले आहे. पश्चिम बंगालपासून मुंबईपर्यंत अनेक कंपन्यांचा या यादीत समावेश असल्याने वित्तीय क्षेत्रात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

एनबीएफसी या बँकांप्रमाणेच कर्ज देणे, गुंतवणूक करणे आणि आर्थिक सेवा पुरविण्याचे काम करतात; मात्र त्यांच्याकडे पूर्ण बँकिंग परवाना नसतो. यामुळे त्या ग्राहकांकडून बचत किंवा चालू खाती स्वीकारू शकत नाहीत तसेच बँकांप्रमाणे पेमेंट सेटलमेंट प्रणालीही त्यांच्याकडे नसते. आरबीआयच्या या निर्णयाचा मुख्य उद्देश सामान्य नागरिकांचे फसवणुकीपासून संरक्षण करणे हा आहे. नियमभंग करणाऱ्या कंपन्यांना बाजारातून बाहेर काढून आर्थिक प्रणाली अधिक सुरक्षित करण्याचा प्रयत्न या कारवाईतून करण्यात आला आहे.

### ममता बॅनर्जींना न्यायालयाचा झटका

**कोलकाता, ११ जून -**

पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेता नियुक्तीसंदर्भात कलकत्ता उच्च न्यायालयाने अध्यक्षांच्या निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. विधानसभा अध्यक्षांच्या ऋतब्रता बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेता नियुक्त करण्याच्या निर्णयाविरोधात ममता बॅनर्जींच्या गटाने न्यायालयात धाव घेतली. परंतु, न्यायालयाकडून कोणताही दिलासा मिळाला नाही. ममता बॅनर्जींसाठी हा मोठा धक्का म ानला जात आहे. 'तृणमूल'मध्ये फूट पडल्यानंतर विधानसभा अध्यक्ष रथींद्रनाथ बोस यांनी ५८ बंडखोर आमदारांचे नेतृत्व करणाऱ्या गटाचे नेते म्हणून ऋतब्रता बॅनर्जी यांना मान्यता देत विरोधी पक्षनेतेपदाचा दर्जा दिला होता. कलकत्ता उच्च न्यायालयाने एका बंडखोर आमदाराला विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता देण्याच्या प्रक्रियेवर गंभीर चिंता व्यक्त केली. जेव्हा आमदाराला आधीच पक्षातून काढून टाकण्यात आले आहे, तेव्हा मूळ राजकीय पक्षाच्या मंजुरीशिवाय असा निर्णय घेतला जाऊ शकतो का, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला.

# सहा नागांच्या हत्येने मणिपूर पेटले

## शेकडो लोकांचा जमाव, सुरक्षा दलांनी सोडला अश्रुधूर

◆ **इंफाळ, ११ जून**

मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्याच्या सर्व प्रयत्नांनंतरही रक्तरंजित संघर्ष कमी होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. नुकत्याच झालेल्या सहा जणांच्या निर्घृण हत्येने राज्यात आधीच धुमसत असलेल्या आगीत तेल ओतले आहे. या घटनेचे वृत्त पसरताच जवाहरलाल नेहरू वैद्यकीय विज्ञान संस्थेबाहेर शेकडो लोक जमले. तणाव वाढत असल्याने सुरक्षा दलांनी जमावाला पांगवण्यासाठी अश्रुधूर सोडला.

लेलॉन वायफेई गावातून १३ मे २०२६ रोजी सहा नागा लोकांचे कुकी सशस्त्र गटाकडून अपहरण करण्यात आले होते. त्या सर्वांची हत्या करण्यात आल्याचे बुधवारी उघड झाले. सुरक्षा दलांनी मणिपूरच्या कांगपोकपी जिल्ह्यातून सहा जणांचे मृतदेह ताब्यात घेतले. या घटनेमुळे राज्यात पुन्हा तणाव निर्माण झाला असून या हत्याकांडाचा निषेध करण्यासाठी गुरुवारी शेकडो लोक रस्त्यावर उतरले होते.

या घटनेच्या निषेधार्थ नागांची सर्वोच्च संस्था युनायटेड नागा कौन्सिलने नागा भागांमध्ये गुरुवारी २४ तासांच्या बंदची घोषणा केली. त्यानुसार नागा समुदायाने रस्त्यावरुन उतरुन कडकडीत बंद पाळला. बंददरम्यान, सेनापती जिल्ह्यातील लियांगमै ताफौ परिसरातील नागा पीपल्स फ्रंटच्या कार्यालयाला आग लावण्यात आली. या संघटनेने राज्याचे उपमुख्यमंत्री नेमचा किपगेन यांना पदावरून हटवण्याची मागणीही केली आहे. *(वृत्तसंस्था)*

### कामजोंगमध्ये गोळीबार, अनेक घरांना आग

मणिपूरमधील कामजोंग जिल्ह्यातील कुलतूह कुकी गावात गुरुवारी सकाळी संशयित बंडखोरांनी दोन लोकांची गोळ्या घालून हत्या केली. हल्लेखोरांनी सकाळी सुमारे ४:५५ वाजता अंदाधुंद गोळीबार केला. तसेच गावातील अनेक घरांना आग लावण्यात आली. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण आहे. सुरक्षा दलांना तैनात करण्यात आले असून हल्लेखोरांचा शोध घेण्यात येत आहे.

# अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक; एक ठार, एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**

अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक बसून झालेल्या अपघातात दुचाकीवरील एकजण ठार तर एकजण जखमी झाल्याची घटना गुरुवार, दि.११ जून २०२६ रोजी सोलापूर-विजापूर महामार्गावर नांदणी टोलनाक्याजवळ घडली. शाम सिध्दाराम भोसले (वय-४५, रा.भिमाईनगर, विजापूर रोड, सोलापूर) असे मयताचे नाव आहे.

शाम भोसले हे गुरुवारी आपल्या सहकाऱ्यासोबत नांदणीच्या पुढे सेंट्रींगच्या कामाला गेले होते. तेथून सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास दुचाकीच्या पाठीमागे बसून सोलापूरकडे येत असताना नांदणी टोल नाक्याच्या पुढे ब्रीज जवळ एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली.

यात ते बेशुध्द झाले होते. त्यांचा भाचा सुमित चौधरी यांनी भोसले यांना बेशुध्दावस्थेत शासकीय शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यातील जखमीला उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# एसटी कर्मचाऱ्यांचा पुन्हा संपाचा इशारा

## २९ जूनपासून लालपरीला लाल सिग्नल?

◆ **मुंबई, ११ जून**

पावसाळ्याच्या सुरुवातीलाच राज्यातील सामान्य प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची चिन्हे आहेत. आपल्या विविध प्रलंबित मागण्या मान्य करून घेण्यासाठी एसटी कामगार संयुक्त कृती समितीने पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या २९ जूनपासून राज्यभरात बेमुदत धरणे आणि चक्का जाम आंदोलन करण्याचा थेट इशारा कामगार संघटनांनी दिला आहे, ज्यामुळे राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पुन्हा एकदा कोलमडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

एसटी कामगारांच्या विविध संघटनांच्या संयुक्त कृती समितीची ११ जून रोजी एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीतच आंदोलनाचे हत्यार उपसण्याचा निर्णय घेण्यात आला. एसटी कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांसारखीच



वेतनश्रेणी लागू करावी, थकबाकीसह महागाई भत्ता देण्यात यावा आणि कंत्राटी पद्धतीची भरती तत्काळ थांबवावी, या त्यांच्या मुख्य मागण्या आहेत. याव्यतिरिक्त, एसटी महामंडळासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात वेगळी आर्थिक तरतूद असावी, महामंडळाने स्वतःच्या मालकीच्या ई-बसेस घ्याव्यात आणि कामगारविरोधी धोरणे व कायदे मागे घ्यावेत, असा आग्रहदेखील समितीने धरला आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### तीन टप्प्यांत होणार आंदोलन

- पहिला टप्पा (१५ जून): राज्यातील सर्व आगार आणि विभागीय कार्यालयांबाहेर घंटानाद तसेच महाआरती करून सरकारचे लक्ष वेधले जाईल.
- दुसरा टप्पा (२२ जून): सर्व युनिट पातळीवर कर्मचाऱ्यांच्या द्वार सभांचे आयोजन केले जाईल.
- तिसरा टप्पा (२९ जून): यानंतरही शासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास, २९ जूनपासून मुंबईसह राज्यभरातील एसटीच्या प्रमुख केंद्रांवर आणि कार्यशाळांसमोर बेमुदत धरणे आंदोलन पुकारले जाईल.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# व्याप्त काश्मिरातील आंदोलक रावळकोटकडे

## सुरक्षा दलाचा विरोध डावलला, पाकिस्तानी सरकार, लष्कराविरोधात जनतेचा उठाव

**मुझफ्फराबाद, ११ जून**

सुरक्षा दलाच्या विरोधाला डावलत जॉइंट अवामी ॲक्शन कमिटीच्या (जेसीसीए) नेतृत्त्वात व्याप्त काश्मीरात आंदोलनाची धग कायम असून, गुरुवारी दीड लाखांपेक्षा अधिक आंदोलकांनी प्रलंबित मागण्यांसाठी मुझफ्फराबाद येथून रावळकोटकडे कूच केले. आंदोलकांनी याला जनतेचा उठाव संबोधले आहे.

पाकिस्तानी लष्कराकडून आंदोलन दडपण्यासाठी बळाचा वापर सुरू असतानादेखील लाखो लोक रावळकोटकडे निघाले. या आंदोलनाने आता जनतेच्या उठावाचे स्वरूप घेतले आहे. आंदोलनात आतापर्यंत शेकडो लोकांचा मृत्यू आणि चारशेपेक्षा अधिक जखमी झाले असतानाही जनतेचे मनोधैर्य अढळ आहे. सुरक्षा दलांच्या कठोर कारवाईला न जुमानता, दीड लाखांहून अधिक आंदोलकांनी रावळकोटच्या दिशेने मोर्चा काढला. विधानसभेवर काढलेल्या मोर्चात महिला, मुले, विद्यार्थ्यांचाही समावेश असल्याचे पाकिस्तानी सरकारच्या अडचणी वाढल्या आहे. विशेष असे की, पीठ, विजेची वाढलेली बिले आणि मूलभूत सुविधांसाठी सुरू झालेल्या या आंदोलनाचे आता जनतेच्या उठावात रूपांतर झाले आहे. इस्लामाबाद आणि पाकिस्तानी लष्करी यंत्रणेविरोधात लोकांचा संताप शिगेला पोहोचला आहे. हातात बॅनर घेतलेले आंदोलकांचे मोठे गट रावळकोट, बाग, हट्टियान बाला, कोटली, मीरपूर, सुधनोटी, धीरकोट, दाद्याल आणि मुझफ्फराबादच्या रस्त्यांवर उतरले आहे.





### सुरक्षा दलाने महामार्ग रोखले

आंदोलकांना मुझफ्फराबादला जाण्यापासून रोखण्यासाठी सुरक्षा दलाने प्रमुख महामार्ग अडवले. वाहने रोखण्यासाठी मोठी झाडे तोडून रस्त्यांवर ठेवण्यात आली. असे असूनही, जमाव पर्यायी मार्गांनी पुढे जात आहे. लष्कराने पुन्हा बळाचा वापर केला, तर व्याप्त काश्मीरची संपूर्ण पाकिस्तानात पोहोचेल असा इशारा जेसीसीएने दिला आहे.

### गर्भवती महिला, मुलांवर बेछूट गोळीबार

जॉईंट आवामी ॲक्शन कमिटीने (जेएएसी) व्याप्त काश्मिरात पुकारलेले आंदोलन आणि बंद बळाच्या जोरावर चिरडून टाकण्यासाठी पाकिस्तानी लष्कर तैनात करण्यात आले. सैनिकांनी आंदोलकांवर गोळीबार केला, यात १०० पेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाला, तर २०० पेक्षा जास्त जखमी आहेत. मृतकांमध्ये सात गर्भवती महिला आणि २२ अल्पवयीन मुलांचाही समावेश असल्याचा आरोप आंदोलनाचे नेतृत्व करणारे जेएएसीचे नेते शौकत नवाज मीर यांनी केला. संवाद साधण्याऐवजी पाकिस्तानी सरकारने निःशस्त्र लोकांवर गोळीबाराचा मार्ग केल्याचा आरोप त्यांनी केला.

**स्वातंत्र्याची मागणीचा जोर**

व्याप्त काश्मीरच्या रावळकोट, मुझफ्फराबाद, कोटली, भिम्बेर, दाद्याल, पालंद्री आणि सुधनोटी येथे हजारो लोक सरकार आणि लष्करविरोधी घोषणा देत रस्त्यावर उतरले. त्यांनी व्याप्त काश्मीरला स्वातंत्र्य करण्याची मागणी केली.

**चार नेत्यांवर एक कोटींचे बक्षीस**

पाकिस्तान सरकारने आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या जेएएसीच्या चार नेत्यांवर एक कोटी रुपयांचे बक्षीस ठेवले आहे. तसेच, शौकत नवाज मीर यांच्यासह इतर नेत्यांवर देशद्रोहाची कारवाई सुरू केली. सध्या सर्व शहरी आणि ग्रामीण भागात बंद सुरू असून वकील संघटना यात सहभागी झाल्या आहेत. (वृत्तसंस्था)

# नटराजन नामांकन वादावर आज होणार सुनावणी

## निवडणूक आयोग घेत आहे कायदे पंडितांचा सल्ला


**नवी दिल्ली, ११ जून**

देशभरात चर्चेचा विषय बनलेल्या मीनाक्षी नटराजन यांचे नामनिर्देशन रद्द करण्याच्या प्रकरणाची आता सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. काँग्रेसने गुरुवारी पहाटे सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सकाळच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी घेण्यास सहमती दर्शवली आहे.



काँग्रेस नेत्या मीनाक्षी नटराजन यांनी त्यांचे राज्यसभा नामनिर्देशन अर्ज फेटाळण्याच्या निर्णयाला आव्हान सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय शुक्रवारी सुनावणी घेणार आहे. ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि अतुल एस. चांदुरकर यांच्या न्यायासनासमोर हे प्रकरण तातडीचे असल्याचे सांगून लवकर सुनावणी किंवा अंतरिम आदेशाची मागणी केली. न्यायालयाने त्यांच्या युक्तिवादाची दखल घेत हे प्रकरण उद्याच्या सुनावणीसाठी सूचीबद्ध केले. (वृत्तसंस्था)

### निवडणूक अधिकाऱ्याचा निर्णय पक्षपाती




या याचिकेत असा आरोप करण्यात आला आहे की, निवडणूक अधिकाऱ्याचा निर्णय बेकायदेशीर, मनमानी आणि पक्षपाती आहे. तसेच, नामांकन फेटाळणारा आदेश तात्काळ रद्द करण्याची मागणीही करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी त्यांची याचिका ऐकण्यास सहमती दर्शवली. परंतु, असेही म्हटले की, निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक याचिका दाखल करणे हाच खरा कायदेशीर उपाय आहे.

# निवृत्त न्या. गौतम पटेल यांना ब्रिटनमध्ये मिळाली सुरक्षा

## दाऊदी बोहरा समाजावरील ऐतिहासिक निकालामुळे धमक्या

**मुंबई, ११ जून**

मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्या. गौतम पटेल यांनी दाऊदी बोहरा समाजातील उत्तराधिकार वादावर २०२४ मध्ये दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाच्या मुद्यावर त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना सातत्याने येणाऱ्या धमक्यांच्या पृष्ठभूमीवर ब्रिटनमध्ये सुरक्षा देण्यात आली, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी बुधवारी दिली.

ब्रिटनच्या दौऱ्यावर असलेले भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी भारतीय उच्चायुक्त कुमारन् यांच्याकडे हा विषय मांडल्यानंतर दुसऱ्याच दिवशी हे पाऊल उचलण्यात आले.



कुमारन् यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून न्या. गौतम पटेल आणि त्यांच्या कुटुंबाला पुरेसे संरक्षण मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

हा प्रकार म्हणजे प्रशासन आणि न्यायव्यवस्थेवरील हल्ला आहे. गुन्हेगारांच्या हास्यास्प मागण्यांसमोर आपण कधीही झुकणार नाही, असा निर्धार. न्या. गौतम पटेल यांनी वृत्तसंस्थेसोबत बोलताना व्यक्त केला.

न्या. पटेल आणि त्यांच्या कुटुंबीयांना मागील १० महिन्यांत अनेक निनावी धमकीची पत्रे मिळाली आहेत. ५ जून रोजी न्या. पटेल यांच्या मुलीच्या लंडनमधील निवासस्थानी जर्मनीचा पोस्टल शिक्का असलेले धमकीपत्र पोहोचले, अशी माहिती त्यांच्या कौटुंबिक सूत्रांनी दिली.

न्या. पटेल यांनी युट्यूबवर एक व्हिडीओ पोस्ट करून आपल्या निकालाबद्दल माफी मागावी आणि तो निकाल दबाव व बळजबरी झाल्याने दिला, असे सांगून तो मागे घ्यावा, अशी मागणी धमकी देणाऱ्यांनी केली आहे.

आपला निकाल मागे घेणारा व्हिडीओ युट्यूबवर प्रसिद्ध करण्याची मागणी करणाऱ्या धमकीच्या पत्रांमधील हास्यास्पद मागण्यांसमोर झुकणार नाही, असे न्या. पटेल यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# अभिषेक अहंकारी; त्याच्यामुळेच पक्ष संपला

## कल्याण बॅनर्जी म्हणाले, ममतांनी दोघांपैकी एकाची निवड करावी

**नवी दिल्ली, ११ जून**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहे. पक्षनेतृत्वावर नाराजी व्यक्त करत अनेकांनी बंड केले आहे. तृणमूल आमदारांनंतर आता राज्यसभा आणि लोकसभा खासदारांनीही बंडाचे झेंडा फडकावला आहे. आता तृणमूलचे ज्येष्ठ नेते कल्याण बॅनर्जी यांच्या आरोपांमुळे पक्ष मुळापासून हादरला आहे.

कल्याण बॅनर्जी यांनी ममता बॅनर्जींचे पुतणे अभिषेकविरोधात थेट मोर्चा उघडत ते अहंकारी असून त्यांच्यामुळेच पक्ष संपला, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

बनावट सही प्रकरणात कल्याण बॅनर्जी अभिषेक बॅनर्जी यांचे वकील म्हणून न्यायालयाच्या सुनावणीला उपस्थित राहत आहेत. मात्र, सुनावणीदरम्यान अभिषेक बॅनर्जी अनुपस्थित असल्याने त्यांनी पक्षप्रमुख ममता बॅनर्जींना कल्याण किंवा अभिषेक या दोघांपैकी एकाची निवड करावी, असे आवाहन केले आहे.

कल्याण बॅनर्जी पुढे म्हणाले, शुक्रवारी अवकाशकालीन न्यायासनाचे कामकाज सुरू होते. मी दिवसभर वाट पाहिली, पण खटल्याची सुनावणी झाली नाही. त्यानंतर, मी न्यायालयाच्या निदर्शनास आणले असता न्यायाधीशांनी सांगितले की, खटल्याची सुनावणी बुधवारी होईल. काही दिवसापूर्वी सीआयडीने अभिषेक बॅनर्जी यांच्या घराची आणि दीदींच्या कार्यालयाची झडती आहे. मी दिल्लीहून विमानाने आलो आणि तिथेही गेलो होतो. झडतीच्या वेळी मी तिथे उपस्थित होतो. गुरुवारी सकाळी मी न्यायमूर्ती कौशिक चंदा यांच्या निदर्शनास हे प्रकरण आणले आणि सांगितले की, ही झडती बेकायदेशीर होती. (वृत्तसंस्था)



### न विचारता खटला दुसऱ्याकडे सोपवला

कल्याण बॅनर्जी पुढे म्हणाले, गुरुवारी दुपारी सुमारे साडेबारा वाजता एक वकील आले. त्यांनी मला सांगितले की झडतीसंदर्भात एक वेगळी रिट याचिका दाखल करण्यात आली आहे आणि ती एक वरिष्ठ वकील हाताळतील. मी विचारलं, जर तुम्ही हा खटला आधीच दाखल केला होता, तर आमच्याशी चर्चा का केली नाही? हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. मी संपूर्ण रात्र खटल्याची तयारी करण्यात घालवली. आता तुम्ही मला न विचारता खटल्याची जबाबदारी दुसऱ्याकडे सोपवली. हा चुकीचा प्रकार आहे, असेही ते म्हणाले.

# एनएसजीने निकामी केले स्फोटक

**ठाणे, ११ जून**

ठाणे जिल्ह्यात जमिनीखाली अंशतः गाडलेला एक संशयास्पद धातूचा गोळा न फुटलेला स्फोटक असल्याचे निष्पन्न झाले. यामुळे तो निकामी करण्यासाठी प्रशासनाने नॅशनल सिक्युरिटी गार्डची मदत घेतली, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली.

ही घटना बुधवारी मीरा-भाईंदर भागातील उत्तन परिसरात घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका वाटसरूचा पाय चुकून एका कठीण वस्तूला लागला. त्याने पाहणी केली असता, त्याला जमिनीखाली अंशतः गाडलेला धातूचा गोळा आढळला, असे उत्तन सागरी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुभाषचंद्र एन. मारकड यांनी सांगितले. हा धातूचा गोळा म्हणजे न फुटलेले स्फोटक असल्याचे नंतर स्पष्ट झाले, असे त्यांनी सांगितले. लष्करी स्फोटक साधन, जे डागले, टाकले किंवा प्रक्षेपित केले गेले होते, परंतु अपेक्षेप्रमाणे त्याचा स्फोट झाला नाही. असे स्फोटक नंतरही कधीही फुटू शकते आणि ते अनेकदा धोकादायक असते. या व्यक्तीने त्वरित पोलिसांना कळवले आणि पोलिसांनी बॉम्ब शोधक व नाशक पथकाला पाचारण केले. यानंतर बीडीडीएसने नॅशनल सिक्युरिटी गार्डची मदत घेतली. नॅशनल सिक्युरिटी गार्डचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी ते न फुटलेले स्फोटक निकामी केले, असे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ‘धमाल-४’ चित्रपट प्रदर्शन तारखेत बदल

**मुंबई** : कॉमेडी फ्रेंचायझी ‘धमाल ४’ चित्रपटाच्या प्रदर्शन तारखेत बदल करण्यात आला आहे. आधी हा चित्रपट १७ जुलैला प्रदर्शित होणार होता, पण आता तो एक आठवडा आधी १० जुलैला चित्रपटगृहांमध्ये येण्याची तयारी आहे. मात्र, निर्मात्यांकडून अद्याप घोषणा करण्यात आलेली नाही. चित्रपटाचे दिग्दर्शन इंद्र कुमार यांनी केले आहे. यात फ्रेंचायझीचे जुने कलाकार अजय देवगण, रितेश देशमुख, अर्शद वारसी, संजय मिश्रा आणि जावेद जाफरी पुन्हा एकदा दिसणार आहेत. चित्रपटाची निर्मिती टी-सीरीज, देवगन फिल्म्स, मारुती इंटरनॅशनल आणि पॅनोरमा स्टुडिओजच्या बॅनरखाली करण्यात आली आहे.




### ‘देऊळ बंद’ सर्वाधिक कमाई करणारा चौथा चित्रपट



**मुंबई** : प्रवीण तरडे दिग्दर्शित ‘देऊळ बंद २’ हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घालत आहे. २१ मे रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने अवघ्या २० दिवसांत तब्बल ६२ कोटी रुपयांची नेट कमाई करत मराठी चित्रपटसृष्टीत नवा विक्रम केला आहे. विशेष म्हणजे या चित्रपटाने रितेश देशमुखच्या सुपरहिट ‘वेड’ चित्रपटाची कमाई मागे टाकत सर्वाधिक कमाई करणाऱ्या मराठी चित्रपटांच्या यादीत चौथे स्थान पटकावले आहे. स्नेहल तरडे, मोहन जोशी यांच्यासह दमदार कलाकारांची फौज असलेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. केवळ दहा कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झाला आहे.

### ‘अल्फा’चा टीझर प्रदर्शित

**मुंबई** : आलिया भट्ट अभिनीत व्हायआरएफ स्पाय युनिव्हर्समधील आगामी चित्रपट ‘अल्फा’ चा टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे. टीझर १ मिनिट ५५ सेकंदांचा आहे. यात आलिया जबरदस्त ॲक्शन करताना दिसत आहे. टीझरमधील कथा एका तरुण महिलेभोवती फिरते. ही भूमिका आलिया साकारत आहे. हा यश राज फिल्म्सच्या स्पाय युनिव्हर्समधील सातवा आणि महिला मुख्य भूमिका असलेला पहिला चित्रपट आहे. आलिया भट्ट, शरवरी वाघ, बॉबी देओल आणि अनिल कपूर चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकांमध्ये आहेत. हृतिक रोशन, या युनिव्हर्समधील वॉर चित्रपटातील कबीरच्या भूमिकेत कॅमिओ भूमिका साकारणार आहे. चित्रपट ३ जुलै रोजी प्रदर्शित होण्यासाठी नियोजित आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन शिव रवैल यांनी केले आहे.



# ३० किलोहून अधिक हेरॉईन जप्त; सहा अटकेत

**चंदीगड, ११ जून**

सहा जणांना अटक करून त्यांच्या ताब्यातून ३० किलोहून अधिक हेरॉईन जप्त करून सीमापार अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या एका टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे, असे पंजाब पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने गुरुवारी सांगितले. हे आरोपी दुबईस्थित एका तस्कराच्या संपर्कात होते. हा तस्कर सीमेपलीकडून हेरॉईनचा पुरवठा करण्यास मदत करत होता, असे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी एक्सवरील एका पोस्टमध्ये सांगितले.

अमृतसरमधील छहेर्ता पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या नेटवर्कमधील इतर साथीदारांची ओळख पटवणे, आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेणे, संभाव्य हवाला कनेक्शन उघड करणे तसेच या तस्करीच्या साखळीतील मागील आणि पुढील दुवे (बॅकवर्ड आणि फॉरवर्ड लिंकेजेस) शोधून काढण्यासाठी पुढील तपास सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# मुलांच्या समाज माध्यम वापरावर मर्यादा

## कॅनडा सरकारचे पाऊल; डिजिटल सुरक्षा विधेयक सादर

**ओटावा, ११ जून**

कॅनडाने डिजिटल सुरक्षा विधेयक सादर केले आहे. या विधेयकानुसार १६ वर्षांखालील मुलांसाठी समज माध्यमाचा वापर मर्यादित केला जाईल; मात्र, जर कंपन्यांनी अल्पवयीन वापरकर्त्यांसाठी पुरेशी सुरक्षा उपाययोजना केल्याचे सिद्ध केले, तर त्यांना यातून सूट मिळवण्याची मुभा असेल.

कॅनडाचे ओळख आणि संस्कृती मंत्री मार्क मिलर यांनी बुधवारी सादर केलेले बिल हे ऑनलाइन धोक्यांचा सामना करण्यासाठी कायदेशीर चौकट तयार करण्याच्या दिशेने कॅनेडियन सरकारने केलेले एक अलीकडील पाऊल आहे. अधिकृत निवेदनानुसार, प्रस्तावित कायद्याद्वारे चॅटजीपीटी सारख्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स चॅटबॉट सेवांचे नियमन केले जाईल आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म्ससाठी सुरक्षेच्या नवीन अटी लागू केल्या जातील. कॅनडामध्ये नुकसान झाल्यानंतर त्यावर उपाययोजना करणारे कायदे अस्तित्वात असले, तरी नुकसान होऊच नये यासाठी ऑनलाइन सेवांवर कोणतीही बंधनकारक तरतूद सध्या नाही, असे निवेदनात म्हटले आहे. प्रस्तावित ‘सेफ सोशल मीडिया ॲक्ट’द्वारे ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यामध्ये समाज माध्यम सेवा आणि एआय चॅटबॉट पुरवठादारांना नुकसान होण्यापूर्वीच ते रोखण्यासाठी जबाबदार धरले जाईल. या निर्णयामुळे मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेला बळकटी देणाऱ्या देशांच्या यादीत कॅनडाचाही समावेश झाला आहे. ऑस्ट्रेलिया हा एकमेव असा देश आहे, ज्याने १६ वर्षांखालील मुलांसाठी समाज माध्यमचा वापर मर्यादित करणारा देशव्यापी कायदा केला आहे.

हे विधेयक मंजूर झाल्यास, डिजिटल प्लॅटफॉर्म्सद्वारे होणारे सायबर-बुलिंग (ऑनलाइन छळ) किंवा इतर प्रकारचा त्रास यांसारख्या हानिकारक मजकुरापासून मुलांचे संरक्षण करण्याची जबाबदारी वेबसाइट्सवर असेल. अधिकृत निवेदनानुसार, सोशल मीडिया सेवा आणि एआय चॅटबॉट सेवांसाठी सुरक्षेच्या नवीन अटी लागू करून ऑनलाइन सेवांना अधिक जबाबदार आणि पारदर्शक बनवले जाईल. यात १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया सेवांवर खाती उघडण्यापासून रोखणारी वयोमर्यादा समाविष्ट असेल; मात्र, कंपन्यांनी मुलांसाठी पुरेशी सुरक्षा व्यवस्था केल्याचे सिद्ध केल्यास त्यांना यातून सूट मिळवण्याचा मार्गही उपलब्ध असेल. (वृत्तसंस्था)



### उल्लंघन केल्यास दंड

कायद्याचे उल्लघन करणाऱ्या कंपन्यांना १० दशलक्ष कॅनेडियन डॉलर्स किंवा त्यांच्या जागतिक महसुलाच्या तीन टक्के रक्कम, यापैकी जी रक्कम जास्त असेल, तितका दंड भरावा लागू शकतो. ऑनलाइन हानीचे नियमन कसे करावे यावर कॅनडामध्ये अनेक वर्षे चाललेल्या चर्चेनंतर हा कायदा आला आहे.

# ममतांच्या पाठीशी खंबीरपणे उभा

## शत्रुघ्न सिन्हा यांनी स्पष्ट केली भूमिका

**कोलकाता, ११ जून**

तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडल्याच्या चर्चांदरम्यान, पक्षाचे खासदार शत्रुघ्न सिन्हा यांनी एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, ते ममता बॅनर्जी आणि पक्षासोबत खंबीरपणे उभे आहेत आणि राहतील.



एका वृत्तसंस्थेशी बोलताना सिन्हा पुढे म्हणाले, ममता बॅनर्जी आणि पक्षाला पाठिंबा देणे हे माझे कर्तव्य आहे. मी २०१९ मध्ये पाटणा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर कठीण काळातून जात होते. त्यावेळी फार कमी लोक माझ्या पाठीशी उभे होते. मला पाठिंबा देणाऱ्या काही मोजक्या लोकांमध्ये ममता बॅनर्जींचा समावेश होता.

ममता बॅनर्जींची इच्छा होती की, मी खंड न पडता संसदेत राहावे. त्यांच्या आग्रहामुळे मी आसनसोलमधून निवडणूक लढवली आणि जिंकली. (वृत्तसंस्था)

### स्पष्ट बोलणे म्हणजे बंड नव्हे

गत काही दिवसांपासून सिन्हा यांच्याबद्दल विविध अफवा पसरत आहेत. ते बंडखोर गटात सामील झाले, अशी चर्चा आहे. यावर उत्तर देताना सिन्हा म्हणाले, मी स्वभावाने स्पष्टवक्ता आहे आणि नेहमी सत्य बोलतो. जर सत्य बोलणे हे बंड असेल, तर मी एक बंडखोर आहे. पण या कठीण काळात मी ममता बॅनर्जींना सोडू शकत नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# विलीनीकरणाच्या चर्चा केवळ अफवा

## सोनिया-ममता भेटीवर काँग्रेसचे स्पष्टीकरण

**नवी दिल्ली, ११ जून**

ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस यांच्या विलीनीकरणाचे वृत्त काँग्रेसने स्पष्टपणे फेटाळून लावले. काँग्रसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल म्हणाले, या चर्चा केवळ अफवा असून पूर्णपणे निराधार आणि बिनबुडाच्या आहेत. याबाबत बुधवारीच काँग्रेस सचिवांनीही परिस्थिती स्पष्ट केली आहे.

वेणूगोपाल पुढे म्हणाले, ममता बॅनर्जी व अभिषेक बॅनर्जी यांनी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची भेट घेतली हे खरे आहे. पण ती केवळ एक सामान्य औपचारिकता होती. ही भेट केवळ इंडिया आघाडी चर्चेचाच एक भाग होती. आज प्रत्येक विरोधी पक्षाला वाटते इंडिया आघाडी मजबूत व्हायला हवी. प्रत्येकाला जनविरोधी आणि अलोकतांत्रिक भाजपा सरकारविरुद्धचा लढा अधिक तीव्र करायचा आहे. आम्ही सर्व या उद्देशाने एकत्र पुढे जाऊ , असेही त्यांनी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

# राज्यसभा खासदार बराईक यांचा राजीनामा

## ममता बॅनर्जींना पुन्हा एक धक्का

**नवी दिल्ली, ११ जून**

तृणमूल काँग्रेसच्या आणखी एका राज्यसभा खासदाराने राजीनामा दिला आहे. प्रकाश चिक बराईक यांनी गुरुवारी राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे आपला राजीनामा सादर केला. बराईक यांचा राजीनामा ममता बॅनर्जींना धक्का मानला जात आहे.

राज्यसभा अध्यक्षांना लिहिलेल्या आपल्या राजीनामा पत्रात बराईक यांनी तात्काळ प्रभावाने राजीनामा देत असल्याचे म्हटले आहे. राज्यसभा अध्यक्षांनी गुरुवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास हा राजीनामा स्वीकारला. आतापर्यंत बराईक यांच्यासह तीन खासदारांनी राजीनामा देत तृणमूल काँग्रेसला रामराम ठोकला आहे. बराईक यांच्या आधी, सुखेंदू शेखर रॉय आणि महिला खासदार सुष्मिता देव यांनीही आपापल्या पदांचा राजीनामा दिला होता. (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

शुक्रवार, १२ जून २०२६

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री
मा.श्री.
# विजयसिंह मोहिते-पाटील
आपणांस वाढदिवसाच्या
## मनःपूर्वक शुभेच्छा !

**SHANKARRAO MOHITE - PATIL ENGLISH SCHOOL & JR. COLLEGE, AKLUJ**
(Std.1-12 classes - CBSE & Maharashtra state board syllabus)
Ph. 8568055055 / 9970228399
Email - smpesakluj@gmail.com

**SHIVRATNA SCHOOL, AKLUJ**
1-10 classes (Affiliated to CBSE )
Ph. 9172196213
Email - shivratnaschool79@gmail.com

**SHIVRATNA FREEWINGS SCHOOL**
AP- Sujaynagar, Akluj
Ph. No. 8793411005

**SHIVRATNA MILLENNIUM SCHOOL, AKLUJ**
AP - Sangramnagar, Tal- Malshiras, Dist- Solapur
Website- smillenium.in Ph. No. 8793411005

**SHIVRATNA SEMI ENGLISH SCHOOL, AKLUJ**
(Pre-Primary & Std. 1 to 6, S.S.C. Board)
Ph. 9834688334
Email - smpsemienglishakluj@gmail.com

**SHIVRATNA BOYS HOSTEL, AKLUJ**
Ph. (02185) 224952
Email - shivratnashikshansanstha@gmail.com

**VIJAYSINH MOHITE - PATIL COLLEGE OF NURSING & MEDICAL RESEARCH INSTITUTE, AKLUJ**
(M.Sc. Nursing, Basic B.Sc. Nursing, R.G.N.M. & R.A.N.M., - Affiliated to I.N.C. New Delhi, M.N.C. Mumbai & M.U.H.S., Nashik)
Ph. (02185) - 226752 * Email - akluj_nursing@rediffmail.com

**SHIVRATNA INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, AKLUJ**
(B.B.A. - Affiliated to Solapur University,
M.B.A., M.Com. - YCMOU, Nashik Study Center , Naac Grade : B++ )
Ph. (02185) - 222509 * Email - rmpakluj@gmail.com

**SHIVRATNA GIRL'S HOSTEL, SHANKARNAGAR-AKLUJ**
Ph. 9511644311 * Email - shivratnagirlhostel@gmail.com

**SHIVRATNA SPORTS ACADEMY**
AP- AKLUJ PH. NO. 8087541009

**TARARANI WOMENS WRESTLING ACADEMY**
AP-Shankarnagar, Near Old Shivamrut Dairy
Ph. No. 9604136946

**SHIVRATNA BOY'S WRESTLING ACADEMY**
AP-Shankarnagar, Near Old Shivamrut Dairy
Ph. No. 9604136946

**SHIVRATNA BASKETBALL ACADEMY**
Ap - Akluj, VMP Krida Sankul
Ph. No. 9860421444

**SHIVRATNA CRICKET ACADEMY**
Ap - Akluj, VMP Krida Sankul
Ph. No. 9822113382 / 9356139697

ADMISSION OPEN

Trustee, Teaching, Non-Teaching Staff & Students

# SHIVRATNA SHIKSHAN SANSTHA

SHIVRATNA KNOWLEDGE CITY, SHIVAMRUT ROAD, SHANKARNAGAR-AKLUJ TAL.MALSHIRAS DIST.SOLAPUR (MS)
Phone : (02185) 224952 / 227552 ■ Email - shivratnashikshansanstha@gmail.com ■ Web : www.sssakluj.org

- ADMISSIONS ARE OPEN FOR THE ACADEMIC YEAR2026 -2027
- KINDLY CONTACT TO THE RESPECTIVE BRANCHES IMMEDIATELY & CONFIRM YOUR ADMISSION

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# व्याप्त काश्मीर पुन्हा पेटले!

उभे जग ज्याला व्याप्त काश्मीर म्हणून ओळखते, तो भारताचा भूभाग म्हणजे केवळ भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील जमिनीचा वाद नव्हे. भारताच्या सांस्कृतिक वैविध्याचा सुंदर आविष्कार असलेल्या जनजीवनाची आणि देशाच्या संपन्न संस्कृतीची झालेली ती वेदनादायी फाळणी आहे. त्या फाळणीचे ओरखडे मनावर वागवत, सहन करत आपले हरवलेले हक्क पुन्हा मिळविण्यासाठी स्वातंत्र्याची चातकासारखी वाट पाहणाऱ्या लाखो नागरिकांची ती वेदना आहे. व्याप्त काश्मीरचा इतिहास आणि वर्तमान काहीही असले, तरी या प्रांताचे भविष्य मात्र आता निर्णायक वळणावर उभे आहे. पाकिस्तानची खालावलेली आर्थिक स्थिती आणि व्याप्त काश्मीरमधील स्थानिक जनतेत धुमसणारा तीव्र असंतोष पाहता, हा प्रदेश फार काळ पाकिस्तानच्या जुलमी राजवटीखाली राहू शकणार नाही, अशी चिन्हे दिसत आहेत. भारताची आर्थिक आणि जागतिक ताकद पाहता, भविष्यात हा भूभाग पुन्हा एकदा अखंड भारताचा भाग बनेल आणि भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा मानबिंदू असलेल्या शारदा पीठाचा हरवलेला गौरव परत येईल, हीच प्रत्येक भारतीयाची आणि तेथील त्रस्त जनतेची अपेक्षा आहे.

भौगोलिकदृष्ट्या उंचावर असलेला, मुळात भारताच्या नकाशाचा अविभाज्य भाग असलेला हा प्रदेश राजकीय आणि भावनिकदृष्ट्याही संवेदनशील आहे. म्हणूनच स्वातंत्र्यापासून आजपर्यंत तो सातत्याने भारत आणि पाकिस्तानमधील वादाचे मुख्य केंद्र राहिला आहे. हा वाद केवळ लष्करी कारवाया आणि सीमेच्या रक्षणापुरता मर्यादित नाही. कारण व्याप्त काश्मीर म्हणजे केवळ राजकीय नकाशाचा तुकडा नाही. या प्रदेशाची माती, त्या मातीतील माणसे, त्यांचा इतिहास, परंपरा यांची एक वेगळी ओळख आहे. इतिहासकाळात भारतीय उपखंडातील ज्ञान आणि संस्कृतीचे मोठे केंद्र असलेले नीलम व्हॅलीमधील शारदा पीठ आज भग्नावस्थेत आणि लष्करी छावणीच्या विळख्यात अडकले आहे. हिंदू-बौद्ध संस्कृतीचा हा विलोभनीय वारसा नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. जेथे भाषांचे अस्तित्व संकटात येते, तेथील संस्कृती धोक्यात येते, हा इतिहास आहे. व्याप्त काश्मीरमधील स्थानिक भाषांचे भवितव्य संपविण्याच्या पद्धतशीर प्रयत्नांमुळे तेथील संस्कृतीदेखील अशीच संकटात सापडल्याची जनतेची भावना आहे. मुख्यतः शियाबहुल भूभाग असलेल्या या प्रदेशात जाणीवपूर्वक सुन्नी समाजाचे पुनर्वसन केल्याने स्थानिक जनजीवनाचे संतुलन बिघडले आहे. येत्या २७ जुलै रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर पाकिस्तानी सुरक्षा दलांनी गोळीबार केला. संतप्त जनतेने रस्त्यावर उतरून प्रचंड आंदोलन उभे केले आणि ते चिरडण्यासाठी पाकिस्तानी सैन्याकडून अंदाधुंद हत्याकांड सुरू झाले. गेल्या काही दिवसांत शेकडो नागरिकांना पाकिस्तानी सैनिकांनी गोळ्या घालून ठार केल्याच्या बातम्या असल्याने, भारताशी सांस्कृतिक आणि भौगोलिक नाते असलेल्या या प्रदेशातील नागरिकांच्या चिंतेने उभा देश अस्वस्थ झाला आहे. पाकिस्तानला या हत्याकांडाबद्दल जाब विचारला जावा, यासाठी भारताने दबाव आणण्यास सुरुवात केल्याने, तेथील नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि मानवी हक्कांचा मुद्दा जागतिक स्तरावर पोहोचला आहे. पाकिस्तानच्या विळख्यातून हा प्रदेश मुक्त करण्याच्या आणि भारतासोबतचे दुरावलेले नाते पुन्हा जोडण्याच्या जुन्या प्रयत्नांना आता वेग आला आहे. हा वाद जितका जुना तितकाच गुंतागुंतीचादेखील आहे. व्याप्त काश्मीरचे भविष्य केवळ भारत आणि पाकिस्तानपुरते मर्यादित राहिलेले नाही, त्यात चीनचाही प्रवेश झाला आहे. चीन आणि पाकिस्तानमधील आर्थिक कॉरिडॉर उभारणीच्या प्रकल्पांतर्गत, भारताचा भूभाग असलेल्या या प्रदेशात अब्जावधी डॉलर्स खर्च करून रस्ते आणि रेल्वे नेटवर्क उभारणीच्या चीनच्या बेकायदा कारवायांना भारताने सातत्याने विरोध सुरू ठेवला आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर भारताने व्याप्त काश्मीरबाबत अत्यंत स्पष्ट आणि आक्रमक भूमिका घेतली. भारताचा अविभाज्य भाग असलेला हा प्रदेश परत मिळवणे हेच भारताचे ध्येय आहे, ही भूमिका भारताकडून सातत्याने व ठामपणे मांडली जात आहे. पाकिस्तानकडून भविष्याची कोणतीही हमी नसल्याच्या भावनेने ग्रासलेल्या स्थानिक जनतेच्या असंतोषाला भारताच्या या भूमिकेमुळे मोठे बळ मिळत असल्याने व्याप्त काश्मीर आणि गिलगीट, बाल्टिस्तानमध्ये पाकिस्तानविरोधात अभूतपूर्व निदर्शने होत आहेत. महागाई, अन्नपदार्थांचा तुटवडा आणि विजेच्या वाढत्या किमतींमुळे त्रस्त झालेले लोक भारतात सामील होण्याची भावना तर उघडपणे बोलून दाखवू लागले आहेत. व्याप्त काश्मीरमधील सर्वांत मोठी नागरी संघटना असलेल्या संयुक्त अवामी कृती समितीवर पाकिस्तान सरकारने दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत बंदी घातल्याने या प्रदेशातील हिंसाचार उफाळला आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. या हिंसाचाराची दखल जगाने घेतली आहेच. पाकिस्तानमधील मानवाधिकार आयोगानेही त्याबद्दल चिंता व्यक्त केल्याने, आंदोलनास नैतिक बळ मिळाले आहे. भारताच्या भूमिकेस पोषक अशा घडामोडींचे एक नवे पर्व सुरू होत आहे. त्याला हिंसाचाराची दुर्दैवी किनार आहे. पण जेव्हा जनता आपल्या मागण्यांसाठी ठामपणे उभी राहते, तेव्हा अशा आंदोलनांची ताकद वाढत असते.

फाळणीनंतर देशातील साडेपाचशेहून अधिक संस्थानांप्रमाणेच, जम्मू-काश्मीरचे तत्कालीन शासक महाराजा हरि सिंह यांनीही जम्मू-काश्मीर भारतात विलीन केले होते. मात्र, १९४७-४८ मध्ये पाकिस्तानने दहशतवादी आणि सैन्य थेट जम्मू-काश्मीरमध्ये घुसविले. त्यातून भारत-पाकिस्तान युद्ध सुरू झाले आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या मध्यस्थीने झालेल्या युद्धविरामानंतर जम्मू-काश्मीरचा हा सुमारे ३५ टक्के भूभाग बेकायदा पाकिस्तानच्या ताब्यात राहिला. फेब्रुवारी १९९४ मध्ये भारतीय संसदेच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव मंजूर केला आणि पाकिस्तानने बळकावलेला हा भूभाग भारताच्या स्वाधीन करावा या मागणीचा हुंकार देशभर उमटला. नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न असलेल्या या प्रदेशातून पाकिस्तानला मोठा सामरिक आणि आर्थिक फायदा मिळतो. सिंधू नदीच्या आधाराने वसलेल्या या प्रदेशात जलविद्युत निर्मितीची प्रचंड क्षमता आहे. तसेच जंगलसंपत्ती आणि ग्रॅफाईट, बेंटोनाईट, लिमोनाईट, संगमरवर आणि मौल्यवान रत्ने यांसारखी खनिज संपत्तीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. पाकिस्तानातील पंजाब आणि सिंध प्रांतांतील शेतीसाठी लागणाऱ्या सिंचनाच्या पाण्यापैकी मोठा हिस्सा या प्रदेशातूनच मिळतो, पण या प्रदेशातील साधनसंपत्तीचा मुख्य भूभागासाठी वापर करणाऱ्या पाकिस्तानकडून स्थानिक जनतेस मात्र कोणतेच आर्थिक लाभ दिले जात नाहीत. कुपोषण, अन्नसमस्या, माता- बालमृत्यूंचे थैमान, सुविधांचा अभाव यामुळे भविष्याविषयीच्या आशा खुंटलेल्या या प्रदेशास भारताच्या ठाम भूमिकेमुळे मोठा दिलासा मिळत राहिला ही त्यातील समाधानाची बाब ठरते. 'आझाद काश्मीर' असे नाव असलेल्या या प्रदेशात पाकिस्तानला स्वातंत्र्याची प्रतिमा दिसत असली तरी प्रत्यक्षात मात्र, राजकीयदृष्ट्या मर्यादित स्वायत्तता, आर्थिक शोषण आणि सामाजिक-आर्थिक मागासलेपण अशा अनेक समस्यांनी ग्रासलेल्या या प्रदेशाला मुक्तीची भूक लागली आहे. ताजे आंदोलन आणि त्यावरील दडपशाहीमुळे मुक्तीचा मार्ग निर्णायक वळणावर येण्याची चिन्हे असून, तसे झाले, तर भारताच्या भूमिकेचा मोठा विजय दृष्टिपथात येत असल्याचे समाधानही आता अनुभवता येणार आहे. दीर्घकाळापासूनचा हा संवेदनशील जाणिवांचा गुंता आता भारताने अधिक काळ सहन करू नये, हीच व्याप्त काश्मिरी जनतेची आणि तमाम भारतीयांची अपेक्षा आहे. कारण या गुंतागुंतीच्या परिस्थितीमुळे तेथील जनतेची घुसमट सुरू आहे. तेथे पाकिस्तानने स्वातंत्र्याचा मुखवटा चढविला असला, तरी जनता पारतंत्र्याच्या जाणिवांनी खंतावलेली आहे. दीर्घकाळापासून हरवलेली ओळख पुन्हा मिळविण्यासाठी आणि तुटलेले सांस्कृतिक नाते पुन्हा जोडण्यासाठी तेथील जनता उत्सुक आहे.

## अर्थविशेष

हितेश पारसे

# पुनर्विकासात घाई नको, माहिती हवी!

आज महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक शहरात पुनर्विकास हा चर्चेचा विषय बनला आहे. अनेक शहरांमध्ये ३० ते ५० वर्षांपूर्वी बांधलेल्या गृहनिर्माण संस्था आता वयोमानामुळे विविध समस्यांना सामोऱ्या जात आहेत. अनेक सोसायट्यांसमोर पुनर्विकासाचा पर्याय उभा राहिला आहे. अशा वेळी पुनर्विकास हा शब्द ऐकताच प्रत्येक फ्लॅटधारकाच्या मनात एक नवीन, प्रशस्त आणि आधुनिक घराचे स्वप्न उभे राहते. पुनर्विकास हा केवळ नवीन फ्लॅट मिळविण्याचा विषय नसून तो प्रत्येक कुटुंबाच्या आयुष्यभराच्या कमाईशी, मालमत्तेच्या हक्काशी आणि आर्थिक सुरक्षिततेशी संबंधित अत्यंत महत्त्वाचा निर्णय असतो. चुकीचा विकासक, कमकुवत करार किंवा अपुरी पडताळणी यामुळे अनेक सदस्यांना वर्षानुवर्षे भाड्याच्या घरात राहण्याची वेळ येते. काही प्रकल्प न्यायालयात अडकतात; काही आर्थिक कारणांमुळे रखडतात.

अनेक वेळा विकासकांकडून अत्यंत आकर्षक सादरीकरण केले जाते. सुंदर डिझाईन, आलिशान लॉबी, आधुनिक सुविधा आणि वाढीव क्षेत्रफळ यांची माहिती दिली जाते. परंतु पुनर्विकासाचा निर्णय हा कधीही भावनिक नसावा. विकासकाची आर्थिक क्षमता, त्याने पूर्ण केलेले प्रकल्प, त्याच्या विरोधातील न्यायालयीन वाद, बाजारातील प्रतिष्ठा, ग्राहकांचा अनुभव आणि रेरा वरील नोंदी तपासल्याशिवाय कोणताही निर्णय घेऊ नये.

**इमारत खरोखर पुनर्विकासासाठी पात्र आहे का?** : अनेक वेळा काही सदस्य पुनर्विकासासाठी उत्सुक असतात तर काही सदस्य त्यास विरोध करतात. अशा वेळी भावना बाजूला ठेवून तांत्रिक वास्तव समजून घेणे आवश्यक असते. यासाठी स्ट्रक्चरल ऑडिट हा सर्वांत महत्त्वाचा दस्तावेज आहे. अधिकृत संरचनात्मक अभियंता इमारतीची तपासणी करून तिची वास्तविक स्थिती सांगतो. काही वेळा इमारत इतकी धोकादायक स्थितीत असते की पुनर्विकासाशिवाय दुसरा पर्याय राहत नाही. तर काही वेळा आवश्यक दुरुस्ती करून इमारतीचे आयुष्य वाढवता येते.

**पीएमसी म्हणजे सोसायटीचा संरक्षक** : पुनर्विकास प्रक्रियेत विकासकाकडे तज्ज्ञांची संपूर्ण टीम असते. त्यांच्याकडे आर्किटेक्ट, अभियंते, कायदेशीर सल्लागार आणि आर्थिक तज्ज्ञ असतात. परंतु सामान्य सदस्यांकडे अशी तांत्रिक माहिती नसते. याच कारणामुळे आज अनेक सोसायट्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) नेमत आहेत. पीएमसी हा विकासकाचा नसून सोसायटीचा प्रतिनिधी असतो. तो व्यवहार्यता अहवाल तयार करतो, निविदा प्रक्रिया राबवतो, विकासकांची तुलना करतो, करार तपासतो आणि संपूर्ण प्रकल्पावर देखरेख ठेवतो. पीएमसीवर खर्च होणारी रक्कम ही खर्च नसून भविष्यातील संभाव्य नुकसानीपासून बचाव करणारी गुंतवणूक असते.

पुनर्विकासातील सर्वांत महत्त्वाचा दस्तावेज म्हणजे विकास करार. दुर्दैवाने अनेक सदस्य हा करार पूर्णपणे न वाचता स्वाक्षरी करतात. नंतर वाद निर्माण झाल्यावर त्यांना करारातील त्रुटी लक्षात येतात. विकास करारामध्ये खालील बाबी स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहे : नवीन फ्लॅटचा कार्पेट एरिया, पार्किंग हक्क, कॉर्पस फंड, मासिक भाडे, बांधकाम कालावधी, विलंब झाल्यास दंड, विमा संरक्षण आणि नवीन फ्लॅटचा ताबा देण्याची प्रक्रिया या बाबतच्या सर्व अटी व शर्ती करारामध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या असणे आवश्यक आहे. लक्षात ठेवा, बैठकीत दिलेले आश्वासन आणि करारात लिहिलेले आश्वासन यामध्ये मोठा फरक असतो. कायद्याच्या दृष्टीने करारात नमूद केलेल्या बाबींनाच महत्त्व असते.

**मोठा फ्लॅट म्हणजे नेमका किती मोठा?** : पुनर्विकासातील सर्वांत मोठा गैरसमज म्हणजे वाढीव क्षेत्रफळ. अनेक वेळा विकासक ३० टक्के, ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक वाढीव क्षेत्रफळ देण्याचे आश्वासन देतात. परंतु सदस्यांनी हे समजून घेतले पाहिजे की प्रत्यक्ष वापरता येणारे क्षेत्र म्हणजे कार्पेट एरिया. म्हणून नवीन फ्लॅटचा कार्पेट एरिया, बाल्कनी, टेरेस, पार्किंग आणि इतर सुविधा लेखी स्वरूपात निश्चित असणे आवश्यक आहे. पुनर्विकासाचा सर्वांत कठीण भाग म्हणजे काही वर्षांसाठी स्वतःचे घर सोडून भाड्याच्या घरात राहणे. अनेक वेळा सदस्य केवळ मासिक भाड्याकडे लक्ष देतात. परंतु खालील बाबी तितक्याच महत्त्वाच्या आहेत- डिपॉझिट, स्थलांतर खर्च, परतीचा खर्च, भाड्यातील वार्षिक वाढ, विलंब झाल्यास अतिरिक्त भाडे. आज मिळणारे भाडे पुढील तीन-चार वर्षांनी त्याच परिसरात घर घेण्यासाठी पुरेसे असेलच असे नाही. त्यामुळे भविष्यातील महागाई विचारात घेऊन करार केला पाहिजे.

**विरोध करणाऱ्या सदस्यांचे काय?** : जवळपास प्रत्येक पुनर्विकास प्रकल्पात काही सदस्य विरोध करतात. महत्त्वाची बाब म्हणजे विरोध करणारा सदस्य नेहमी चुकीचा असतो असे नाही. म्हणून अशा सदस्यांना विरोधक समजण्याऐवजी त्यांच्या शंकांचे निरसन करणे आवश्यक असते. तथापि, सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आवश्यक बहुमताने निर्णय झाल्यानंतर केवळ अडथळा निर्माण करण्यासाठी विरोध करणाऱ्या सदस्यांविरुद्ध कायदेशीर उपाययोजना उपलब्ध असतात.

**रेराचे महत्त्व** : आज पुनर्विकासामध्ये रेराची भूमिका अत्यंत महत्त्वाची झाली आहे. प्रकल्पाची नोंदणी, मंजूर नकाशे, बांधकामाची प्रगती, पूर्णत्व कालावधी आणि विकासकाची माहिती रेरा पोर्टलवर उपलब्ध असते. म्हणून प्रत्येक सदस्याने प्रकल्प आणि विकासकाची रेरावर पडताळणी करणे आवश्यक आहे.

**पुनर्विकासातील सर्वांत मोठी चूक** : अनेक सोसायट्या सर्वाधिक लाभ देणाऱ्या विकासकाची निवड करतात. जास्त क्षेत्रफळ, जास्त कॉर्पस फंड किंवा जास्त भाडे यामुळे सदस्य प्रभावित होतात. परंतु सर्वाधिक लाभ देणारा प्रस्ताव हा नेहमीच सर्वोत्तम प्रस्ताव असतो असे नाही. विश्वासार्हता, आर्थिक क्षमता, प्रकल्प पूर्ण करण्याची क्षमता, बँकिंग सपोर्ट, अनुभव आणि कायदेशीर संरक्षण या बाबींना अधिक महत्त्व दिले पाहिजे.

**निष्कर्ष** : पुनर्विकास हा आयुष्यात कदाचित एकदाच येणारा निर्णय असतो. हा निर्णय घेताना घाई, अफवा, दबाव किंवा भावनिकता यावर आधारित मत बनविणे धोकादायक ठरू शकते. प्रत्येक फ्लॅटधारकाने स्वतः माहिती घ्यावी, तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, सर्व कागदपत्रे तपासावीत आणि निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा. लक्षात ठेवा, पुनर्विकासाचा उद्देश केवळ नवीन इमारत उभारणे नसून सुरक्षित, आधुनिक आणि अधिक मूल्यवान मालमत्ता निर्माण करणे हा आहे. योग्य विकासक, सक्षम पीएमसी, मजबूत कायदेशीर संरक्षण आणि जागरूक सदस्य यांच्या साहाय्याने पुनर्विकास ही खरोखरच सुवर्णसंधी ठरू शकते. परंतु अपुरी माहिती, चुकीची निवड आणि निष्काळजीपणा यामुळे हीच संधी भविष्यातील डोकेदुखी बनू शकते. म्हणून पुनर्विकासाच्या कोणत्याही प्रस्तावावर स्वाक्षरी करण्यापूर्वी स्वतःला एक प्रश्न अवश्य विचारा- ''मी हा निर्णय संपूर्ण माहिती आणि योग्य पडताळणीच्या आधारे घेत आहे का?'' कारण पुनर्विकासातील सर्वांत मोठी सुरक्षा कोणती असेल, तर ती म्हणजे जागरूक, माहितीपूर्ण आणि सक्रिय फ्लॅटधारक.

**वारंवार विचारले जाणारे प्रश्न**

१. पुनर्विकास म्हणजे नेमके काय? जुनी इमारत पाडून त्याच जागेवर नवीन इमारत बांधण्याची प्रक्रिया.

२. पुनर्विकासासाठी सर्व सदस्यांची संमती आवश्यक असते का? नेहमीच नाही. लागू कायदे व शासन निर्णयांनुसार आवश्यक बहुमत महत्त्वाचे असते.

३. स्ट्रक्चरल ऑडिट का आवश्यक आहे? इमारतीची वास्तविक स्थिती आणि पुनर्विकासाची गरज निश्चित करण्यासाठी.

४. पीएमसी म्हणजे कोण? सोसायटीच्या हिताचे संरक्षण करणारा स्वतंत्र प्रकल्प सल्लागार.

५. विकास करार का महत्त्वाचा आहे? तो संपूर्ण पुनर्विकास प्रक्रियेचा मुख्य कायदेशीर दस्तावेज असतो.

६. पी.ए.ए.ए. म्हणजे काय? कायमस्वरूपी पर्यायी निवास व्यवस्था करार - नवीन फ्लॅटच्या हक्काचा करार.

७. कार्पेट एरिया म्हणजे काय? फ्लॅटमधील प्रत्यक्ष वापरता येणारे क्षेत्र.

८. भाड्यात वार्षिक वाढ मिळू शकते का? होय. करारात योग्य तरतूद असल्यास.

९. पुनर्विकासाचा निर्णय घेताना सर्वांत महत्त्वाची गोष्ट कोणती? संपूर्ण माहिती, योग्य पडताळणी आणि तज्ज्ञांचा सल्ला.

१०. कॉर्पस फंड म्हणजे काय? पुनर्विकासाच्या बदल्यात सदस्यांना किंवा सोसायटीला मिळणारी आर्थिक रक्कम.

११. रेराचे महत्त्व काय? पारदर्शकता आणि सदस्यांचे संरक्षण.

१२. विकासकाची पडताळणी कशी करावी? रेरा, पूर्वीचे प्रकल्प, ग्राहकांचा अनुभव आणि आर्थिक क्षमता तपासून.

१३. विरोध करणारा सदस्य प्रकल्प थांबवू शकतो का? प्रत्येक प्रकरण वेगळे असते; परंतु वैध प्रक्रिया पूर्ण झाल्यास केवळ विरोध पुरेसा ठरत नाही.

१४. नवीन फ्लॅट मिळाल्यानंतर कोणती कागदपत्रे घ्यावीत? भोगवटा प्रमाणपत्र, ताबा पत्र, भाग प्रमाणपत्र, मंजूर नकाशे, इत्यादी.

९०९६३३२३५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# 'क्यू डे'साठी तयार आहात का?

डिजिटल क्रांती झपाट्याने स्वीकारून आपण भारतीय वेगाने पुढे जात आहोत. हा हा म्हणता सगळ्या आर्थिक स्तरावरील मंडळींसाठी स्मार्टफोन ही जीवनावश्यक वस्तू बनली. त्यासोबत वापरायचे तऱ्हेतऱ्हेचे गॅजेट्स, ॲप्स, डाऊनलोडिंग, शेअरिंग, अपडेट्स असे अनेक परवलीचे शब्द तयार झाले आणि जनसामान्यांच्या तोंडात स्थानापन्न झाले. सोबतच ई-बँकिंग, ऑनलाईन शॉपिंग, ई-कॉमर्स अशा सगळ्या नवनवीन गोष्टी 'सोय' म्हणून वापरू लागलो आणि त्याची सवय अंगवळणी पडली. दुसरीकडे, सोशल मीडियावर मनोरंजन म्हणून, रील बनवून कमाई करणाऱ्यांची फौज उभी झाली आहे. शिवाय, स्मार्टफोनला मागे टाकून विअरेबल म्हणजे अंगावर घालण्याजोगे डिव्हाईसेस जेन झीची पसंत बनते आहे. सगळं खूप फटाफट घडतंय आणि त्यावर सध्या तरी आक्षेप घेण्यासारखं काही वाटत नाही. पण, या वेगाच्या दुसऱ्या बाजूचा 'वेध' घेऊ या.

भारतीयांची अशी सगळी कामे झटपट होत असताना, त्या सर्व्हरवर कुठेतरी, कदाचित भारताच्या सीमांपलीकडे, एखाद्या देशाने तयार केलेली गुप्तयंत्रणा शांतपणे ही सगळी माहिती अर्काईव्ह करत असेल तर... आज हे सगळे पासवर्ड्स, ओटीपी, फोटो-व्हिडीओज्, खाजगी संभाषण, सीसीटीव्ही फूटेज वगैरे 'एन्ड टू एन्ड एन्क्रिप्टेड' दिसत असले तरी ते जगाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात ते जसेच्या तसेच जपून ठेवले जात आहेत. यासाठी जगभरातील देश काम करत असले तरी चीन त्यात अग्रेसर आहे. आपली इस्रोदेखील क्वांटम जगभरात ५१८ कंपनीज् यासाठी काम करत असून त्यापैकी ४१४ कंपनीज् चीनच्या आहेत. त्यातही, या कामासाठी 'सॉल्ट टायफून' ही चीन सरकारची अधिकृत एजन्सी मानली जाते. ऑक्टोबर २०२४ मध्ये 'सॉल्ट टायफून'चे काम जगापुढे आले होते.

माहितीचा हा प्रचंड साठा कशासाठी एकत्र केला जातोय? या प्रश्नाचे उत्तर 'क्यू डे'च्या संकल्पनेत आहे. क्वांटम कंप्युटर्स म्हणजे अफाट क्षमतेचे भावी अत्याधुनिक हार्डवेअर जे नजीकच्या भविष्यात या संपूर्ण माहितीवर प्रक्रिया करून, ती खुली करू शकतील. आजच्या कॉम्प्युटर्सचे काम बिट्सवर चालते तसे, क्वांटम कॉम्प्युटर्स क्विबिट्सवर काम करतील. उदाहरणार्थ, आजपर्यंत उपलब्ध असलेला डेटा एन्क्रिप्ट करण्यासाठी सध्याच्या वेगवान कॉम्प्युटर्सना १०० वर्षांवर कालावधी लागू शकतो. हेच काम क्वांटम कॉम्प्युटर ८ ते १० वर्षांमध्ये पूर्ण करू शकेल. हे ज्या दिवशी होईल तो दिवस असेल क्यू डे! रेल्वे-विमान यंत्रणांपासून बँकांपर्यंत, शेअर बाजारापासून आधार कार्डच्या बायोमेट्रिक डेटापर्यंत, टपाल खात्यांपासून माध्यमांपर्यंत इंटरनेटशी संबंधित व्यवस्था कोलमडेल. संरक्षण खात्याची माहिती, अण्वस्त्रांचे पासवर्डस्ही डिकोड होतील. जगाच्या कानाकोपऱ्यातील सीसीटीव्ही प्रत्येकाची दैनंदिनी चव्हाट्यावर आणतील.

यालाच म्हणतात एचएनडीएल म्हणजे हार्वेस्ट नाऊ, डिक्रीप्ट लेटर! म्हणजेच, आज मिळेल तेवढी माहिती संग्रहित करून ठेवा आणि क्वांटम कॉम्प्युटर्स कार्यान्वित होताच, माहिती डिक्रिप्ट करा. ग्लोबल रिस्क इन्स्टिट्यूटच्या ३२ क्वांटम संशोधकांच्या मते, २०३३ ते २०३७ दरम्यान, या सगळ्या प्रक्रिया पूर्ण होऊन, कोणत्याही देशावर असा क्यू डे हल्ला होऊ शकेल. रक्ताचा एक थेंबही न सांडता, एखाद्या राष्ट्राला नेस्तनाबूत करता येईल. या सगळ्यात प्रशासकीय यंत्रणेतील मोठा डेटा हल्लेखोरांच्या हाती लागू शकतो. याचे प्रात्यक्षिक रशिया-युक्रेन आणि इस्रायल-इराण युद्धाच्या वेळी आपण बघितले आहेत. प्रत्यक्ष हल्ला करण्यापूर्वी युक्रेन आणि इराणवर सायबर हल्लेच करण्यात आले होते.

हा धोका ओळखून भारत सरकारने विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाला, राष्ट्रीय क्वांटम मिशन या आगामी ८ वर्षांसाठीचा दूरदर्शी उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी ६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची तरतूद करण्यात आली आहे. आगामी क्वांटम युगाची पावले नेमकी ओळखून घेतलेल्या या निर्णयामुळे क्वांटम सुरक्षा ही शक्यता नाही तर धोरणात्मक गरज आहे आणि गेल्या ३० वर्षांत सायबर सुरक्षेच्या क्षेत्रातील हा एकमेव सर्वांत मोठा बदल आहे. भविष्यातील हल्ल्यांपासून सुरक्षा महत्त्वाची असली तरी आजच आपला डेटा सुरक्षित ठेवणे जास्त महत्त्वाचे आहे. भारत सरकारच्या प्रयत्नांमध्ये नागरिकांचा खारीचा वाटा असायलाच हवा. डिजिटल देवाणघेवाण करण्यासाठी स्वतंत्र बँक खात्याचा वापर करायला हवा. आर्थिक व्यवहार शक्यतो प्रत्यक्षात करावे. खाजगी फोटो-संभाषण, महत्त्वाचे दस्तावेज सोशल मीडियावर शेअर करताना टायमर लावण्यासारखी काळजी घ्यावी. देशभरातील आयआयटीज्मध्ये क्वांटम सिक्युरिटी या विषयावर लहानमोठे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. ते करून या क्षेत्रात करीयर घडविण्याच्याही संधी आहेत. संकटाचे रूपांतर संधीत कसे करायचे? हे आपण भारतीय जाणतोच.'क्यू डे'साठी तयारी करण्याची हीच ती वेळ आहे.

९२२३७००२७७

## विशेष

प्रा. सुखदेव बखळे

# 'स्मार्ट ग्रिड' तंत्रज्ञानावर भर

आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या (आयईए) अंदाजानुसार, ग्रिडचे डिजिटलायझेशन २०३० पर्यंत खंडित स्वरूपाच्या नवीकरणीय ऊर्जा प्रणालींमधील वीज कपात २५ टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात कमी करू शकते. यामुळे संपूर्ण प्रणालीची कार्यक्षमता वाढेल आणि ग्राहकांसाठी खर्चातही घट होईल. यावरून स्पष्ट होते की, भविष्यातील ऊर्जा व्यवस्था केवळ उत्पादन क्षमतेवर नव्हे, तर स्मार्ट व्यवस्थापनावरही अवलंबून असणार आहे. नीती आयोगाच्या 'विकसत भारत अँड नेट झीरो' या ताज्या अहवालातही याच मुद्यावर भर देण्यात आला आहे. अहवालानुसार, नवीन 'ट्रान्समिशन कॉरिडॉर' आणि सबस्टेशन्स उभारण्याबरोबरच 'स्मार्ट ग्रिड' तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण करणे अत्यावश्यक आहे. कारण देशातील अनेक भागांमध्ये विद्यमान वीज ग्रिड जुनी आणि अपुरी आहे. नवीकरणीय ऊर्जेतील चढउतार आणि विकेंद्रित उत्पादन केंद्रांची वाढती संख्या हाताळण्यासाठी ती सक्षम नाही. त्यामुळे भविष्यातील ऊर्जा सुरक्षेसाठी वीज ग्रिडचे आधुनिकीकरण ही केवळ पर्यायाची बाब राहिलेली नाही, तर राष्ट्रीय गरज बनली आहे. 'स्मार्ट ग्रिड'ची संकल्पना मूलतः वीज वितरणाच्या पारंपरिक पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणते. वितरण स्तरावर स्मार्ट मीटर आणि प्रगत ग्रीड प्रणाली हे या परिवर्तनाचे प्रमुख आधारस्तंभ ठरत आहेत. स्मार्ट मीटर ग्राहकांच्या वीज वापराची सूक्ष्म आणि रिअल टाईम माहिती उपलब्ध करून देतात. त्यामुळे बिलिंगची अचूकता वाढते, वीज चोरी आणि तांत्रिक नुकसान कमी होते तसेच मागणीचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येते. विजेचे स्मार्ट मीटर व्यापक 'डिजिटल ग्रिड प्लॅटफॉर्म'शी जोडले जातात, तेव्हा डिमांड रिस्पॉन्स, वेळेनुसार वीज दर निश्चित करणे आणि 'लोड फोरकास्टिंग' यांसारख्या अत्याधुनिक सुविधा शक्य होतात.

या प्रकल्पासाठी केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने विविध भागधारकांचा समावेश असलेली 'टास्क फोर्स' स्थापन केली आहे. ही 'टास्क फोर्स' 'आयईएस'चा रोडमॅप, आर्किटेक्चर आणि डिझाईन निश्चित करत आहे. दिल्ली, गुजरात, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश आणि मुंबईतील वितरण कंपन्यांमध्ये प्रायोगिक अंमलबजावणीचे नियोजन करण्यात आले असून २०२६-२७ पर्यंत त्याचे प्रात्यक्षिक सादर करण्याचे उद्दिष्ट आहे. सरकारने या प्रकल्पासाठी ५१३ दशलक्ष रुपयांची तरतूद केली असून आतापर्यंत त्यापैकी ३८.८ दशलक्ष रुपये वितरित करण्यात आले आहेत. 'स्मार्ट मीटरिंग'च्या क्षेत्रातही 'रिव्हॅम्प्ड डिस्ट्रिब्युशन सेक्टर स्कीम' (आरडीएसएस) महत्त्वाची भूमिका बजावत आहे. तब्बल तीन लाख कोटी रुपयांच्या या योजनेंतर्गत देशभरात २५० दशलक्ष स्मार्ट ग्राहक मीटर बसवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. १८ मार्च २०२६ पर्यंत देशभरात जवळपास ६० दशलक्ष स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, २०२५-२६ या वर्षातच ३४ दशलक्षांहून अधिक स्मार्ट मीटर बसवण्यात आले. मागील वर्षाच्या तुलनेत ती जवळपास दुप्पट आहेत. या क्षेत्रात आघाडीवर असलेल्या राज्यांना बिलिंग आणि वसुली कार्यक्षमतेत सुधारणा तसेच वितरणातील नुकसान कमी होण्याचे ठोस परिणाम दिसू लागले आहेत. याशिवाय, २०१५ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'नॅशनल स्मार्ट ग्रिड मिशन'ने देशातील स्मार्ट ग्रिड उपक्रमांना गती देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या मोहिमेमुळे 'ॲडव्हान्स्ड मीटरिंग इन्फ्रास्ट्रक्चर' (एएमआय) इकोसिस्टिमच्या विकासाला चालना मिळाली असून विविध स्मार्ट ग्रिड तंत्रज्ञानांची यशस्वी चाचणी करण्यात आली आहे.

बदलत्या ऊर्जा गरजा, वाढते शहरीकरण, नवीकरणीय ऊर्जेचा वाढता वापर आणि ग्राहकांच्या अपेक्षा यांचा विचार करता, वितरण व्यवस्थेमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचे सखोल एकत्रीकरण अपरिहार्य बनले आहे. त्यामुळेच आता वीज वितरण क्षेत्रात डिजिटल बुद्धिमत्ता आणि माहिती-आधारित निर्णयप्रक्रिया रुजवण्यावर विशेष भर दिला जात आहे. या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे वीज वितरण कंपन्यांसाठी एकात्मिक डिजिटल स्तर उभारणे. यासाठी 'ॲडव्हान्स्ड मीटरिंग इन्फ्रास्ट्रक्चर' (एएमआय), नियंत्रण आणि निरीक्षण प्रणाली तसेच नेटवर्क मालमत्तांचे अधिक अचूक डिजिटल मॅपिंग यांचा अवलंब केला जात आहे. स्मार्ट मीटरच्या वाढत्या वापरामुळे वीजवापराची रिअल टाईम माहिती उपलब्ध होत आहे. त्यामुळे वितरण कंपन्यांना ग्राहकांच्या वापराच्या पद्धती, भारातील चढउतार आणि नेटवर्कवरील ताण यांचे अधिक स्पष्ट चित्र मिळू लागले आहे. याचबरोबर 'डेटा ॲनॅलिटिक्स' आणि ऑटोमेशन साधनांच्या मदतीने वीज वितरण अधिक कार्यक्षम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तंत्रज्ञानाच्या या नव्या टप्प्यात ड्रोनसारख्या आधुनिक साधनांचाही वापर वाढत आहे. नेटवर्क मालमत्तांची तपासणी, देखभाल आणि निरीक्षण यासाठी ड्रोनचा वापर केल्यामुळे प्रक्रिया अधिक वेगवान, सुरक्षित व अचूक होत आहे. परिणामी, नेटवर्क नियोजन अधिक परिणामकारक बनत असून आवश्यक त्या भागांमध्ये वेळेवर सुधारणा आणि गुंतवणूक करता येत आहे. यामुळे वीजपुरवठ्याची गुणवत्ता सुधारण्यास आणि वितरणातील नुकसान कमी करण्यास मदत होत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

### ऋण काढून सण साजरे करणे कितपत योग्य?

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. पण कशाची स्पर्धा करायची याला काही मर्यादा नाही. शिक्षण, नोकरी, व्यवसाय यात स्पर्धा असते आणि या स्पर्धेतून पुढे जाण्याची संधी मिळते. पण आजकाल अगदी विवाहापासून प्रत्येक गोष्टीची स्पर्धा सुरू झाली आहे आणि त्यासाठी ऋण काढून सण साजरा करायला देखील मागे पुढे पाहिले जात नाही. सध्या अधिक महिना सुरू आहे आणि त्यात मुलगी-जावई हे लक्ष्मी-विष्णू रूप म्हणून त्यांचे पूजन केले जाते. पण आज पूजन बाजूला राहिले आणि सोशल मीडियावर दिखावा अधिक केला जात आहे. प्रत्येक जण आम्ही अधिकाचे वाण कसे आणि किती दिले हे दाखवून दिले जात आहे. अगदी अंगणापासून सगळ्या घरात केलेली सजावट आणि त्यावर केलेला अमाप खर्च तर किती असावा याला काहीही मर्यादा नाही. सोने-चांदीचे भाव गगनाला भिडले आहे. महागाई दिवसेंदिवस वाढत आहे. रोजची जगण्याची तडजोड करणे अतिशय कठीण झाले आहे. इथे मनातला भाव कमी आणि पैशांचा पाऊस अधिक दिसतो. जावयाला काही देताना त्या घरात खर्चाचा किती ताण येत असेल याची कल्पना देखील करता येत नाही. आज सगळ्यांकडे सगळे असते. अगदी ओसंडून वाहत असते, पण तरीही अधिकाचा हव्यास मात्र सुटत नाही. कोणताही सण-उत्सव हा नाती जपणारा असतो. त्यातून मन प्रसन्न व्हायला हवे, जिव्हाळा, प्रेम वाढायला हवे तरच नाती दृढ होतील, हे लक्षात घेतले पाहिजे. सण, उत्सव हे दडपण न ठेवता साधेपणाने साजरे केले तर ते ओझे नाही तर खरा उत्सव होईल.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

● ● ● ●

### व्याप्त काश्मीर

'व्याप्त काश्मिरात आंदोलनाचा भडका' शीर्षकांतर्गत मंगळवार, ९ जून २०२६ च्या तरुण भारतमधील बातमी वाचली. याच आशयाची बातमी इतर वर्तमानपत्रांतसुद्धा वाचण्यात आली. मात्र एक फरक आवर्जून लक्षात आला, तो म्हणजे तरुण भारतमध्ये कुठेही 'पाक' हा शब्द वापरलेला नाही. इतर वर्तमानपत्रांत मात्र 'पाकव्याप्त' हा शब्दप्रयोग वापरण्यात आला. तरुण भारतच्या या निर्णयाचे मी स्वागत करतो. काश्मीर हा भारताचाच भूभाग आहे आणि तो राहील, ही ठाम भूमिका घेऊनच फक्त 'व्याप्त' हा उल्लेख करणे म्हणजे खरा राष्ट्रीय बाणा आहे. तरुण भारतचे अभिनंदन आणि राष्ट्रवादी भूमिका कायम जपत राहावी, ही अपेक्षा.

**प्रकाश चोपडा**/यवतमाळ. ९४२२१९२७२७

● ● ● ●

## वाचक पत्रे

### महिलांनी मानसिकरीत्या तयार असावे

'कामाच्या ठिकाणी महिलांची सुरक्षा होणार भक्कम' ही बातमी दिलासादायक नक्कीच आहे पण फक्त अंतर्गत समिती स्थापन करून फारसे काही होत नाही हे वास्तव आहे. अनेक कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती असतात तरी कॉर्पोरेट जिहाद होतोच ना? कार्यालयीन कामकाजात महिलांना दुय्यम समजणारे अनेक जण असतात तर महिला बॉस सहन न होणारेही असतातच. महिलांनी अंतर्गत समितीकडे तक्रार केली तरी तिला न्याय मिळेलच याची शाश्वती नसते. कारण तक्रार मागे घेण्यासाठी तिच्यावर दबाव आणला जाऊ शकतो, नोकरी जाण्याची भीती तर असतेच. एकूणच समाजातील लिंगभेद भाव जोपर्यंत लयाला जात नाही तोपर्यंत महिलांना संपूर्णपणे सुरक्षित वाटणार नाही. महिलांनी सुद्धा स्वतःच्या सुरक्षेसाठी शारीरिक व मानसिक तयारी केलीच पाहिजे.



**माया हेमंत भाटकर**/बाणेर पुणे

● ● ● ●

### सामाजिक बांधिलकी जपणे महत्त्वाचे

आजच्या आधुनिक आणि धकाधकीच्या जीवनात प्रत्येक जण स्वतःच्या प्रगतीच्या मागे धावत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जीवन सुलभ झाले असले तरी माणसांमधील आपुलकी, सहकार्य आणि सामाजिक जाणिवा काही प्रमाणात कमी होताना दिसतात. अशा परिस्थितीत सामाजिक बांधिलकी जपणे अधिक आवश्यक बनले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने समाजाच्या हितासाठी कार्य करणे. पर्यावरणाचे संरक्षण करणे, स्वच्छता राखणे, गरजूंना मदत करणे, शिक्षणाचा प्रसार करणे, सामाजिक ऐक्य टिकवणे ही सामाजिक बांधिलकीची काही उदाहरणे आहेत. आज अनेक सामाजिक समस्या आपल्या समोर आहेत. तरुण पिढीने सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन समाज परिवर्तनासाठी योगदान दिले पाहिजे. सामाजिक बांधिलकीमुळे समाजात एकता, बंधुभाव आणि परस्पर सहकार्य वाढते. समाजाच्या प्रगतीसाठी केवळ सरकार किंवा काही संस्था जबाबदार नसतात. प्रत्येक नागरिकाचा सहभाग तितकाच महत्त्वाचा असतो. समाजाच्या विकासात आपला सक्रिय सहभाग असला तरच एक सुसंस्कृत, प्रगत आणि आदर्श समाज निर्माण होऊ शकतो. म्हणून प्रत्येकाने सामाजिक जबाबदाऱ्यांचे भान ठेवून समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प केला पाहिजे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

# सोलापुरात मराठी नाटकांना पुन्हा आले 'अच्छे दिन...'

## सर्व नाटकांना मिळत आहे हाऊस फुल्ल प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**

मराठीतील उत्तम दर्जाची व्यावसायिक नाटके आता केवळ पुण्या मुंबई पर्यंतच मर्यादित न राहता, आता त्यांचे प्रयोग सातत्याने सोलापुरात देखील होऊ लागले आहेत, आणि त्याचे एकमेव कारण म्हणजे सोलापूरकर नाट्य रसिक त्यांना देत असलेला हाऊसफुल्ल प्रतिसाद...!!

२०२६च्या नवीन वर्षांपासून गेल्या सहा महिन्यात चक्क १८ नवीन व्यासायिक नाटके सादर झाली असून त्यापैकी बहुतेक नाटके ही प्रचंड हाऊसफुल्ल झाली आहेत, त्याबद्दल येथील नाट्य व्यावसायिक शिवाजी उपरे यांनी आनंद व्यक्त केला.

गेल्या सहा महिन्यात सोलापुरात तब्बल अठरा नवीन नाटके सादर झाली आहेत. त्यापैकी शिकायला गेलो एक, देव बाभळी, कुटुंब कीर्तन या नाटकांचे तर दोन दोन प्रयोग हाऊस फुल्ल झाले आहेत. या शिवाय फिल्टर कॉफी, चिरंजीव परफेक्ट बिघाडलाय, लाडकी विहीण योजना, जर तर ची गोष्ट, असेन मी नसेन मी, सुभेदार गेस्ट हाऊस, ठरलंय फॉर एव्हर, ऑल दि बेस्ट, शंकर जयकिशन अशी वेगवेगळ्या धाटणीची नाटके देखील हाउसफुल्ल झाली आहेत. सोलापुरात सध्या दोन व्यावसायिक नाटकांच्या आकर्षक योजना सुरु असून, या योजनाद्वारे वर्षभरात १० नव्या नाटकांचे आयोजन केले जात आहे. याशिवाय लोकमान्य मल्टी पर्पज सोसायटीच्या वतीने देखील काही नाटकांचे आयोजन केले जात आहे. येथे सादर होणारी ही नाटके हाऊसफुल्ल होण्यासाठी येथील काही नाट्य प्रेमींचा देखील महत्वाचा वाटा आहेत. यामध्ये प्रशांत बडवे, किरण लोंढे, डॉ. शिवरत्न शेटे, प्रवीण भूतडा ही मंडळी सातत्याने प्रयत्न करीत आहेत.



### नाट्य रसिकांना एक मेजवानी

२०२६ वर्षाची सुरुवात सोलापूर नाट्य रसिकांना एक मेजवानी ठरली. काही नवीन, काही जुनी, काही दुसर्या आणि तिसर्या वेळेस पण सादर होवून रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विविध विषय, उत्तम कलाकार यांनी मनोरंजन सह सामाजिक विषय मांडणी पण साधली आहे. श्री गुरू वठारे आणि श्री शिवाजी उपरे यांचे आभार मानले. **- डॉ संध्या रघोजी**

### अनेक उत्तोमत्तम नाटके दाखवू

या २०२६मध्ये आम्ही अनेक उत्तम दर्जाची व्यावसायिक नाटके आयोजित केली आहेत, आणि सर्व नाटकांना हाऊसफुल्ल प्रतिसाद मिळाला आहे. मराठी भाषिक शिवाय इतर भाषिक प्रेक्षक देखील आता सोलापुरात तयार झाले आहेत, त्या मुळे सर्व नाटके हाउसफुल्ल होत आहेत. असाच प्रतिसाद राहिल्यास सोलापूरकर रसिकांना अनेक उत्तोमत्तम नाटके दाखवू

**- शिवाजी उपरे, नाट्य वितरक आणि व्यस्थापक**



## महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६ तातडीने लागू करा : राष्ट्रभक्त अधिवक्ता संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**

राज्यात लव्ह जिहाद, फसवणुकीद्वारे धर्मांतर, महिलांचे लैंगिक शोषण, अश्लील चित्रीकरण आणि ब्लॅकमेलिंगच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, या पार्श्वभूमीवर ''महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६'' तातडीने लागू करावे, अशी मागणी राष्ट्रभक्त अधिवक्ता संघटनेने केली आहे.

या मागणीचे निवेदन सोलापूर येथे नायब तहसीलदार स्मिता गायकवाड यांनी देण्यात आले. या वेळी राष्ट्रभक्त अधिवक्ता संघटनेचे जिल्हा संयोजक अधिवक्ता सतीश गाजूल, अधि. कृष्णा निसान, अधि. संतोष म्हमाणे, उद्योगपति विक्रांत पाटील आणि रोहित यादव आदी उपस्थित होते. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यातील विविध भागांत खोटी ओळख, फसवे प्रेमसंबंध, भावनिक व आर्थिक शोषण, तसेच धर्मांतरासाठी दबाव टाकल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. नाशिक येथील टीसीएसशी संबंधित प्रकरण, अमरावती (परतवाडा) येथील प्रकरण तसेच हातकणंगले येथील प्रकरणांचा उल्लेख करत अशा घटनांमुळे समाजात विशेषतः हिंदू मुली व महिलांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे. राज्यात ''महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६'' मंजूर होऊनही त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे लव्ह जिहाद, फसवणूक, बळजबरी किंवा खोट्या ओळखींच्या माध्यमातून होणाऱ्या धर्मांतराच्या प्रकरणांवर प्रभावी व कठोर कारवाई करण्यात अडचणी येत आहेत. हा कायदा तातडीने लागू झाल्यास अशा प्रवृत्तींना आळा बसण्यास मदत होईल.

महिलांची सुरक्षा, सन्मान आणि समाजातील कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आला.


### जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. ९१/२०२५
पुढील ने. ता. २१/०४/२०२६

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात**

१) श्रीमती मंदाकिनी चंद्रकांत मोरे, वय-५३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. आगळगांव रोड, वाणी प्लॉट बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) श्री. सुदर्शन चंद्रकांत मोरे, वय-३१ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर
३) सौ. ज्ञानेश्वरी रोहन दाभाडे, वय-३३ वर्षे, धंदा-घरकाम, रा. विमल बंगला, आगरकर मळा, रेल्वे स्टेशन जवळ, अहमदनगर. -- अर्जदार
४) श्रीमती भामाबाई वसंत उर्फ वसंतराव मोरे, वय-८२ वर्षे, धंदा-काहीनाही, रा. खंडोबा वेस, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर

वि.

कोणीही नाही -- सा.वाला

ज्या अर्थी, यातील अर्जदार नं १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल तसेच अर्जदार नं. ४ यांचा मुलगा चंद्रकांत वसंतराव मोरे हे वाणी प्लॉट, आगळगांव रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे राहत्या घरी आजारपणामुळे दि. ०२/०४/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे यातील अर्जदार नं १ ते ४ हेच मयत चंद्रकांत वसंतराव मोरे यांचे कायदेशीर एकमेव व जवळचे वारस आहेत. म्हणून अर्जदार यांना वारस (हेअरशीप) प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दी करणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधाना संबंधाने जर कोणाचेही आक्षेप असल्यास संबंधीतांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेल्या ता. २१/०४/२०२६ (हस्ताक्षराने बदललेले: २३/०७/२६) रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विद्धीज्ञांमार्फत हजर होवून आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदती नंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण केले असे ता. १२/०६/२०२६

सही/-
कनिष्ठ लिपीक

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मे. सि. ज. ज्यु. डि. सो, बार्शी

### IDFC FIRST Bank Limited

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 124296174 | मालमत्तेवर कर्ज | 1. बाळासो आबासाहेब पवार 2. पवार सुरेखा बाळासो | 06/05/2026 | INR 9,80,762.13/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत गोपाळपूरच्या रजिस्टरमधील मालमत्ता क्र. ३०२ असलेली सर्व तुकडा आणि मालमत्ता/घर, एकूण जमिनीचे क्षेत्रफळ ३५०० चौ. फूट, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचा तळमजला १३०० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्र (- ) १३०० चौ. फूट, ठिकाण: गाव: गोपाळपूर, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०४. आणि सीमा (चतु:सीमा): पूर्व: प्रमोद हरी आसबे, पश्चिम: रामहरी शाम बनसोडे, उत्तर: ग्रामपंचायत रस्ता, दक्षिण: किरण राजू पवार.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 129516172 | मालमत्तेवर कर्ज | 1. मंगेश विलास जाधव 2. सुवर्णा विलास जाधव | 11/02/2026 | INR 9,65,198.20/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत कडलसच्या हद्दीतील ग्रामपंचायत मिळकत क्र. १२८४ असलेली सर्व तुकडा आणि मालमत्ता, एकूण क्षेत्रफळ ४३७.१३ चौ. मीटर, उप-विभाग: सांगोला, विभाग: सोलापूर, महाराष्ट्र. आणि सदर मालमत्तेच्या सीमा: पूर्व-पश्चिम: रस्ता, उत्तर: रमेश सुखदेव जाधव, दक्षिण: प्रकाश जगन्नाथ जाधव, पूर्व: आप्पासो सोपान जाधव.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 138249995 | मालमत्तेवर कर्ज | 1. संतोष हनमंत रुपनर 2. काजल संतोष रुपनर | 07/02/2026 | INR 8,33,535.17/- |

**मालमत्तेचा पत्ता :** सोलापूर विभागातील, पंढरपूर उप-विभागातील, ग्रामपंचायत तिसंगीच्या हद्दीतील सर्व तुकडा आणि मालमत्ता, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०४, ग्रामपंचायत मिळकत क्र. ९८०. एकूण क्षेत्रफळ २८२५ चौ. फूट. आणि सीमा: उत्तर: रस्ता, दक्षिण: सुभाष भोसले, पूर्व: रस्ता, पश्चिम: खुली जागा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 136067830 | मालमत्तेवर कर्ज | 1. शशिकांत जनार्दन पवार 2. मलन जनार्दन पवारा | 07/02/2026 | INR 8,62,803.02/- |

**मालमत्तेचा पत्ता :** समालमत्तेचा पत्ता: सोलापूर विभागातील, सांगोला उप-विभागातील, ग्रामपंचायत खिलारवाडीच्या हद्दीतील सर्व तुकडा आणि मालमत्ता, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०६, ग्रामपंचायत मिळकत क्र. ५८६. एकूण क्षेत्रफळ १८८२ चौ. फूट. आणि सीमा: उत्तर: रस्ता, दक्षिण: शंतनू खिलारे, पूर्व: खुली जागा, पश्चिम: खुली जागा.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 12/06/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सिध्देश्वर पेठ येथील मिळकत यांसी म्यु. पल घर नं. १२५ व सि.स.नं.६१६४, तसेच स.नं. ८१९, याचे एकूण क्षेत्र ८०९.00 चौ.मी. इतके असून यावर बांधण्यात आलेल्या राहत सेंट्रल पार्क या अपार्टमेंट मधील बी-विंग, चौथा मजला फ्लॅट नं. २९, याचे कारपेट क्षेत्र ५४.८२ चौ.मी. व बिल्टअप क्षेत्र ६४.६0 चौ.मी. इतके असून यांसी चतु:सिमा:- पूर्वेस :- कॉमन पॅसेज, स्टेअरकेस व फ्लॅट नं. ३२, पश्चिमेस :-ओपन टू स्काय, दक्षिणेस :- सि.स.नं. ६१६५, उत्तरेस :- फ्लॅट नं. ३0 असे आहे.

वर नमूद मिळकतीबाबतचे खरेदीखत दस्त क्र. १२/२०१४, दि. ०१-०१-२०१४ हे मुळ खरेदीखत अनावधानाने गहाळ झाले आहे. त्यामुळे आमचे अशिल अब्दुल रज्जाक चौधरी यांनी जेलरोड पोलीस स्टेशन, सोलापूर शहर या पोलीस स्टेशनमध्ये रीतसर तक्रार दिली असून त्याचे गहाळ ऑनलाईन रजिस्ट्रेशन दि.0३-0६-२०२६ रोजी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे.

तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहु मिळकत आमचे अशिल हे विक्री करणार आहेत. तरी सदरहु मिळकतीवर कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, लिन, बक्षीस, बोजा, पोटगी, कब्जा वगैरे असल्यास त्यांनी ८ (आठ) दिवसांच्या आत खाली नमुद आमच्या पत्त्यावर त्यांचे हक्काचे पृष्ठ्यर्थ कागदपत्रे आणून द्यावीत. जर कोणी मुदतीत हरकत घेतली नाही तर सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदर मिळकती विक्री करतील, तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता.११/0६/२०२६.

**सही/-**
**ॲड. के. एम. शेख**
**एम. कॉम. एल.एल.बी**
**ॲड. एम. ए. नलवर**
**बी.ए. एल.एल.बी.**

### जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम १८ अनुसार तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांच्या कार्यक्षेत्रातील क प्रकारातील खालील सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी प्रारूप ते अंतिम मतदार यादी प्रसिध्दीकरणाच्या निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | निवडणूक नियम ६(३) नुसार प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्याची तारीख | निवडणूक नियम ८(१) नुसार प्रारूप मतदार यादीवर हरकती व आक्षेप तालुका सहकारी निवडणूक अधिकारी माळशिरस यांचेकडे सादर करावयाची तारीख | निवडणूक नियम ८(३) नुसार प्रारूप मतदार यादीवरील आक्षेप व हरकतीवर तालुका सहकारी निवडणूक अधिकारी माळशिरस यांनी द्यावयाचा निर्णयाची तारीख | निवडणूक नियम ८(३) नुसार अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | शिवस्तुती अर्बन क्रेडीट को.ऑप सोसायटी लि. यशवंतनगर, ता. माळशिरस | १२/६/२०२६ | १२-०६-२०२६ ते १८-०६-२०२६ | १९/०६/२०२६ | २२/०६/२०२६२ |
| २ | बालाजी अर्पण को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. अकलूज, ता. माळशिरस | १२/६/२०२६ | १२-०६-२०२६ ते १८-०६-२०२६ | १९/०६/२०२६ | २२/०६/२०२६३ |
| ३ | राजलक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. वेळापूर, ता. माळशिरस | १२/६/२०२६ | १२-०६-२०२६ ते १८-०६-२०२६ | १९/०६/२०२६ | २२/०६/२०२६ |

**सही/**
**(पी. आर. सारडा)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी,**
**तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,**
**अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर**

**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate : RAJENDRA VITTHAL RAUT**
3809, Raut Chawl, Ashoknagar, Barshi, Tal. Barshi, Dist. Solapur 413 401

**Name of political party : Bharatiya Janata Party**
(Independent candidates should write "independent" here)

**Name of Election : Maharashtra Legislative Council from Solapur Local Authorities Constituency**

**Name of Constituency : Solapur Local Authorities Constituency**

I **RAJENDRA VITTHAL RAUT,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil | Nil |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

**Place : Mumbai**
**Date : 02.06.2026**

Name & Signature of Candidate
**(RAJENDRA VITTHAL RAUT)**



### विकणे आहे

**विजापूर रोड, माशाळे नगर माता लक्ष्मी अपार्टमेंटमध्ये 2BHK फ्लॅट विकणे आहे. पार्किंग व पाण्याची मुबलक सुविधा आहे.**
**--- संपर्क ---**
**7498948451**
**9579030937**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ४०/२०२६

१. विजयकुमार गंगाधर गिराम -- अर्जदार
रा. वाणे गल्ली, सुभाष चौक वैराग ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील पी.एस हंचाटे)

विरुद्ध

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी -- गैरअर्जदार
तथा मुख्याधिकारी, न.प. वैराग

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची आई शांताबाई गंगाधर गिराम, रा. वाणे गल्ली, सुभाष चौक वैराग ता. बार्शी यांचा मौजे वैराग ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०५ मे २०१९ रोजी मृत्यु झालेला असून त्यांची मृत्यु नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये मृत्यु नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आई शांताबाई गंगाधर गिराम यांचा दिनांक ०५ मे २०१९ रोजी मौजे वैराग ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी मृत्यु झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकत न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgement dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Council from Solapur Local Authorities Constituency**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | Solapur Local Authorities Constituency | RAJENDRA VITTHAL RAUT | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : Solapur Local Authorities Constituency**

**Place : Mumbai**
**Date : 04.06.2026**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation.......
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# फिफा विश्वचषक फुटबॉलची धूमशान

◆ **मेक्सिको, ११ जून**

अमेरिका-इराण युद्धाच्या सावटाखाली फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धा अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये गुरुवार मध्यरात्रीपासून प्रारंभ होणार आहे. पुरुषांच्या फिफा विश्वचषकाची ही २३ वी आवृत्ती स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मोठी आवृत्ती असेल. फुटबॉलमधील सर्वात प्रतिष्ठित विश्वविजेतेपदासाठी गतविजेता अर्जेंटिनासह प्रथमच ४८ संघ झुंजणार आहेत. अमेरिका, कॅनडा व मेक्सिकोमधील १६ यजमान शहरांमध्ये विक्रमी १०४ सामने खेळवले जातील.

मेक्सिको शहरात अझ्टेक स्टेडियमवर सलामीचा सामना गुरुवार, १२ जून रोजी (भारतीय वेळेनुसार मध्य रात्री १२.३० वाजतापासून) सह-यजमान मेक्सिको आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यान विश्वचषकातील पहिला सामना खेळला जाणार आहे, तर ग्वाडालाजरा येथे शुक्रवार १३ सकाळी ७.३० वाजता दक्षिण कोरिया आणि झेक प्रजासत्ताक यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.




फुटबॉल विश्वचषक स्पर्धेपूर्वी आयोजित काऊंटडाऊन कॉन्सर्टमध्ये सादरीकरण करताना नोरा फतेही व शकिरा

### १,२४८ फुटबॉलपटूंची निवड विक्रमी १०४ सामने

स्पर्धेच्या या विस्तारित स्वरूपामुळे खेळाडूंच्या सहभागातही अभूतपूर्व वाढ झाली आहे. या स्पर्धेसाठी ७१ देशांमधील ४४९ क्लब्समधून एकूण १,२४८ फुटबॉलपटूंची निवड करण्यात आली आहे. यापैकी ३५७ खेळाडू यापूर्वी फिफा विश्वचषक संघात सहभागी झाले आहेत, तर ८९१ खेळाडू विश्वचषकात पदार्पण करणार आहेत.

### तीन ठिकाणी उद्‌घाटन सोहळा

पहिला उद्‌घाटन सोहळा मेक्सिको सिटीमधील एस्तादियो अझ्टेका येथे होणार असून दुसरा उद्‌घाटन सोहळा टोरंटोमधील बीएमओ फील्ड येथे, तर तिसरा उद्‌घाटन सोहळा लॉस एंजेलिसमधील सो-फाय स्टेडियम येथे होणार आहे. हा तीन भागांतील उत्सव दोन दिवसांत पार पडेल.

पहिला उद्‌घाटन सोहळा ११ जून रोजी मेक्सिको सिटीमध्ये अझ्टेका स्टेडियमवर होणार आहे. त्यानंतर मेक्सिकोचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होईल. त्यानंतर हा उत्सव १२ जून रोजी टोरंटोमधील बीएमओ फील्ड येथे होणार असून त्या ठिकाणी कॅनडाचा सामना बोस्निया आणि हर्झगोव्हिनाशी होईल. १२ जून रोजी अमेरिका आणि पनामा यांच्यातील सामन्यापूर्वी लॉस एंजेलिसमधील सो-फाय स्टेडियम येथे होणाऱ्या अंतिम उद्‌घाटन सोहळ्याने या उत्सवाची सांगता होईल. ■

फिफा विश्वचषक २०२६ हा चार देशांसाठी एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. केप वर्दे, कुरासाओ, जॉर्डन आणि उझबेकिस्तान या देशांनी फुटबॉलच्या या सर्वात मोठ्या स्पर्धेत पहिल्यांदाच सहभाग निश्चित केला आहे.

यामुळे विश्वचषकाच्या या महत्त्वपूर्ण आवृत्तीत नवीन महत्त्वाकांक्षांची भर पडणार आहे.

### डीडी स्पोर्ट्‌सवर सलामीचा सामना, बाद फेरी सामन्याचे प्रसारण

दूरदर्शन स्पोर्ट्‌स अर्थात डीडी स्पोर्ट्‌स २०२६ च्या फिफा विश्वचषकाचा सलामीचा सामना (मेक्सिको विरुद्ध दक्षिण आफ्रिका), चार उपांत्यपूर्व सामने, दोन उपांत्य सामने आणि अंतिम सामना यांचे प्रसारण करणार आहे.

◂(वृत्तसंस्था)

## विश्वचषकाचा थरार झी टीव्हीवर दिसणार

**मेक्सिको :** भारताच्या झी एंटरटेनमेंटने फिफासोबत २०२६ च्या विश्वचषकाच्या प्रसारणाचा करार केला आहे. झी २०२६ आणि २०३० चे विश्वचषक, तसेच २०२७ चा महिला विश्वचषक यांसह २०३४ पर्यंतच्या फिफाच्या एकूण ३९ स्पर्धांचे प्रसारण करणार आहे. भारतात विश्वचषकाच्या प्रसारणाबाबत सुरू असलेला अनेक महिन्यांचा पेच सोडवत, फिफाने भारताच्या झी एंटरटेनमेंटसोबत करार केला आहे. या करारातील आर्थिक अटी उघड करण्यात आल्या नाहीत; मात्र, सुरुवातीला फिफाने २०२६ आणि २०३० च्या स्पर्धांसाठी सुमारे १०० दशलक्ष डॉलर्सची मागणी केली होती आणि नंतर ती कमी करून ६० दशलक्ष डॉलर्सवर आणली होती, असे वृत्त आहे. या करारामुळे झीला भारतातील क्रीडा प्रसारण बाजारपेठेत स्थान मिळवता आले आहे. या बाजारपेठेत रिलायन्स आणि डिस्नेचा संयुक्त उपक्रम असलेल्या जिओस्टारकडे आयपीएल क्रिकेट स्पर्धेपासून ते इंग्लिश प्रीमियर लीग फुटबॉलपर्यंतच्या स्पर्धांचे प्रसारण हक्क आहेत.

## क्रोएशियाचा संघ सज्ज

◆ **अलेक्झांड्रिया, ११ जून**

या वर्षीच्या विश्वचषकासाठी अमेरिकेत आलेला क्रोएशियाचा संघ एका नवीन युगात प्रवेश करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे. सलग दोनदा उपांत्य फेरी गाठल्यानंतर क्रोएशियाचा संघ वॉशिंग्टन डी.सी. परिसरात दाखल झाला आहे.

किमान गट फेरीच्या कालावधीसाठी क्रोएशियाने तिथेच तळ ठोकला आहे; जरी त्यांचे तीन सामने आर्लिंग्टन (टेक्सास), टोरंटो आणि फिलाडेल्फिया येथे होणार असले तरीही. संघाच्या यादीत खेळातील महान खेळाडूंपैकी एक असलेल्या ४० वर्षीय लुका मॉड्रिक्चा, तसेच ३७ वर्षीय इव्हान पेरिसिचचा समावेश आहे. या दोघांनीही संघाला २०१८ मध्ये उपविजेतेपद आणि २०२२ मध्ये तिसरे स्थान मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली होती.

मला वाटते की कोणत्याही तरुण खेळाडूसाठी संघात लुका, पेरिसिच, (मॅटेओ) कोव्हासिच आणि (आंद्रेज) क्रामारिच यांसारखे खेळाडू असणे ही खूप मोठी गोष्ट आहे, असे २३ वर्षीय आक्रमक खेळाडू इगोर मतानोविच याने सांगितले. त्याने क्रोएशियाच्या संघात १०० हून अधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळलेल्या या चारही खेळाडूंचा उल्लेख केला. क्रोएशियाने १९९८ आणि २०२२ मध्ये तिसरे स्थान पटकावले, तसेच २०१८ मध्ये रशियात झालेल्या स्पर्धेत अंतिम फेरी गाठली होती.

◂(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

(भारतीय वेळेनुसार)

**कॅनडा विरुद्ध बोस्निया ॲण्ड हर्झगोव्हिना**
**वेळ :** शुक्रवार, मध्यरात्री १२.३० वाजतापासून
**स्थळ:** बीएमओ फील्ड, टोरांटो

**अमेरिका विरुद्ध पॅराग्वे**
**वेळ :** शनिवार, सकाळी ६.३० वाजतापासून
**स्थळ :** सोफी स्टेडियम, लॉस एंजेलिस

**थेट प्रसारण :** झी एंटरटेन्मेंटवर

## विश्वचषकाच्या पूर्वसंध्येला मेक्सिकोत संघर्ष

**मेक्सिको सिटी, ११ जून**

मेक्सिकोच्या राजधानीतील वाढत्या निदर्शनामुळे आणि सामाजिक तणावामुळे उद्घाटन समारंभाच्या पूर्वसंध्येला फिफा विश्वचषक सोहळ्याला खीळ बसण्याची शक्यता आहे, कारण निदर्शकांनी देशातील मुख्य चाहता सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या चौकाकडे जाणारे मार्ग प्रभावीपणे रोखले आहेत.

भारतीय वेळेनुसार मध्यरात्री एका दिमाखदार सोहळ्याने उत्सवाला सुरुवात होत आहे. मात्र, काही टीकाकारांच्या मते, सरकारने रहिवाशांच्या खर्चावर आंतरराष्ट्रीय पाहुण्यांच्या सोयीसुविधांवर खूप जास्त वेळ आणि पैसा खर्च केला आहे.

मेक्सिकोच्या राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शाइनबाम जुलै महिन्यातील व्यापार वाटाघाटींपूर्वी अमेरिकेसोबतचे बिघडलेले संबंध आणि फेब्रुवारीमध्ये विश्वचषक यजमान शहरात झालेल्या हिंसाचारानंतर निर्माण झालेली सुरक्षेची चिंता या सर्वांधून मार्ग काढत या खेळांना सुरुवात होत आहे.

## फिफा विश्वचषकात ३२ संघांची गटवारी

◆ **मेक्सिको, ११ जून**

२०२६ फिफा विश्वचषकात प्रत्येकी चार संघांचे १२ गट असून यातील अव्वल दोन संघ आणि तिसऱ्या स्थानावरील सर्वोत्तम आठ संघ राऊंड ऑफ ३२ मध्ये प्रवेश करतील. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या देशांमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या २०२६ विश्वचषकासाठी निश्चित झालेले गट खालीलप्रमाणे आहेत:

**गट ए :** मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया, झेक प्रजासत्ताक/डेन्मार्क/उत्तर मॅसेडोनिया/आयर्लंड प्रजासत्ताक (प्ले-ऑफ विजेता)

**गट बी :** कॅनडा, बोस्निया आणि हर्झगोव्हिना (प्ले-ऑफ विजेता), कतार, स्वित्झर्लंड **गट सी :** ब्राझील, मोरोक्को, हैती, स्कॉटलंड **गट डी :** अमेरिका, पॅराग्वे, ऑस्ट्रेलिया, कोसोवो/रोमानिया/ स्लोव्हाकिया/ तुर्की (प्ले-ऑफ विजेता)

**गट ई :** जर्मनी, कुरासाओ, कोत दईवोआर (आयव्हरी कोस्ट), इक्वेडोर **गट एफ :** नेदरलँड्‌स, जपान, अल्बेनिया/ पोलंड/स्वीडन/युक्रेन (प्ले-ऑफ विजेता), ट्युनिशिया **गट जी :** बेल्जियम, इजिप्त, इराण, न्यूझीलंड **गट एच :** स्पेन, काबो वर्दे, सौदी अरेबिया, उरुग्वे

**गट आय :** फ्रान्स, सेनेगल, बोलिव्हिया/इराक/ सुरिनाम (प्ले-ऑफ विजेता), नॉर्वे

**गट जे :** अर्जेंटिना, अल्जेरिया, ऑस्ट्रिया, जॉर्डन

**गट के :** पोर्तुगाल, काँगो डीआर/जमैका/न्यू कॅलेडोनिया (प्ले-ऑफ विजेता), उझबेकिस्तान, कोलंबिया

**गट एल :** इंग्लंड, क्रोएशिया, घाना, पनामा




# महिला टी-२० विश्वचषक आजपासून

### विश्वविजेतेपदासाठी १२ संघ झुंजणार

◆ **बर्मिंगहॅम, ११ जून**

आतापर्यंतचा सर्वात भव्य आणि चुरशीचा ठरणारा आयसीसी महिला टी-२० विश्वचषक शुक्रवार, १२ जूनपासून येथे सुरू होणार आहे. या स्पर्धेच्या विजेतेपदासाठी १२ संघ झुंजणार आहेत. ५ जुलै रोजी लॉर्ड्‌सवर स्पर्धेचा अंतिम सामना खेळला जाणार आहे.

या स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचे पारंपरिक वर्चस्व मोडून काढण्यासाठी भारत, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका हे संघ सज्ज आहेत, जे सातत्याने प्रगती करत आहेत.

गत नऊ स्पर्धांपैकी सहा वेळा विजेतेपद पटकावणारा ऑस्ट्रेलियन संघ सातव्यांदा जेतेपद मिळविण्यासाठी व विद्यमान विजेत्या न्यूझीलंडला मागे टाकण्यासाठी उत्सुक असेल; मात्र, आता ही केवळ एक औपचारिक व एकतर्फी लढत राहिलेली नाही.

न्यूझीलंडचा संघ स्वतःच अत्यंत मजबूत आहे; त्यासोबतच भारताचा संघही आहे, भारताने गत वन-डे विश्वचषकात आपले पहिले जागतिक विजेतेपद पटकावले होते.

घरच्या मैदानावर नेहमीच प्रभावी कामगिरी करणारा इंग्लंडचा संघ आणि गत तीन आयसीसी स्पर्धांमध्ये अंतिम फेरी गाठणारा दक्षिण आफ्रिकेचा संघ, हे देखील तगडे प्रतिस्पर्धी ठरतील.



विश्वचषकासाठी लढणाऱ्या सहभागी संघाचे कर्णधार

या पृष्ठभूमीवर, इंग्लंड व श्रीलंका यांच्यातील सामन्याने सुरू होणारी ही स्पर्धा आतापर्यंतची सर्वात अनिश्चित व चुरशीची ठरणार आहे. तसेच, २००९ मधील पहिल्या आवृत्तीनंतर इंग्लंडमध्ये होणारा हा पहिलाच विश्वचषक आहे.

सहभागी १२ संघांच्या संख्येचा विचार करता ही स्पर्धा सर्वात मोठी आहे; यात २०२४ पासून आयर्लण्ड व नेदरलँड्‌सचा समावेश करण्यात आला आहे.

ही वाढ महिला क्रिकेटला विविध देशांमध्ये बळकट आधार मिळत असल्याचे लक्षण आहे. मात्र, त्याहूनही समाधानकारक बाब म्हणजे सर्व संघांना समान संधी मिळणे आणि काही नवीन पण रोमांचक अशा प्रतिभावान खेळाडूंचा उदय होणे.

**युवा प्रतिभा**

याची सुरुवात इंग्लंडच्या ॲलिस कॅप्सी, टिली कोर्टिन-कोलमॅन आणि फ्रेया केम्प यांच्यापासून होते, तर उद्याचे त्यांचे प्रतिस्पर्धी असलेल्या श्रीलंकेच्या संघात विश्मी गुणरत्ने, इमेशा दुलाणी, कविशा दिलहारी व काव्या कविंदी यांसारख्या खेळाडूंचा समावेश आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वात तरुण कर्णधारांपैकी एक असलेली न्यूझीलंडची कर्णधार अमेलिया केर (वय २५) ही तिच्या संघासाठी एक महत्त्वाची खेळाडू आहे. तिची कहाणी जिद्दीची आणि प्रेरणादायी आहे; २०२०-२१ च्या हंगामात नैराश्य व आत्महत्येचे विचार यांसारख्या कठीण प्रसंगांवर तिने मात केली आहे.

प्रबळ दावेदार असलेल्या भारतीय संघात एन. श्री चरणी, यस्तिका भाटिया व नंदनी शर्मा यांसारख्या आशादायक खेळाडूंचा समावेश आहे. ऑस्ट्रेलियाई संघ विजेतेपद पुन्हा मिळविण्यासाठी अजूनही आपल्या अनुभवी खेळाडूंवर विसंबून आहे, परंतु त्यांच्या संघात जॉर्जिया व्होल (फलंदाज) व लुसी हॅमिल्टन (डावखुरी वेगवान गोलंदाज) यांसारखे दोन उत्कृष्ट युवा खेळाडूही आहेत.

प्रबळ लॉरा वोल्वार्ड्टच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिका संघाने अनुभवी वेगवान गोलंदाज शबनिम इस्माईल व डॅन व्हॅन निकर्क यांना निवृत्तीतून परत बोलावले असले, तरी कायला रेनेके व ॲनरी डर्कसेन यांच्या नेतृत्वाखाली त्यांची पुढच्या पिढीतील खेळाडूंची फळीही सज्ज आहे. या तुलनेने नवीन खेळाडूंच्या कामगिरीकडे बारकाईने पाहिले जाईल, कारण आपल्या शानदार कारकिर्दीच्या अंतिम टप्प्यात असलेल्या दिग्गज खेळाडूंचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे.

◂(वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**इंग्लंड विरुद्ध श्रीलंका**
**स्थळ :** बर्मिंगहॅम
**वेळ :** सकाळी ११.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्‌सवर



# क्रीडा क्षेत्र वाचवा; शारीरिक शिक्षण संचालक भरती करा!

### शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदभरतीसाठी आझाद मैदानावर आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ११ जून-**

महाराष्ट्र राज्य वरीष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण संचालक महासंघाच्या वतीने शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदभरतीच्या प्रलंबित प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी (दि. ८ जून) मुंबई येथील आझाद मैदानावर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, शासनाने सन २०१७ पासून आजतागायत शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदांची भरती केलेली नाही. त्यामुळे राज्यातील अनेक अनुदानित व वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ही महत्त्वाची पदे रिक्त असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व क्रीडा विकासावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे.

शासनाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये पदके मिळवायची आहेत, खेलो इंडिया सारख्या योजनांद्वारे क्रीडा संस्कृती रुजवायची आहे, मात्र खेळाडू घडविणाऱ्या शारीरिक शिक्षण संचालकांचीच भरती करण्यास शासन उदासीन असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. सरकारला मेडल हवे आहेत, पण ते घडवणारे प्रशिक्षित क्रीडा शिक्षक व शारीरिक शिक्षण संचालक नको आहेत, अशी तीव्र भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

महाविद्यालयांना शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल ही पदे बंधनकारक असताना आणि या पदांशिवाय मान्यता मिळत नसताना, शासनाने इतर सर्व विषयांच्या ५०१२ पदांना मान्यता दिली; मात्र शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदांना या भरती प्रक्रियेतून वगळण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून राज्यभरातील पीडित उमेदवार आणि कार्यरत शिक्षक विविध मार्गांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत आहेत. मोर्चे, धरणे आंदोलने, निवेदने आणि उपोषणाच्या माध्यमातून सातत्याने आवाज उठवूनही शासनाकडून कोणताही ठोस निर्णय होत नसल्याने आंदोलन नजीकच्या काळात अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.पदभरतीच्या प्रश्नाबाबत आवश्यक निर्णय घेणे व शासनापर्यंत वस्तुस्थिती पोहोचविण्यात दिरंगाई होत असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

राज्यातील युवकांचे भविष्य, महाविद्यालयीन क्रीडा विकास आणि राष्ट्रीय स्तरावर सक्षम खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपाल पदांची भरती तातडीने करण्यात यावी, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही महासंघाचे अध्यक्ष डॉ.गणेश सिंहासने यांनी दिला आहे.

## सोलापूर विद्यापीठाच्या रमेश धोडमणीला राष्ट्रीय गतका स्पर्धेत कांस्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून -**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या रमेश धोडमणी याने राष्ट्रीय गतका स्पर्धेत कांस्य पदक संपादिले. कोटा, राजस्थान येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ गतका स्पर्धेत सिंगल सोटी प्रकारात त्याने ही कामगिरी केली. तो छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचा विद्यार्थी आहे.

रमेशला प्रा. संतोष गवळी, डॉ. सुभाष मारकड, डॉ. धनंजय देशमुख आणि प्रा. विशाल गाडेकर यांचे मार्गदर्शन केले. त्याचा कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्र. कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा, परीक्षा नियंत्रक डॉ.श्रीकांत अंधारे, क्रीडा संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन मोटे उपस्थित होते.



## 'स्वाद चषक' खुली व महिला जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. ११ जून -**

सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने चॅम्प चेस स्कूल व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने खुली व महिला गटाच्या जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन रविवार १४ जुन रोजी सकाळी १० वाजता टाकळीकर मंगल कार्यालय, जुळे सोलापूर येथे केले आहे. या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या चार मुले व मुलींची निवड कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्य बुद्धीबळ स्पर्धेसाठी करण्यात येईल. निवड झालेल्या प्रत्येक खेळाडूंना रु. १०००, मेडल व 'स्वाद चषक' देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत एकूण ५० बक्षिसे देण्यात येणार असून १५, ११ व ८ वर्षाखालील गटात प्रत्येकी पाच उत्तेजनार्थ पारितोषिके ठेवण्यात आलेली आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंची बक्षिसाची रक्कम राज्यस्तरीय स्पर्धा खेळून आल्यानंतर देण्यात येणार असल्याचे स्पर्धा संयोजक गणेश सावंत व सादिक नदाफ तसेच संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी सांगितले. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे मो.क्र. ८८८८०४५३४४ अथवा प्रशांत पिसे मो.क्र. ९१५६८१५९६३ यांच्याकडे संपर्क साधावा.

# 'साउथ सोलापूर आपटे' संघास विजेतेपद; मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्यूट उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून -**

येथील रेल्वे मैदानावर पार पडलेल्या ७९व्या रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत 'साउथ सोलापूर आपटे' संघाने अंतिम सामन्यात मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर संघाचा ३ गडी राखून पराभव करत मानाचा फिरता चषक आणि ढाल स्वतःकडे राखली. कै. सुरेश मालप यांच्या स्मरणार्थ सुदेश व सुनील मालप यांनी ही आकर्षक ट्रॉफी पुरस्कृत केली होती.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यानंतर रेल्वेचे ए.डी.आर.एम. अंशूमली कुमार आणि क्रीडाधिकारी आदित्य त्रिपाठी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी सेंट्रल रेल्वे मजदूर संघाचे सचिव उल्हास बागेवाडी, रेल्वे चिकित्सा अधिकारी डॉ. मंजुनाथ, प्रिसिजनचे पीआरओ विनायक दूधगी, साबरी कन्स्ट्रक्शनचे जेद शेख, आयपीएल खेळाडू अर्शिन कुलकर्णी, तसेच मध्य रेल्वे इन्स्टिट्यूटचे सेक्रेटरी किशोर पिल्ले व खजिनदार दत्ता वाघमोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

### रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट



अंतिम सामन्यात दया नवले व मजर मंगोली यांनी पंच म्हणून, तर सचिन गायकवाड यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन राजा पटेल यांनी केले.

**संक्षिप्त धावफलक**

**मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर:** २० षटकांत ८ बाद १३२ धावा. (अभिषेक पवार नाबाद ५४, जसन सिंग २६, पार्थ लोंढे १७. गोलंदाजी: बाळकृष्ण काशिद २/१४, अर्शिन कुलकर्णी २/३२)

**पराभूत विरुद्ध साउथ सोलापूर आपटे:** १८.३ षटकांत ७ बाद १३३ धावा. (चेतक गोरे नाबाद ३८, निरंजन कदम २४, संकीर्ण पाटील २३, नारायण डोके नाबाद २३. गोलंदाजी: आशिष आईवळे ३/२०, लखन गावडे ३/३४).

**वैयक्तिक पारितोषिक विजेते:**

**विजेता संघ:** साउथ सोलापूर आपटे (२१ हजार रुपये व चषक)

**उपविजेता संघ:** मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर (११ हजार रुपये व चषक)

**मालिकावीर :** बाळकृष्ण काशीद (साऊथ सोलापूर) - पंधराशे रुपये व चषक

**सामनावीर :** नारायण डोके - पाचशे रुपये (वैभव इराबत्ती यांच्याकडून)

**उत्कृष्ट फलंदाज:** विवेक अंनची (मॉडेल क्रिकेट कॅडमी) एक हजार रुपये, चषक व प्रविण देशेट्टी यांच्याकडून बॅट.

**उत्कृष्ट गोलंदाज:** बाळकृष्ण काशीद (साऊथ सोलापूर) - एक हजार रुपये, चषक व 'डी स्पोर्ट्स' वासुदेव दोरणाल यांच्याकडून शूज.

**उत्कृष्ट क्षेत्ररक्षक:** संजय राठोड (मध्य रेल्वे इन्स्टिट्युट) - पाचशे रुपये व ट्रॉफी.

**सहकार्य व मैदानी कर्मचाऱ्यांचा सत्कार**

स्पर्धेला वैयक्तिक पारितोषिके देऊन सहकार्य केल्याबद्दल सुदेश मालप, राजा पटेल, वासुदेव दोरनाल, वैभव इराबत्ती, प्रवीण देशेट्टी, अतुल बांडीवाडीकर आणि शोएब शेख यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

तसेच गेल्या दोन महिन्यांपासून मैदान तयार करण्यासाठी मेहनत घेणारे विक्रांत पवार, राजा पटेल, लियाकत शेख, अंबादास तोरा, श्रावण चिट्ठयालकर आणि मैदानी कर्मचारी पंडित गायकवाड, सुमित भेंडे, कोळी, सुनील गादे, बिराप्पा बंडागर व सचिन गायकवाड यांचाही सन्मान करण्यात आला.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### ज्येष्ठ नागरिकांने खाल्ल्या टीबीच्या एकदम ५० गोळ्या

**सोलापूर, दि. ११ जून-**
घरगुती वादातून ज्येष्ठ नागरिकाने टीबी आजाराच्या ५० गोळ्या एकदमात खाऊन टाकल्याची घटना मोदी परिसरात बुधवारी रात्री घडली. शिवराम म्हेत्रे ( वय ६५, रा. मोदी, जय शंकर तालीम सोलापूर) असे व्यक्तीचे नाव आहे. त्रास होऊ लागल्याने त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात शिवलिंग म्हेत्रे यांनी दाखल केले.

### खांब पडून अल्पवयीन भावंडं जखमी

**सोलापूर, दि. ११ जून-**
घराजवळ खेळताना सिमेंट खांब अंगावर पडल्याने दोन बालके मार लागून जखमी झाली. ही घटना मोहोळ तालुक्यातील रामहिंगणीत बुधवारी घडली. सोहम मुजमुले (वय १२) आणि ईश्वरी मुजमुले ( वर ६, दोघे रा. पवनेर ,तालुका परळी सध्या रा. रामहिंगणी) अशी जखमी भावंडांची नावे आहेत. ते दोघे बुधवारी दुपारी घराजवळ खेळत असताना जवळचा सिमेंट खांब त्यांच्या अंगावर पडला. त्यात दोघे मार लागून जखमी झाले. त्यांना मोहोळच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून शासकीय रुग्णालयात वडीलांनी दाखल केले .

### जुन्या रागातून बहीण, भावास मारहाण

**सोलापूर, दि. ११ जून-**
मागील भांडणाचा राग मनात धरून एका बहीण भावाला दगड व लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील जुनोनी येथे बुधवारी सायंकाळी घडली. अनिता अण्णा अवघडे (वय २५ ) आणि विजय अवघडे ( वय १७ ,दोघे रा. जुनोनी) असे मारहाण झालेल्या बहिण व भावाचे नाव आहे. दोघे बुधवारी सायंकाळी घराजवळ असताना त्यांना मधुकर अवघडे, धनाजी अवघडे व इतर दोन ते तीन जणांनी मिळून मारहाण केली. त्यांना मंगळवेढा आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात गुरुवारी पहाटे तीन वाजता दाखल केले.

### मारहाण करून उचलून आपटले

**सोलापूर, दि. ११ जून-**
शेतातला पाईप का फोडलास असे म्हणून पांडुरंग सहदेव पाटील (वय ४३ वर्ष रा पितापूर) यांना लक्ष्मण पाटील, बसवराज पाटील या दोघांनी मिळून मारहाण करून उचलून आपटले. ही घटना अक्कलकोट तालुक्यातील पितापूर बस स्टॅन्ड जवळ आज गुरुवारी सकाळी नऊ वाजता घडली. सर्व अंगाला मुका मार लागल्याने ते उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात सकाळी दाखल झाले.

### राजकीय वैमनस्यातून मारहाणप्रकरणी आरोपींची शिक्षा कायम

**बार्शी, दि. ११ जून-**
राजकीय वैमनस्यातून मारहाणप्रकरणी सहा जणांना बार्शी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांनी ठोठावलेली शिक्षा बार्शी येथील न्यायाधीश पी. डी. सुभेदार यांनी कायम ठेवली आहे. दि. १ मे १९९८ रोजी पिंपळगाव (धस) येथे गणपत धस व दशरथ देवकते यांना हनुमंत हरी धस, सुरेश विठ्ठल धस, भाऊसाहेव गौतम कांबळे, धनाजी प्रभु वाघमोडे, बाळु शिवदास धस, दत्तात्रय विठ्ठल ऊर्फ शिवदास धस, बलभीम वसंत वाघमोडे आदींनी राजकीय वैमनस्यातून मारहाण केल्याने त्यांच्याविरूध्द बार्शी येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी राऊत यांनी भादंवि. कलम १४३, १४७, १४८, ३२३, ३२४, ३२५, ३२६ व बॉम्बे पोलिस अॅक्ट कलम १३५ प्रमाणे दि. १९ डिसेंबर २०१८ रोजी दोषी ठरवून सर्व कलमांखाली ६ वर्ष शिक्षा व दंड असे आदेश केले होते. त्याविरोधात आरोपींनी अपील दाखल केले होते.

अपीलामध्ये आरोपींचे वकील अॅड. धनंजय माने व अॅड. आर. आर. पाटील तर मूळ फिर्यादी व सरकारी पक्षातर्फे सरकारी पक्षातर्फे अॅड. एम१. पी. धस व अॅड. डी. एम. धस यांनी काम चालवले. सरकारी पक्षातर्फे अॅड. एम. पी. धस व अॅड. डी. एम. धस यांनी केलेला युक्तीवाद व प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांसमोर झालेले ११ साक्षीदार व सरकारी पक्षाने दिलेले पुरावे ग्राह्य धरुन जिल्हा न्यायालय, बार्शी येथील न्यायाधीश पी. डी. सुभेदार यांनी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी बार्शी यांनी दिलेले शिक्षा व दंड कायम ठेवून सर्व आरोपींचे अपील रद्द केले. सुमारे २८ वर्षानंतर केस निकाली झाल्यानंतर पिडीतांना न्याय मिळालेला आहे.

## निधन वृत्त...

### रफिक दौलताबादकर



**सोलापूर, दि. ११ जून-**
तेलंगी पाच्छा पेठ येथील रहिवाशी म. रफिक महिबूबसाब दौलताबादकर (वय ४८) यांचे मंगळवारी संध्याकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी दफनविधी जडेसाब मुस्लिम कब्रस्तान येथे करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, दोन भाऊ, तीन विवाहित बहिनी असा परिवार आहे.

### दत्तात्रय बुधनेर



**सोलापूर, दि. ११ जून-**
डोणगाव रोड सलगरवस्ती येथील दत्तात्रय भगवान बुधनेर (वय ६७) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, एक मुलगा, सून व ३ मुली असा परिवार आहे. सलगवरवस्ती येथील विठ्ठल रुक्मीणी मंदीरचे ते विश्वस्त व नवरात्र तरुण मंडळाचे आधारस्तंभ होते.

### कैलास नागणे



**सोलापूर, दि. ११ जून-**
डोणगाव रोड सलगरवस्ती येथील कैलास आनंदा नागणे (वय ५३) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले असा परिवार आहे. ते लष्कर येथील समता मराठी विद्यालयात सहशिक्षक म्हणून कार्यरत होते.

# पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार मूर्तीचे जतन

## पंढरपूर श्री विठ्ठल - रुक्मिणी मुर्तीबाबत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे स्पष्टीकरण

### मंदिरात तज्ज्ञ व्यक्तींमार्फत निरीक्षण; आषाढी यात्रेपुर्वी पुर्ण करणार काम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ जून-**
श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे जतन वसंवर्धन करण्यासाठी गुरुवारी मंदिरात तज्ज्ञ व्यक्तींमार्फत निरीक्षण करण्यात आले. आषाढी यात्रेपूर्वी मूर्तीचे दीर्घकालीन जतन व संवर्धन करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक सल्ला- मसलत करून निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिली.

बैठकीस मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समिती सदस्य, सल्लागार परिषद सदस्य, स्थानिक महाराज मंडळी, भारतीयपुरातत्त्व सर्वेक्षण व राज्य पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, मूर्ती संवर्धन तज्ज्ञ तसेच पत्रकार प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, भारतातील एकमेव असे मंदिर आहे





जिथे भाविकांना पददर्शन घेता येते. मूर्ती दीर्घकाळ टिकावी यासाठी तिचे जतन व संवर्धन अत्यावश्यक आहे. वज्रलेप करण्याबाबत तज्ज्ञांनी आपली मते मंडली असून कोणती पद्धत वापरायची याबाबत पुरातत्त्व विभागाचा सल्ला घेऊन दोन ते तीन दिवसांत निर्णय घेण्यात येईल. नित्योपचारात दही, दूध, मध यांसारख्या पदार्थांचा वापर होत असल्याने मूर्तीच्या आतील बाजूस काही नुकसान झाले आहे का, याची तपासणी करण्यासाठी लायडार स्कॅन करण्याचा प्रस्ताव मांडला. मात्र स्कॅनिंगमुळे मूर्तीला हानी होऊ शकते का, याचा अभ्यास करूनच निर्णय घेण्यात येईल. यासाठी केंद्रशासनाची परवानगी आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले की, श्री विठ्ठलाची मूर्ती स्वयंभू असून वारकरी भाविकांचा श्वास आहे. मूर्तीचे जतन व संवर्धन मंदिर समितीमार्फत पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येईल. वज्रलेप करण्यास समितीचा विरोध नाही, मात्र सर्व महाराज मंडळी व तज्ज्ञांच्या सामोपचाराने निर्णय घेतला जाईल. कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले की, मूर्ती जतन आणि संवर्धनाच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजनांसाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर तसेच राज्यपुरातत्त्व विभागाच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सल्लामसलत करून पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात येईल.

बैठकीत पद्मश्री एस.सुब्रमण्यम, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण छत्रपती संभाजीनगरचे उपाधीक्षक डॉ.विनोद कुमार, सेवानिवृत्त अधिकारी विलास मंगीराज, सहाय्यक संचालक डॉ.विलास वाहने, आशीर्वाद ऐरानी, विकास सावंत व महेशाचार्य उत्पात यांनी मूर्ती संवर्धनासंदर्भातील तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले. श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची मूर्ती प्राचीन असून पूर्वीपासून नैसर्गिक पद्धतीने वज्रलेपन करण्यात येत होते. हीच पद्धत पुढेही वापरावी, अशी सूचना रामकृष्ण महाराज वीर यांच्यासह अन्य महाराज मंडळींनी केली.

## आज ग्राहक पंचायतीचे सत्याग्रह आंदोलन

### अनियंत्रित एमआरपीची लूट थांबवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ जून -**
वस्तुंवर छापलेल्या अनियंत्रित एमआरपी किंमतीद्वारे सुरू असलेली ग्राहकांची लूट थांबवण्याच्या मागणीसाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने १२ जून रोजी देशव्यापी सत्याग्रह आंदोलन करणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तहसील कार्यालय परिसरात ते होणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

ग्राहकांना योग्य दरात वस्तू व सेवा मिळाव्यात म्हणून वस्तुची किरकोळ विक्रीची कमाल किंमत छापण्याचे शासनाने बंधनकारक केले. मात्र याचा गैरफायदा घेत अवाजवी एमआरपी छापून ग्राहकांची लूट चालू आहे. त्याविरोधात ग्राहक पंचायत प्रयत्न करीत आहे. शासनाकडून प्रतिसाद मिळाला नसल्याने आंदोलन अधिक तीव्र करणार आहे.

१ मेपासून देशभरातील ग्राहकांकडून अवाजवी एमआरपीविरुद्ध पंतप्रधान, अर्थमंत्री, वाणिज्य मंत्री, उद्योग मंत्री, ग्राहक संरक्षणमंत्री यांना लाखो ईमेल पाठवत आहेत. स्वाक्षरी मोहीमही सुरू आहे.

एमआरपी कायदा रद्द करण्यासाठी आणि उत्पादन खर्चावरील नफा २०-३०% पर्यंत मर्यादित ठेवण्यासाठी कायदा करावा यासाठी १२ जून रोजी नवी दिल्ली येथील जंतरमंतर व प्रत्येक तहसील कार्यालय याठिकाणी सत्याग्रह/ धरणे आंदोलन केले जाणार आहे. आंदोलनासंदर्भात नुकतीच बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये, पंढरपूर तालुकाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, सचिव महेश भोसले, सहसचिव आझाद अल्लापूरकर, कोषाध्यक्ष सागर शिंदे, कार्यकारिणी सदस्य मंगेश देशपांडे, अमोल अभंगराव, शाम तापडिया, सुमित पारखे आदी उपस्थित होते.




## ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**
कोणत्याही उत्कृष्ट कार्याची पोचपावती म्हणजे त्याची घेतलेली दखल आणि कौतुक होय, याच उद्देशाने ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये दरवर्षी विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्यासाठी 'वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा' आयोजित केला जातो. याही वर्षी हा सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, एजीपीपीआय चे उपप्राचार्य प्रा. एस. के. मोहिते आणि सर्व विभागांचे विभागप्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते. या सोहळ्यात शैक्षणिक अभ्यासक्रमांतर्गत प्रत्येक विभागातून प्रथम व द्वितीय क्रमांक पटकवणारे विद्यार्थी, तसेच सांस्कृतिक विभागांतर्गत आयोजित मेहंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, विविध वेशभूषा, पारंपारिक वेशभूषा, नृत्य, गायन आणि विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यासोबतच क्रीडा विभागातून क्रिकेट, बॅडमिंटन, चेस, व्हॉलीबॉल, खो-खो, योगासने यामध्ये चमकदार कामगिरी करणारे संघ, वैयक्तिक खेळाडू आणि वर्षभरात उत्तम कामगिरी करणाऱ्या सर्व विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले, तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत कौतुक केले. या सोहळ्यासाठी विद्यार्थ्यांचे पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष एस. ए .पाटील, सेक्रेटरी. एस. एस. पाटील आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांनी देखील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन पूर्वा लोंढे व श्रेयस देशपांडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. मेघा बिराजदार यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. पाटील पी. एस., प्रा. मेघा बिराजदार, प्रा. अक्षया घालीमठ, प्रा. देशमुख, प्रा. सुधन्वा देशपांडे आदींनी परिश्रम घेतले.

## पांडुरंगाच्या दर्शनाने आत्मिक समाधान मिळते : ह.भ.प.नामदास महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**
वारकऱ्याने पांडुरंगाशिवाय दुसरा कोणताही देव मानलेला नाही. परमात्मा पांडुरंग हेच वारकऱ्यांचे एकमेव दैवत आहे. पांडुरंगाच्या दर्शनाने आत्मिक समाधान मिळते, असे विचार श्री.संत नामदेव महाराजांचे व फड परंपरेचे वंशज ह.भ.प.माधवबाबा महाराज नामदास यांनी मांडले.

अधिक मासानिमित्त दमाणी नगरातील गड दर्शन समाज मंदिरात ह.भ.प.माउली महाराज बचुटे - सवाळकर शिष्य-मित्र परिवाराच्यावतीने कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी सकाळच्या सत्रात ह.भ.प.माधवबाबा महाराज नामदास यांचे कीर्तन पार पडले. नामदास महाराज म्हणाले, एकादशीचे व्रत सर्वात श्रेष्ठ व्रत आहे.दिवसभर चर पण एकादशी कर, असे विनोदाने म्हंटले जाते. कीर्ती आणि नामाचा महिमा वाढण्यासाठी एकादशी व्रत केले पाहिजे. ज्ञानेश्वर महाराज सर्वव्यापी आहेत.





पांडुरंगासारखं दुसरे दैवत नाही. राजालासुद्धा पांडुरंगासमोर नतमस्तक व्हावे लागले आहे. देवाबद्धल अनेकांच्या शंका आहेत. वार आला की माणसाचा देव बदलतो, असे सांगत नामदास महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून दृष्टान्त देत सावळ्या विठुरायाचा महिमा विषद केला.

कीर्तनाचे चार प्रकार आहेत.नाम कीर्तन, विडा कीर्तन, स्वरूप कीर्तन, गुण कीर्तन. नाम कीर्तन सर्वात सोपे कीर्तन आहे.कीर्तनाची देवाला मोठी आवड आहे. पुंडलिकांच्यासमोर नामदेवाचे कीर्तन सुरू असताना साक्षात पांडुरंग टाळ घेऊन उभे होते.जनाबाईची अज्ञा शिरसावंध मानून ज्ञानेश्वर महाराज उठले आणि कीर्तनात रंगून गेले. देवाचे सतत नामस्मरण करतात त्यालाच कीर्तन म्हणतात. प्रत्येक संतांच्या वाङ:मयाचा विचार केला तर सर्व किर्तनकारांनी त्यावर कीर्तन केले पाहिजे.

श्रोत्यांना त्याची ओळख झाली पाहिजे. कीर्तनात नाचावं मात्र नको तिथे नाचू नये. समाज इतका खाली आला आहे, की महिलासुद्धा लग्नात नाचत आहेत. लग्नात हलगी वाजू लागली आहे, यासारखे दुर्देव काय? अशी खंतही नामदास महाराजांनी व्यक्त केली.

साधनं अनेक आहेत, मात्र नाम संकिर्तनासारखे दुसरे साधन नाही. संत संगत निरंतर करा, असेही ते म्हणाले.

## बार्शी शहर पोलिसांची गुटखा विरोधी कारवाई; ९ हजार ३७६ रुपयांचा गुटखा जप्त

### बारंगुळे प्लॉट परिसरात छापा; एक आरोपी ताब्यात, पुरवठादार फरार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ११ जून-**
बार्शी शहर पोलिसांनी गुटखा व तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या साठा व विक्रीविरोधात कारवाई करत बारंगुळे प्लॉट परिसरातून ९ हजार ३७६ रुपयांचा गुटखा सदृश्य प्रतिबंधित साठा जप्त केला आहे. एका आरोपीस ताब्यात घेतले. पुरवठादाराचा शोध सुरु आहे.

पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे गुरुवार दि. ११ रोजी सकाळी ११.१५ वाजण्याच्या सुमारास बारंगुळे प्लॉट येथील शाहिद शब्बीर शेख (वय ३१) यांच्या घरी छापा टाकला.घरातील स्टोअर रुममध्ये विविध प्रकारचा गुटखा, पानमसाला व जर्दा स्वरुपातील प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा सापडला. दोन पंचांच्या उपस्थितीत राजनिवास सुगंधित पान मसाला, के.आर. गुटखा, झेडएल-०१ जाफराणी जर्दा, गोवा गुटखा असा एकूण ९,३७६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. चौकशीदरम्यान शाहीद शेख याने हा माल पुरवठादार 'बाबू' नावाच्या व्यक्तीकडून खरेदी केल्याचे सांगितले आहे. या प्रकरणी शाहीद शब्बीर शेख तसेच पुरवठादार बाबू (पूर्ण नाव व पत्ता अज्ञात) यांच्याविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ मधील संबंधित कलमांसह भारतीय न्याय संहिता कलम २२३, २७४, २७५, १२३ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला. प्रकरणाचा तपास बार्शी शहर पोलीस करीत आहेत.

## स्पा मसाज सेंटरच्या आडून जुगार अड्डयावर छापा

### बार्शी तालुका पोलिसांची कारवाई; 12 लाख 31 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त;

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ११ जून-**
अवैध व्यवसायांविरोधात विशेष मोहिमेअंतर्गत बार्शी तालुका पोलिसांनी मोठी कारवाई करत नागोबाचीवाडी हद्दीतील बायपासवरील एका स्पा मसाज सेंटरच्या आडून सुरु असलेला जुगार अड्डा उद्ध्वस्त केला. कारवाईत १२ लाख ३१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. १० जणांना ताब्यात घेतले आहे.

बार्शी तालुका ग्रामीण पोलिस ठाण्याचे पथक रात्र गस्तीवर असताना त्यांना नागोबाचीवाडी हद्दीत असलेल्या 'लक्झरी डिलक्स स्पा मसाज सेंटर'मध्ये 'तिरट' नावाचा जुगार खेळला जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने यांच्या नेतृत्वाखालील पथकाने बुधवार दि.१० जून रोजी मध्यरात्री २.१५ वाजण्याच्या सुमारास स्पा सेंटरवर छापा टाकला. यावेळी आतमध्ये १० जण जुगार खेळताना रंगेहाथ आढळून आले.




प्राथमिक तपासात सदर जुगार अड्डा आकाश हनुमंत काशीद (रा. कसबा पेठ, बार्शी) आणि स्पा सेंटरचा व्यवस्थापक बाळू चौधरी यांच्या संगनमताने चालविला जात असल्याचे निष्पन्न झाले. मात्र पोलिसांच्या कारवाईची चाहूल लागताच बाळू चौधरी घटनास्थळावरुन फरार झाला. यावेळी आकाश काशीद, मतीन शेख, रामा कबाडे, शंतनू कदम, जमीर पटेल, किरण दहिहांडे, संदीप वाणी, उदय ढेरे, शाम नायकोजी (सर्व रा. बार्शी), नितीन उबाळे (रा. चिंचगाव, ता. माढा) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

त्यांच्याकडून रोख, ९ महागडे मोबाईल फोन, दोन दुचाकी, स्कार्पिओ चारचाकी वाहन असा एकूण १२ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुरेश बिरकले यांच्या फिर्यादीवरुन बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल सोमनाथ खांडेकर हे करीत आहेत. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि सहाय्यक पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश माने, पोहेकॉ सोमनाथ खांडेकर, पोकॉ सुरेश बिरकले, पोकॉ महंमदगौस महेदी आणि चालक लक्ष्मण चिट्टलवाड यांनी केली.

# शरद राष्ट्रवादीला धक्का; आ. जानकर, नारायण पाटील, अभिजित पाटील 'भाजपा'च्या बैठकीला

- प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्या उपस्थित सोलापुरातील बैठक ठरणार का 'गेमचेंजर'?
- 'शेकाप'चे सांगोल्याचे आ.बाबासाहेब देशमुख तर पालकमंत्र्यांसोबतच
- एकतर्फी वाटणारी सोलापूर विधानपरिषदेच्या निवडणुकीत कमालीची रंगत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**

सुरुवातील एकतर्फी वाटणारी सोलापूर विधानपरिषदेची निवडणूक भलतीच रंगात आल्याचे चित्र आहे. शरद राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष पंढरपूरचे वसंतराव देशमुख यांनी उमेदवारी कायम ठेवल्याने विजयाबाबत निश्चिंत असलेली भाजपा आणि उमेदवार राजाभाऊ राऊत कमालीचे सक्रीय झाले आहेत. विजयाबद्दल शंका नसतानाही भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना सोलापुरात भाजपा मित्रपक्षांची बैठक घ्यावी लागली आहे. मित्रपक्ष शिवसेनेसह 'शेकाप'चे आमदार बाबासाहेब देशमुख हेदेखील पालकमंत्र्यांच्या खांद्याला खांदा लावून या निवडणुकीत सक्रीय झाल्याचे चित्र आहे. प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी बंद दालनात भाजपा पदाधिकारी आणि मित्रपक्षांना कानमंत्र दिल्याने सर्वजण भाजपा उमेदवार राजाभाऊ राऊत यांना विजयी करण्यासाठी मनापासून काम करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या तोंडावर सोलापूरच्या राजकारणात अनपेक्षित घडामोडींना वेग आला असून, बालाजी सरोवर येथे झालेल्या एका बैठकीने नव्या राजकीय चर्चांना जन्म दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे तीन आमदार 'भाजपा'चे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झालेल्या महायुतीच्या बैठकीत दिसून आल्याने जिल्ह्यातील राजकीय समीकरणांबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे. महायुतीचे उमेदवार राजेंद्र राऊत आणि महाविकास आघाडीचे उमेदवार वसंत देशमुख यांच्यात विधान परिषदेसाठी थेट लढत रंगली असताना ही बैठक विशेष महत्त्वाची मानली जात आहे. माढाचे आमदार अभिजीत पाटील, करमाळ्याचे आमदार नारायण पाटील आणि माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांची उपस्थिती अनेक राजकीय प्रश्न निर्माण करणारी ठरली आहे. विशेष म्हणजे, सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे चार आमदार असताना त्यापैकी तीन आमदार महायुतीच्या बैठकीत दिसल्याने विरोधी गटांमध्ये अस्वस्थता निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. मात्र या उपस्थितीचा अर्थ पक्षांतर असा लावणे घाईचे ठरेल, असे मत राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका, विकासकामे आणि भविष्यातील राजकीय समन्वय या दृष्टीनेही अशा बैठकींकडे पाहिले जात आहे. दरम्यान, वसंत देशमुख यांच्या उमेदवारीपासूनच काही नेत्यांमध्ये मतभेद असल्याच्या चर्चा सुरू होत्या. विशेषतः आमदार उत्तम जानकर यांनी उमेदवारीबाबत व्यक्त केलेली भूमिका आणि त्यानंतरच्या घडामोडी यामुळे या निवडणुकीचे राजकारण अधिकच रंजक बनले आहे. त्यामुळे ही उपस्थिती केवळ शिष्टाचाराचा भाग आहे की भविष्यातील नव्या राजकीय समीकरणांची नांदी? याबाबत उत्सुकता वाढली आहे.






### शरद राष्ट्रवादीचे तीन, शेकाप आमदार भाजपात जाणार का?

पालकमंत्री जयकुमार गोरे, भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार राजन पाटील, यशवंत माने, माजी आमदार राम सातपुते, शिवसेना शिंदे पक्षाचे खासदार ज्योती वाघमारे, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, शहाजी पवार, शिवसेनेचे नगरसेवक अमोल शिंदे यांच्यासोबत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे माढ्याचे आमदार अभिजीत पाटील, करमाळ्याचे आमदार नारायण पाटील, माळशिरसचे आमदार उत्तम जानकर या तीन आमदारांची महायुतीच्या बैठकीला उपस्थिती होती. सांगोल्याचे शेकापचे आ. बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दिलीप माने, माजी आमदार शहाजीबापू पाटील, माजी आमदार संजयमामा शिंदे, करमाळ्याच्या जि.प. सदस्य रश्मी बागल, सांगोल्याचे चेतनसिंह केदार, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, विक्रम देशमुख, पक्षनेते नरेंद्र काळे हे या बैठकीला उपस्थित होते. विधान परिषद निवडणुकी दरम्यान राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे तीन आमदार भाजपात प्रवेश करणार का? अशीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### महायुती धर्माचे पालन करणार : खा.प्रा.ज्योती वाघमारे

सोलापूर विधानपरिषद निवडणुकीत शिवसेना महायुती धर्माचे पालन करणार असून याबाबत आमचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तशा सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे सोलापूर विधानपरिषद निवडणुकीत महायुतीचे उमेदवार राजाभाऊ राऊत विजयी होतील, यात शंका नाही असे खा. ज्योती वाघमारे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना सांगितले.

सध्या तरी बालाजी सरोवरातील या बैठकीने एक संदेश स्पष्ट दिला आहे. सोलापूरच्या राजकारणात विधान परिषद निवडणूक ही केवळ एक निवडणूक नसून आगामी महापालिका, जिल्हा परिषद आणि विधानसभा राजकारणाची दिशा ठरवणारा महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. त्यामुळे या निवडणुकीचा निकाल आणि त्यानंतरच्या राजकीय हालचालींकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

**सर्व विरोधकही एकत्र येणे हे पुढील राजकारणासाठी महत्वाचे : रविंद्र चव्हाण**

महायुती मित्रपक्षासह शरद राष्ट्रवादीचे तीन आमदार, शेकाप आमदार आजच्या बैठकीसाठी एकत्र येणे ही पुढील राजकारणासाठी महत्वाचे ठरणार असल्याचे सूचक विधान भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांनी आज सोलापुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना केले. महायुतीचे उमेदवार राजाभाऊ राऊत हे निश्चित विजयी होतील आणि सोलापूरच्या विकासासाठी पुढाकार घेवून काम करतील. राज्यातील एकूण १७ विधानपरिषद जागांपैकी ६ जागा बिनविरोध झाल्या असून उर्वरित जागांवरही महायुतीच विजयी होईल, असा विश्वास चव्हाण यांनी व्यक्त केला. चव्हाणांच्या सूचक विधानामुळे विरोधी पक्षाचे आमदार भविष्यात भाजपामधील जातील, अशीही चर्चा रंगली होती.

**थेट शरद पवारांना मोठा धक्का**

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील हे आणि विधान परिषद उमेदवार वसंत देशमुख यांना सोबत घेऊन सोलापूर जिल्हाभर दौरे करत आहेत. पण पहिल्या दिवसापासून आमदार उत्तम जानकर यांनी वसंत देशमुख यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. धैर्यशील मोहिते पाटील यांनी याबाबत पत्रकार परिषदेत उत्तर देताना सांगितले होते, आमच्या घरातला विषय आहे, आम्ही घरात बसून मिटवू. मात्र आमदार उत्तम जानकर यांची मनधरणी यशस्वी नाही झाली का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यानंतर आता सोलापूर विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा विजय होतो की महाविकास आघाडीचा विजय होतो? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, बिनविरोध निवडणूक होणार असे वाटत असतानाच मोहिते-पाटलांमुळे ही निवडणूक लागल्यामुळे सर्वच ६१६ मतदार मनातून खुश असल्याचीही चर्चा रंगली आहे. तर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी सोशल मिडियावर जोरदार प्रचाराद्वारे पालकमंत्र्यांची दादागिरी आणि पक्षातील आमदार, नेत्यांसह मित्रपक्षांच्या नेत्यांना अपमानाची वागणूक दिल्याचा बदला मतदारांनी घ्यावा, असेही आवाहन केले जात आहे.

## बहिणीला भेटायला आलेल्या भावास मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**



बहिणीला भेटण्यासाठी तिच्या घरी आलेल्या एका भावाला लाथाबुक्याने मारहाण करण्यात आल्याची घटना माढा तालुक्यातील बारलोणी येथे घडली. अण्णा राजाराम वाघमारे (वय-४०, रा. गुरसाळे, ता.पंढरपूर) असे मारहाण झालेल्या भावाचे नाव आहे. कुर्डुवाडी येथे राहणारा अण्णा वाघमारे हा बारलोणी येथे बहिणीला भेटण्यासाठी तिच्या घरी गेला असता तुम्ही इथे का आलात? असे म्हणत हणमंतू नवले, सिद्धेश्वर नवले यांनी लाथाबुक्याने मारहाण केली. कुर्डुवाडी येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात तो स्वतः दाखल झाला.

## न्यायाधीश निवासस्थानी बंदोबस्तावरील सुरक्षारक्षकाचा हृदयविकाराने मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**



न्यायाधीश निवासस्थानी बंदोबस्तावरील एका सुरक्षा रक्षकाचा हृदयविकाराच्या झटक्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना कुमठा नाका क्रीडा संकुल समोरील न्यायाधीश निवासस्थान येथे गुरुवारी सकाळी ६ वाजता घडली. सचिन नागनाथ वाघमरे (वय-२९, रा.आंबेगाव, ता.पंढरपूर) असे मयत जवानाचे नाव आहे.

सचिन वाघमारे हे गुरुवारी सकाळी ममता न्यायाधीश निवासस्थान येथे सुरक्षा गार्ड म्हणून ड्युटीवर असताना त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन ते खाली पडले. सहकाऱ्यांनी त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले. पुढील उपचारार्थ त्यांचा मामा नानासाहेब ननावरे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. गेल्या चार-पाच महिन्यापूर्वीच त्यांचे लग्न झाले होते.त्याच्या पश्चात आई, पत्नी, एक भाऊ असा परिवार आहे.



## काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांचा माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, ज्येष्ठ नेत्या उज्वलाताई शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**

सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या वाढदिवसानिमित्त माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, ज्येष्ठ नेत्या उज्वलाताई शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, नगरसेवक नरसिंह आसादे, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार यांच्यासह सुनील रसाळे, तिरुपती परकीपंडला, भीमाशंकर टेकाळे, प्रा.सिद्राम सलवदे, संजय गायकवाड, सुभाष वाघमारे, परशुराम सत्तारेवाले, लखन गायकवाड, व्यंकटेश बोम्मेन, नासिर बंगाली, नागेश म्याकल, साहिल शिंदे, अभिलाष अच्युगटला आदी उपस्थित होते.

सोलापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांचा प्रवास हा पदाच्या मागे धावण्याचा नसून संघर्ष, निष्ठा आणि सातत्यपूर्ण जनसेवेचा आहे. काँग्रेस पक्ष कठीण काळातून जात असताना, अनेकांनी राजकीय सोयीसाठी आपले मार्ग बदलले. मात्र अशा परिस्थितीतही सातलिंग शटगार यांनी कधीही पक्षाशी निष्ठा सोडली नाही. कार्यकर्त्यांवर अन्याय होत असताना, जनतेचे प्रश्न दुर्लक्षित होत असताना आणि पक्षाला मजबूत नेतृत्वाची गरज असताना त्यांनी काँग्रेसचा झेंडा खांद्यावर घेऊन संघर्षाचा मार्ग निवडला, असे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले.

जिल्हाध्यक्षपद स्वीकारल्यानंतर सातलिंग शटगार यांनी अक्षरशः पायाला भिंगरी बांधल्याप्रमाणे संपूर्ण जिल्हा पिंजून काढला. गावोगावी जाऊन शेतकरी, कामगार, युवक, महिला, ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांच्या भेटी घेत त्यांच्या समस्या जाणून घेण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. संघटनबांधणी, बूथस्तरावरील पक्ष मजबुतीकरण आणि नवीन कार्यकर्त्यांना संधी देण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. भाजप सरकारच्या शेतकरीविरोधी आणि जनविरोधी धोरणांविरोधात त्यांनी सातत्याने रस्त्यावर उतरुन संघर्ष केला आहे, असेही सांगण्यात आले.

## विजयदादा : लोकनेतृत्व, विकासदृष्टी आणि माणुसकीचे अजरामर पर्व

**महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे मूल्यमापन त्यांनी भूषविलेल्या पदांवरून होत नाही, तर त्यांनी जिंकलेल्या माणसांच्या मनांवरून होते. काही नेते सत्तेच्या शिखरांवर पोहोचतात, तर काही लोकांच्या हृदयात स्थान निर्माण करतात. आदरणीय विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील अर्थात सर्वांच्या प्रेमाचे 'विजय दादा' हे दुसऱ्या प्रकारातील नेतृत्व आहे. त्यांच्या नावामागे केवळ राजकीय सामर्थ्य नाही तर विश्वास, विकास, आपुलकी आणि माणुसकीची एक प्रदीर्घ परंपरा उभी आहे. अकलूजच्या सुपीक मातीतून उगवलेला हा नेतृत्वाचा वटवृक्ष आज महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक महत्त्वपूर्ण अध्याय बनला आहे. सरपंचपदापासून उपमुख्यमंत्रीपदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा केवळ राजकीय उंची गाठण्याचा इतिहास नाही; तो लोकविश्वासाच्या अखंड संचयाचा इतिहास आहे.**

-----------------------------------

सत्ता आली, पदे आली, जबाबदाऱ्या वाढल्या; पण विजयदादांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, मातीशी असलेली नाळ आणि लोकांविषयीची आस्था कधीच बदलली नाही. विजयदादांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना सर्वप्रथम आठवते ती त्यांची माणसे जोडण्याची विलक्षण क्षमता. राजकारणात अनेकदा मतभेद निर्माण होतात, समीकरणे बदलतात, भूमिका बदलतात; पण नाती जपणारे नेते फार थोडे असतात. विजयदादा हे त्यापैकी एक आहेत. त्यांनी राजकारणात प्रतिस्पर्धी पाहिले, विरोधक पाहिले; पण शत्रू निर्माण केले नाहीत. म्हणूनच महाराष्ट्रातील विविध विचारप्रवाहातील नेते त्यांच्याविषयी आदर व्यक्त करताना दिसतात. ग्रामीण महाराष्ट्राची नाडी ओळखणारा, संघटन उभारू शकणारा आणि लोकांशी थेट संवाद साधणारा नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार आणि विजयदादा हे नाते केवळ राजकीय नव्हते; ते परस्पर विश्वास, संवाद आणि सहकार्याच्या दीर्घ परंपरेतून घडलेले होते. अनेक राजकीय घडामोडी, निवडणुका, सत्ता परिवर्तन आणि संघर्ष यांच्या काळात दोघांमधील संवाद कायम राहिला. राज्याच्या विकासाविषयी असलेली समान बांधिलकी आणि ग्रामीण महाराष्ट्राविषयीची आस्था या दोन्ही नेत्यांना जवळ आणणाऱ्या महत्त्वाच्या बाबी ठरल्या. अनेकदा राजकीय विश्लेषकांनी या नात्याचा उल्लेख महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी समीकरण म्हणून केला आहे. माजी मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांच्याशीही विजयदादांचे विशेष स्नेहबंध होते. विलासरावांच्या दिलखुलास स्वभावाला आणि विजयदादांच्या संयमी नेतृत्वाला एक वेगळे पूरकत्व लाभले होते.

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्याशी असलेले त्यांचे संबंधही विशेष उल्लेखनीय होते. सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीत या दोन्ही नेत्यांचे योगदान मोठे राहिले आहे. मतभेदांचे प्रसंग आले, राजकीय स्पर्धाही झाली; पण सार्वजनिक जीवनातील परस्पर आदर कधी कमी झाला नाही. लोकशाही व्यवस्थेत मतभेद असू शकतात; मनभेद नसावेत, याचे उदाहरण म्हणून



या नात्याकडे पाहिले जाते. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे यांच्याशीही विजयदादांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. राजकीय विचारधारा वेगळ्या असल्या तरी वैयक्तिक मैत्री, परस्पर आदर आणि संवाद यांचे महत्त्व त्यांनी जपले. महाराष्ट्राच्या राजकारणात एका काळी मतभिन्नतेपलीकडे जाऊन स्नेहसंबंध टिकवणाऱ्या नेतृत्वाची जी परंपरा होती, तिचे प्रतिनिधित्व विजयदादा आणि त्यांच्या समकालीन नेत्यांनी केले.

सोलापूर जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक परिवर्तनाच्या इतिहासात मोहिते-पाटील घराण्याचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. सहकार क्षेत्राला त्यांनी केवळ उद्योगाचे साधन मानले नाही, तर ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम बनविले. साखर उद्योग, दुग्धव्यवसाय, शिक्षणसंस्था, प्रक्रिया उद्योग आणि रोजगारनिर्मितीच्या माध्यमातून हजारो कुटुंबांच्या आयुष्यात आशा आणि समृध्दीचे नवे पर्व सुरु झाले. सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून त्यांची कारकीर्द महाराष्ट्राच्या विकासाच्या नकाशावर ठळकपणे अधोरेखित होते. राज्यातील रस्ते, पूल आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देताना त्यांनी दूरदृष्टी आणि नियोजन यांचा सुंदर मेळ घातला. त्यांच्यासाठी रस्ते म्हणजे केवळ वाहतुकीचे साधन नव्हते; ते ग्रामीण भागाला विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडणाऱ्या जीवनवाहिन्या होत्या.

विजयदादांच्या नेतृत्वातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची कार्यकर्त्यांशी असलेली नाळ. हजारो कार्यकर्त्यांसाठी ते आजही 'दादा' आहेत. एखाद्या कार्यकर्त्याच्या घरातील अडचण असो, एखाद्या शेतकऱ्याची समस्या असो किंवा एखाद्या विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा प्रश्न असो, विजयदादा मदतीसाठी उभे राहिल्याच्या असंख्य आठवणी आजही लोक सांगतात. त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्न हास्य, लोकांचे बोलणे शांतपणे ऐकून घेण्याची सवय, संकटसमयी दाखवलेली खंबीरता आणि कार्यकर्त्यांवर असलेला विश्वास यामुळे ते अनेक पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांच्या नेतृत्वात करारीपणा आहे, पण त्याचबरोबर मायेचा स्पर्शही आहे. म्हणूनच लोक त्यांना केवळ नेता मानत नाहीत; ते त्यांना कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याप्रमाणे मान देतात.

राजकारणात यश-अपयश, सत्ता-विरोधक, स्तुती-टीका हे सारे येत असते. विजयदादांनीही हे सर्व अनुभवले. मात्र प्रत्येक वेळी त्यांनी संयम, धैर्य आणि लोकांवरील विश्वास कायम ठेवला. त्यांनी कधीही परिस्थितीला दोष दिला नाही; उलट प्रत्येक आव्हानाला संधीमध्ये बदलण्याचा प्रयत्न केला. आज त्यांच्या सार्वजनिक जीवनाकडे मागे वळून पाहताना जाणवते की त्यांनी केवळ संस्था उभारल्या नाहीत, तर विश्वास उभारला. त्यांनी केवळ रस्ते बांधले नाहीत, तर माणसे जोडली. त्यांनी केवळ राजकारण केले नाही, तर लोकसेवेची एक संस्कृती निर्माण केली. त्यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र त्यांच्या कार्याला, त्यांच्या विकासदृष्टीला, त्यांच्या लोकसंग्रहाला आणि त्यांच्या माणुसकीला कृतज्ञतापूर्वक अभिवादन करीत आहे. त्यांच्या जीवनप्रवासातून पुढील पिढ्यांना नेतृत्व, लोकसेवा, संवाद आणि मूल्याधिष्ठित सार्वजनिक जीवनाचा अनमोल आदर्श मिळत राहील.



**-चाँद शेख**
पुणे (अकलूज)

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# अन्नत्याग ही नौटंकी : पालकमंत्री



### आंदोलनाला नाही परवानगी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ जून-**
शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी या मागणीसंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी शुक्रवार, दि.१२ जून २०२६ पासून अन्नत्याग आंदोलन करणार असल्याचे जाहीर केले. याबाबत बोलताना पालकमंत्री जयकुमार मोरे यांनी आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांविषयी आपल्याला किती आस्था आहे हे दाखवून देण्यासाठी केलेली नौटंकी म्हणावा लागेल, असा शाब्दिक टोला लगावला.

शेतकऱ्यांना दोन लाख रुपये कर्जमाफी करताना राज्यशासनाने घातलेल्या जाचक नियम व अटींमुळे अनेक शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार नाही. याकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अन्नत्याग आंदोलनास्त्र उगारले आहे. दरम्यान, सध्या अधिक महिना सुरु असून भाविकांची गर्दी लक्षात घेता या आंदोलनास परवानगी देण्यात आली नसल्याचे सांगण्यात येते.

राज्यात पुन्हा सत्तेवर येण्यासाठी 'महायुती'ने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण व शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते. सत्तेवर येऊन दोन वर्षे उलटून गेले. मात्र, शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्याकडे शासन दुर्लक्ष करत आहे. यामुळे शेतकऱ्यांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. याची दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना लवकरच कर्जमाफी करण्यात येईल, अशी घोषणा केली आहे.

# आंदोलनावर ठाम : आमदार रोहित पवार



### आंदोलनाची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ जून-**
शेतकरी बांधवांना सरसकट



कर्जमाफीबाबत महायुती सरकारने जाचक अटी व नियम घातलेले आहे. त्यामुळे ही घोषणा फसवी असल्याचे स्पष्ट होते. याकडे लक्ष वेधण्यासाठी आपण अन्नत्याग आंदोलन करणार आहे.प्रशासनाने या आंदोलनास परवानगी जरी नाकारले तरी आंदोलन करण्यावर आपण ठाम आहोत, असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सांगितले.

अधिक महिनाच्या अनुषंगाने श्रीक्षेत्र पंढरपुरात होणारी भाविकांची गर्दी, विधानपरिषद निवडणुकीची आचारसंहिता असे कारण देत प्रशासनाने या अन्नत्याग आंदोलनास परवानगी नाकारली आहे. तरीपण शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करुन आंदोलन करुच, असा पण करत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे स्थानिक पदाधिकारी आंदोलनाची जय्यत तयारी करीत आहेत.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवतिर्थावर भव्य व्यासपीठ उभारण्याचे काम सुरु आहे. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी यासाठी आमदार रोहित पवार यांनी हे आंदोलनास्त्र उगारले असून शुक्रवार, दि.१२ जून रोजी विठ्ठल मंदिराच्या नामदेव पायरीचे दर्शन व शहरातून नगरप्रदक्षिणा करुन ते आंदोलनस्थळी येऊन अन्नत्याग आंदोलनास सुरुवात करणार आहेत, असे सांगण्यात आले.

### प्रशासनाकडून आ.पवार यांना पत्र

अधिक मासानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भाविकांची मोठी गर्दी होत आहे. ही बाब लक्षात घेता आमदार रोहित पवार यांनी जाहीर केलेला अन्नत्याग आंदोलना पुर्नविचार करावा, अशा आशयाचे पत्र सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून आ. पवार यांना देण्यात आल्याचे वृत्त आहे.

# अधिकमास, अमावास्यानिमित्त बाळूमामा मंदिरात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**
अधिकमास, अमावस्यानिमित्त उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील सद्गुरु संत बाळूमामा मंदिर येथे रविवार, १४ व सोमवार, दि.१५ जून २०२६ असे दोन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील-बेलाटीकर यांनी दिली.



सोलापूर-पुणे महामार्गावरील प्रति आदमापूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेलाटी येथील बाळूमामा मंदिर परिसरात भाविकांची संख्या वाढत आहे. रविवारी दुपारी १२.२० वाजता अमावास्या प्रारंभ होत असून सोमवारी सकाळी ८.२४ वाजता अमावास्या समाप्ती होणार आहे. रविवारी व सोमवारी रुद्राभिषेक, भजन, कीर्तन, धनगरी ओव्यांचा कार्यक्रम, वृक्षारोपण आणि महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## पारशी विहीर येथे चेष्टा मस्करीत दोघा भावंडांना दगड व लाथाबुक्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**



चेष्टा मस्करीत दोघा भावंडांना दगड व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना पारशी विहिर, खमितकर शाळेजवळ बुधवारी रात्री घडली.गणेश दशरथ मैनावाले (वय २२ वर्ष , रा. शिवगंगा नगर भाग ३ ,सोलापूर) आणि निलेश दशरथ मैनावाले (वय २६ वर्ष , रा सदर) असे त्या मारहाण झालेल्या तरुणांची नावे असून या दोघांना बुधवारी रात्री पावणेअकरा वाजता निलेश लंगडेवाले, अजित कजागवाले व इतर दोन जणांनी मिळून मारहाण केली. यात दोघांना सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात विजय लंबूवाले यांनी मध्यरात्री दाखल केले.

# मोबाईलवर बोलण्याच्या कारणावरुन विवाहिता व तिच्या भावाला मारहाण

### पतीसह चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**
राहत्या घरात मोबाईल फोनवर बोलण्याच्या कारणावरुन वाद घालत एका विवाहितेला व तिच्या भावाला लाकडी बांबूने बेदम मारहाण केल्याची घटना सेटलमेंट फ्री कॉलनी ३ येथे घडली. याप्रकरणी पती प्रितम जाधव, सासू पद्मा जाधव (दोघेही रा.२ नंबर झोपडपट्टी, सोलापूर), नणंद प्रिया गायकवाड, नणंदेचा मुलगा विनायक गायकवाड (दोघेही रा.शहा नगर, सोलापूर) या चौघांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत नेहा प्रितम जाधव (वय-२५,रा.सेटलमेंट फ्रि कॉलनी नं.३, सोलापूर) यांनी फिर्याद दिली.



दि.६ जून २०२६ रोजी दुपारी यातील फिर्यादी नेहा जाधव आणि तिचा भाऊ रवींद्र हे दोघे घरी असताना वरील आरोपींनी मोबाईलवर बोलण्याच्या कारणावरुन व जुन्या कारणावरुन वाद उकरुन काढला. नणंद प्रिया गायकवाड हिने शिवीगाळ केली. पती प्रितम याने लाकडी बांबूने नेहाच्या डाव्या हातावर मारले. सासू पद्मा आणि नणंदेने केस धरुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी बहीण नेहा हिला सोडवण्यासाठी भाऊ रवींद्र हा मध्ये पडला असता, पती प्रितमने त्याच्या डोक्यात बांबू मारला आणि नणंदेचा मुलगा विनायक याने त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे. हवालदार कुंभार हे पुढील तपास करत आहेत.

## महत्वाचे...

### वाचन संस्कृती जपण्यासाठी आज व्याख्यान

**सोलापूर, दि.११ जून-**
'वाचाल तर वाचाल' हा मंत्र आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ सोलापूरतर्फे वाचन अभियानाचे प्रमुख श्रीधर खेडगीकर यांचे 'वाचन अभियान आणि आपण' या विषयावर शुक्रवार, दि.१२ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता रंगभवन जवळील हॅच फ्री मेसॉनिक हॉल येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास सोलापुरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन धनश्री केळकर यांनी केले आहे.

---

### लायन्स क्लब ऑफ सोलापूर ट्विन सिटीच्या अध्यक्षपदी शेटगार



**सोलापूर, दि.११ जून-**
लायन्स इंन्टरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर ट्विन सिटीच्या अध्यक्षपदी सातलिंग शटगार यांची निवड करण्यात आली. सन २०२६-२७ या वर्षासाठी निवडण्यात आलेले इतर पदाधिकारी असे; अन्य पदाधिकारी असे : सचिव-सोमशेखर भोगडे, खजिनदार-नागेश बुगडे, प्रथम उपाध्यक्ष-संतोष जाधव. यावेळी अध्यक्ष डॉ.कृष्णा चंडक, सचिवा नंदिनी जाधव, खजिनदार प्रभाकर जवळकर, झोन चेअरमन सोमशेखर भोगडे, माजी प्रांतपाल एम.जे.एफ.ममता बुगडे, एम.जे.एफ.डॉ नारायणदास चंडक, डॉ. राहुल चंडक, मुकुंद जाधव, सागर पुकाळे आदी उपस्थित होते.

---

### कुंभार समाजातील गुणवंतांना आवाहन

**सोलापूर, दि.११ जून-**
अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील नीलम श्रमजिवी नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने इयत्ता दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत ७५ टक्क्यांहून अधिक गुण घेतलेल्या कुंभार समाजातील विद्यार्थ्यांनी गुणपत्रिका व मोबाईल नंबरसह विठ्ठल कुंभार (९४२३५२६०७१), चंद्रकुमार कुंभार (९३७००२०३९६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी केले.

## गणेश हौसिंग सोसायटी पुनर्विकासाला सभासदांचा विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**

**बांधकाम प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याचा केला आरोप**

सोलापूर शहरातील होटगी रोडवरील श्री गणेश फ्लॅट ओनर्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीतील सर्व ११ बिल्डिंग पुनर्विकास करण्यास सभासदांचा विरोध आहे. बांधकाम, इतर करार आणि प्रक्रियेसंदर्भात कोणतीही पारदर्शकता नसल्याचा आरोप सभासद हेमंतकुमार बगले यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

या सोसायटीतील सर्व इमारती व सदनिका सुस्थितीत आहेत. आणखी २० ते २५ वर्ष या इमारतींना पुनर्विकासाची गरज नाही, हे बिल्डिंग ऑडिट वरून लक्षात येते. असे असताना सभासदांना विश्वासात न घेता सोसायटीच पुनर्विकास करण्याचा घाट घातला जात आहे. त्या अनुषंगाने रहिवाशांना सदनीका रिकामी करण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप यावेळी त्यांनी केला. पुनर्विकास करण्यासाठी बिल्डर कोण आहे? काय करार झाला आहे ? हे सभासदांना माहित नाही. संचालक मंडळाकडून सभासदांना विश्वासात घेतले नाही. काही फ्लॅटची तोडफोड करण्यात आली आहे. खोटी आश्वासने देऊन सभासदांना बेकायदेशीर नोटीस देण्यात येत आहे. महापालिकेकडून पाडकाम परवाना न घेता फ्लॅटचे नुकसान केले आहे. पाडकाम बांधकाम परवाना देण्यात येऊ नये यासंदर्भात काही सभासदांकडून महापालिका आयुक्त व इतर अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. पाडकाम बांधकाम परवानासाठी संबंधित संचालकांनी महापालिकेला प्रस्ताव दिला आहे. त्यास सभासदांची हरकत आहे. या सोसायटीच्या जागेवर कब्जा करण्याचा प्रयत्न काही जणांकडून केला जात असल्याचा आरोप यावेळी बगले यांनी केला आहे. जाणून बुजून जमिनीची मालकी हक्क सोसायटीला देण्यास टाळाटाळ केली आहे. यामुळे सोसायटी पुनर्विकासाला अडथळा निर्माण झाला आहे. सोसायटीतील इमारती धोकादायक नसतानाही महापालिका कर्मचाऱ्यांकडून इमारत धोकादायक असल्याची नोटीस सर्व इमारतींवर डकवली आहे. या पत्रकार परिषदेस विलास कुलकर्णी, कपिल हलकुडे, रेखा अहिरवाडे आदी उपस्थित होते.



# रात्रीच्या पाणीपुरवठ्याने स्वागतनगरकर हैराण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**
प्रभाग क्रमांक २१ मधील स्वागत नगर भाग-१ येथे अनेक वर्षांपासून रात्री उशिरा आणि कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांचे हाल होत आहे. या भागात कामगार वर्ग मोठ्या संख्येने राहतात. त्यामुळे स्वागतनगरकर हैराण झालेले आहेत, असे अभिनव सामाजिक संस्थेने महापौर विनायक कोंड्याल यांच्याकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत कष्टाची कामे करूनही या भागात रात्री १० नंतर पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे नागरिकांना रात्री उशिरापर्यंत पाणी भरण्यासाठी जागरण करावे लागते. या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठ्याची वेळ सायंकाळी ५ ते ६ किंवा पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास निश्चित करण्यात यावी, जुन्या व अरुंद पाईपलाईन बदलून मोठ्या पाईपलाईन बसवाव्यात, अशी मागणी करण्यात आली. त्यामुळे कमी वेळेत आणि मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा होऊ शकेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

यावेळी मिनल दास, सरोजिनी माकाई, सोनाली सगर, अनिता वाघमारे, संजीवनी सलबत्ते, जयश्री रानसरजे, अरुणा दिवाणजी, शहाजन सातखेड, अनिसा पटेल, सुरेखा चव्हाण, रमेजा शेख, निर्मला जगले, प्राजक्ता कुलकर्णी, भारती गुंनाल, श्वेता कुलकर्णी, शुभांगी कुलकर्णी, आशाबी नीलगुंडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# पालकमंत्र्यांच्या आश्वासनानंतर सोलापूर विकास मंचचे आंदोलन स्थगित



### प्रलंबित विकास प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**
सोलापूरच्या विविध प्रलंबित विकास प्रश्नांसाठी १२ जून रोजी जिल्हा परिषद कार्यालयासमोर जाहीर करण्यात आलेले सोलापूर विकास मंचाचे आंदोलन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले आहे. विकास प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाला काही कालावधी देण्याचा निर्णय मंचाने घेतला आहे.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे आणि सोलापूर विकास मंचाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये बुधवारी रात्री उशिरापर्यंत प्रदीर्घ बैठक झाली. यावेळी सोलापूरच्या विकासाशी संबंधित विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शहराच्या विकासासाठी प्रलंबित असलेल्या महत्त्वाच्या विषयांवर शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी मंचाच्या वतीने करण्यात आली.

बैठकीत सोलापूर विमानतळावर नियमित विमानसेवा सुरू करणे, नाईट लँडिंग सुविधा उपलब्ध करणे, आयटी पार्क उभारणी, परिवहन बस सेवा, शहराचा पाणीपुरवठा प्रश्न, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच अन्य विकासकामांबाबत केंद्र व राज्य शासनाच्या संबंधित विभागांशी समन्वय साधून सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन पालकमंत्री गोरे यांनी दिले.

सोलापूर विकास मंचाच्या शिष्टमंडळासोबत मुख्यमंत्री यांची बैठक आयोजित करण्याबाबतही सकारात्मक भूमिका असल्याचे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केल्याची माहिती मंचाच्या वतीने देण्यात आली. या प्रश्नांवर कार्यवाही करण्यासाठी शासन व प्रशासनाला काही कालावधी द्यावा आणि तोपर्यंत आंदोलन स्थगित करावे, अशी सूचना पालकमंत्री गोरे यांनी केल्याचे मंचाने सांगितले. सोलापूरच्या विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने नियोजित आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

यावेळी मिलिंद भोसले, केतन शहा, योगीन गुर्जर, विजय कुंदन जाधव, मनोज क्षीरसागर, ॲड.दत्तात्रय अंबुरे, प्रा.प्रसन्न नाझरे, सुहास भोसले, आनंद पाटील आदी उपस्थित होते.

# संकटे टळण्यासाठी मंगल आचरण केले जाते : ह.भ.प. शिरवळकर

- देवाच्या दरबारात विषमता नाही
- देवदर्शनाला पापी लोकही येतात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**
मंगल आचरणाविषयी आपल्यात अनेक गैरसमज आहेत. अग्निदाहक असलेला तप्त ग्रह म्हणजे मंगल. आपल्यावरील येणारे संकटे टळण्यासाठी मंगळ आचरण केले जाते. मंगल आचरण केले तरी कार्य निर्विघ्न पार पडेल याची शाश्वती देता येत नाही. अंत:करणात विश्वास निर्माण होण्यासाठी मंगल आचरणाची गरज आहे. संकटच आले नाही तर आपण हाती घेतलेले कार्यच पुर्णत्वास जात नाही, असे प्रतिपादन ह.भ.प.भागवत महाराज शिरवळकर यांनी केले.

अधिकमासानिमित्त ह.भ.प.माउली महाराज बचुटे सवाळकर शिष्य व मित्र परिवाराच्यावतीने दमाणी नगरातील गड दर्शन समाज मंदिरात आयोजित केलेल्या कीर्तन महोत्सवात बोलताना ते पुढे म्हणाले, देवाच्या दरबारात विषमता दिसून येत नाही. राजा आणि सामान्य भक्ताला एकच न्याय असतो. तुकोबारायांच्या सांगतात, देवाच्या दर्शनाला येणारे भक्त पुण्यवानच असतील असे नाही. पापीसुध्दा येऊ शकतो.

देवाला शरण आल्याबरोबर त्याचा स्वीकार केला पाहिजे, असे भक्ताने देवाला बांधून घेतले आहे. त्यांचा उध्दार करण्याची जबाबदारी देवाची आहे. देवाला बांधून घेणारा भक्त पुंडलिक आहे. भगवान परमात्म्याचे सौंदर्य जगात कोणाचेही नाही. संत तुकाराम सांगतात, अनंतवेळा जरी दर्शन घेतले तरी देवाचे सौंदर्य वेगळे दिसत नाही. देवाच्या चरणीच चित्त आणि दृष्टी असावी, असेही त्यांनी सांगितले.

ब्रह्म पद आणि इंद्रपद नको म्हणणारे तुकोबाराय आहेत. कर्म आणि धर्म दोन्ही नाशवंत आहे. कर्म आणि धर्म दोन्ही नको आहे, असे तुकोबाराय सांगतात. भक्ती करण्यासाठी अंत:करणाची स्थिरता महत्वाची असते. देवाच्या नामःचिंतनात सुख आणि समाधान आहे. अधिकमासात ज्ञान आणि साधनेचे फळ मिळते. तरुण मंडळी परमार्थाकडे वळत आहेत, ही आनंदाची बाब आहे, असेही त्यांनी सांगितले. आज शुक्रवारी सकाळी १० वाजता ह.भ.प.हरी महाराज राशीनकर, रात्री ८ वाजता योगीराज महाराज गोसावी यांचे कीर्तन होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी -१४६९

**अमंगळ वाणी। नये आयकां ते कानीं।।**

विचार व भावनांची देवाण-घेवाण करण्याचे वाचा हे एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. ज्याला वाचा आहे त्याला एखादा दिवस पूर्णत: अबोल रहा, असे म्हटले तर त्याचे पालन होणे अत्यंत कठीण जाते. अर्थात वाचेशिवाय किंवा बोलण्याशिवाय दैनंदिन जीवन जगणे अत्यंत अवघड आहे. वाचेशिवाय जगणे जसे अवघड आहे. त्याचप्रमाणे बऱ्याचवेळा वाचा मानवाचे जीवन अवघड करू शकते. नको ते शब्द किंवा नको तेवढ्या चुगल्या-चहाड्या मुखातून बाहेर पडू लागल्या म्हणजे एखाद्याला जीवन जगणे असह्य होऊ शकते. अत्यंत वाईटातले वाईट शब्द अनेकांच्या जीभेवर ठाण मांडूनच बसलेले असतात. आपले शब्द शस्त्रापेक्षाही अत्यंत घातक असून समोरच्यावर जखमाच जखमा करीत आहेत, याचा आनंद अशा वाचाळांना होत असतो. वाईट बोलणाऱ्यांचे वाईट शब्द ऐकणेही हितावह नसते. कारण वाईट ऐकून-ऐकून माणूस वाईट बोलायला शिकतो. त्यामुळे अमंगळ, वाईट बोलणाऱ्यांचे वाईट बोल न ऐकलेलेच बरे. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, **अमंगळ वाणी। नये आयकों ते कानीं।।**



माकडांची पिल्ले असलेले चित्र आपण बऱ्याच ठिकाणी पाहतो. एका माकडाने स्वत:च्या कानावर हात ठेवला आहे. दुसऱ्याने डोळ्यावर, तिसऱ्याने तोंडावर हात ठेवला आहे. यातील दोन माकडांचा संबंध वाईट वाचेशी आहे. वाईट बोलायचे नाही आणि वाईट ऐकायचे नाही. आपल्यात खरी माणूसकी निर्माण होण्यासाठी या तीन माकडांच्या चित्राचा आशय आपण जीवनात प्रत्यक्ष उतरवला पाहिजे. वाईट बोलणे जेवढे वाईट आहे, त्याहीपेक्षा वाईट ऐकणे जास्त वाईट आहे. कारण वाईट बोलणाऱ्यांचे वाईट बोल आपण मन:पूर्वक ऐकत आहोत हे अशा अमंगलवाणी बोलणाऱ्यांच्या लक्षात आले तर त्याला उलट चिथावणी मिळाल्यासारखे होते. आपल्या बोलण्याकडे कोणी तरी लक्ष देत आहे किंवा आपल्या बोलण्यामागचा हेतू साध्य होत आहे हे बोलणाऱ्याच्या लक्षात आले तर असा बोलणारा आणखी जास्त बोलत राहतो. वाईटांच्या वाईट बोलण्याला पुष्टी देणे किंवा मन:पूर्वक त्याचे श्रवण करणे अत्यंत चुकीचे असते. आपल्याला वाईटांचे बोल थांबवता येत नसतील तर हरकत नाही. पण कोणत्याही परिस्थितीत त्याच्या बोलाला पुष्टी मिळेल असे तरी आपण वागता कामा नये. माणसाला चांगले ऐकायला शिकवावे लागते पण वाईट ऐकण्यासाठी शिकवण्याची गरज पडत नाही हे एक विशेष आहे. असो, आपण ज्ञानोबा-तुकोबांच्या विचारांचा स्विकार करणारे असल्याने आपल्याकडून वाईट बोललेही जाणार नाही आणि वाईट ऐकलेही जाणार नाही, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. १२ जून २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अधिक, कृ. द्वादशी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- अश्विनी (०६.२८)**
**योग - अतिगंड (२१.२६)**
**करण - कौलव (०९.१०)**
**राहू काल : शुक्रवार**
**स. १०.३० ते १२.००**

**दिनविशेष : ✲ जागतिक बालकामगार विरोधी दिन.**
**१९०५: भारत सेवक समाजाची** (Servants of India Society) **स्थापना झाली.**
**१९६४: नेल्सन मंडेला - यांना आजन्म जन्मठेपेची शिक्षा सुनावली.**
**१९९३: - पृथ्वीक्षेपणास्त्राची ११ वी चाचणी यशस्वी.**
**२०००: भारतीय मराठी विनोदी लेखक पु. ल. देशपांडे यांचे निधन.**
**२०१५: भारतीय मूर्तिकार नेकचंद सैनी यांचे निधन.**

# जिल्ह्यातील २ हजार ७६८ शाळांची १५ जून रोजी वाजणार पहिली घंटा




### नवागतांच्या स्वागतासाठी पुष्पवृष्टी, चॉकलेट, रॅली; पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके व गणवेश देण्याचे नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून-**

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर येत्या सोमवार, १५ जूनपासून जिल्ह्यातील २ हजार ७६८ शाळांची घंटा वाजणार असून नव्याने प्रवेश घेणाऱ्या तसेच नियमित विद्यार्थ्यांच्या स्वागताची जिल्हा परिषदेने जय्यत तयारी केली आहे. गावोगावी लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण व जल्लोषात स्वागत करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण व्हावे आणि त्यांचा शाळेकडे ओढा वाढावा यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रभातफेरी, स्वागत रॅली, पुष्पवृष्टी, गुलाबपुष्प, चॉकलेट आणि विविध गोड पदार्थांचे वाटप करून विद्यार्थ्यांचे स्वागत केले जाणार आहे. विशेषत: प्रथमच शाळेत येणाऱ्या चिमुकल्यांसाठी आकर्षक सजावट, फुगे आणि आनंददायी वातावरण तयार करण्याच्या सूचना शाळांना देण्यात आल्या आहेत.

प्राथमिक शिक्षण विभागाने शाळा सुरू होण्यापूर्वी सर्व तयारी पूर्ण करण्याचे निर्देश शाळा मुख्याध्यापक आणि शिक्षण समित्यांना दिले आहेत. जिल्ह्यातील शिक्षक दोन दिवस अगोदरच शाळेत उपस्थित राहून वर्गखोल्या, परिसर स्वच्छता, पाठ्यपुस्तकांचे वितरण आणि स्वागत कार्यक्रमाची आखणी करणार आहेत.

यावर्षी इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी सुमारे २२ लाख पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येणार असून त्यापैकी १८ लाख पुस्तके प्राप्त झाली आहेत. तसेच १ लाख ८० हजार ५२७ विद्यार्थ्यांना गणवेश देण्याची तयारी पूर्णत्वास येत आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती गणवेश आणि पाठ्यपुस्तके देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांच्या स्वागताचा कार्यक्रम संस्मरणीय करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे.

#### स्वागताचा असा असेल जल्लोष

- जिल्ह्यातील २,८६८ शाळा १५ जूनपासून सुरू
- नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन स्वागत
- प्रभातफेरी, स्वागत रॅली आणि सांस्कृतिक उपक्रम
- पहिल्याच दिवशी गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण
- गावोगावी लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित
- शाळांमध्ये आकर्षक सजावट व आनंदोत्सवाचे वातावरण

#### विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत



जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांचा शाळेतील पहिला दिवस संस्मरणीय व्हावा, यासाठी जिल्हा परिषदेकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे. नवागत आणि नियमित विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करून शिक्षणाबद्दल सकारात्मक भावना निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.

- **कुशल जैन**, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर



# सिध्देश्वर तलावाच्या सुशोभीकरणासाठी कटिबध्द

### महापौर कोंड्याल; राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत कामांचा आढावा बैठकीत निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जून-**

श्री सिद्धेश्वर तलाव हा सोलापूरची ओळख आहे. राज्य सरोवर संवर्धन योजनेच्या माध्यमातून तलावाचे वैज्ञानिक पद्धतीने संवर्धन, जलगुणवत्तेत सुधारणा आणि परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून सर्व संबंधित विभाग, तज्ज्ञ संस्था आणि नागरिकांच्या सहकार्याने तलाव अधिक स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक करण्यात येईल,असे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले.

शहराची सांस्कृतिक, धार्मिक आणि पर्यावरणीय ओळख असलेल्या श्री सिद्धेश्वर तलावाच्या संवर्धन व सुशोभीकरणासाठी सोलापूर महानगरपालिकेने प्रयत्नांना गती दिली आहे. पर्यावरण संवर्धन विभागामार्फत राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी बुधवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्याप्रसंगी ते बोलत होते. बैठकीत प्राप्त सूचनांच्या आधारे तलाव संवर्धन आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्रजी काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, नगरसेविका रोहिणी तडवळकर, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, उपायुक्त आशिष लोकरे, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, कार्यकारी आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, रामचंद्र पेंटर, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, स्वप्निल सोलनकर, निखिल मोरे, सूरज सुतार , इंद्रजीत पाटील तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

#### भविष्यातील सुशोभीकरणाच्या उपाययोजनांवर चर्चा

बैठकीत श्री सिद्धेश्वर तलावाची सद्यस्थिती, राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत सुरू असलेली कामे, तलावाच्या सविस्तर प्रकल्प अहवालाबाबत प्रिमूव कन्सल्टन्सी यांचे सादरीकरण तसेच एमॲप्पल ईएम वन या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या लिक्विड बायोरिमेडिएशन तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली. तलावातील जलगुणवत्ता सुधारणा, पर्यावरणीय संतुलन राखणे, प्रदूषण नियंत्रण तसेच भविष्यातील सुशोभीकरणाच्या उपाययोजनांवर चर्चा झाली.

# श्रध्दात्रय विभायोग, मोक्ष संन्यास योगाचा अभ्यास

### ज्ञानेश्वरी पारायणातील सहाव्या दिवशी १७ व १८ व्या अध्यायाची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जून-**

सिद्धेश्वर फाउंडेशन आयोजित ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या सहाव्या दिवशी ह. भ. प. काशीनाथ सर्जे यांच्यासमवेत भक्तांनी सतराव्या व अठराव्या अध्यायातील ओव्यांचे पठण केले.

सतरावा अध्याय हा श्रद्धात्रय विभायोग म्हणून ओळखला जातो. यामध्ये मानवी स्वभावाची जडण घडण करणाऱ्या तीन प्रकारच्या श्रद्धा म्हणजेच सात्विक, राजस, तामस त्याचबरोबर अन्न, यज्ञ, दान आणि तप यांचे गुणधर्म स्पष्ट केले आहेत. सतराव्या अध्यायातील श्लोकांमध्ये ओम, तत, सत या तीन नामांच्या उच्चाराचे महत्व स्पष्ट केले आहे. शास्त्रांचे महत्व सांगताना या अध्यायात मानवी आचरणासाठी शास्त्र काय सांगते हे समजून घेणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले. शास्त्रांना प्रमाण मानून कर्म केल्यास जीवन पवित्र होते असे सांगितले.

ज्ञानेश्वरीतील १८ वा अध्याय या ग्रंथातील सर्वात मोठा आहे. अध्यायात ७८ श्लोकासहीत १८११ ओव्या आहेत. हा अध्याय मोक्ष संन्यास योग व संपूर्ण गीतेचा व ज्ञानेश्वरीचा सार असल्याचे सांगितले. दुपारी २ ते ७ या वेळेत पार पडलेल्या या पारायणात महिलांनी हिरव्या रंगाच्या साड्या परिधान करुन शोभा वाढविली. पारायणाचा समारोपावेळी ज्येष्ठ पत्रकार सिद्धाराम पाटील, उमेश कदम, नरसिंग बलसुरे परिवार, सुभद्रा संकद, रमेश वागज, स्मिता कटाप, विजय शाबादी, अशोक यलगोंडे आदींच्या हस्ते आरती करण्यात आली. पारायणाचे सूत्रसंचलन राजेंद्र बलसुरे यांनी केले.



कार्यक्रमासाठी काशिनाथ पटणे, बाबुराव रायगोंडे, यशवंत हिरापुरे, गुरुशांत रामपुरे, राजाराम दसगोंडे, सुरेश चौगुले यांनी परिश्रम घेतले.

# विधानपरिषद मतदानाच्या पहिल्या टप्प्याचे देण्यात आले प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ जून-**

महाराष्ट्र विधानपरिषद स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी मतदान प्रक्रियेच्या प्राथमिक टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण झाले. या प्रशिक्षणास जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुशांत बनसोडे, निवडणूक निरीक्षक श्रवण हार्डीकर तसेच सर्व तहसीलदार अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख यांनी मतदान प्रक्रियेची माहिती सांगताना म्हणाले, या निवडणुकीसाठी ६ मतदान केंद्रे, २ उमेदवार आणि एकूण ६१६ मतदार निश्चित करण्यात आले आहेत. निवडणूक जाहीर व आचारसंहिता १८ मेपासून लागू झाली असून मतदान १८ जून सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होईल. मतमोजणी २२ जून रोजी पार पडणार आहे. मतदान केंद्रांवर मतदारांची यादी पुरविण्यात येणार असून अधिकारी व कर्मचारी यांनी ती नीट तपासून खात्री करावी. नगरपंचायत व नगरपरिषद केंद्रांवर मतदारांची ओळख पटविण्यासाठी गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित राहतील.

क्षेत्रीय अधिकारी उपजिल्हाधिकारी मतदान केंद्राध्यक्ष तहसिलदारमतदान अधिकारी क्र.१ नायब तहसिलदारमतदान अधिकारी क्र.२ अव्वल कारकूनमतदान अधिकारी क्र.३ अव्वल कारकून/लिपिकमतदान कर्मचारी शिपाईस्थानिक स्वराज संस्थेचे मुख्याधिकारी व गटविकास अधिकारी यांची मतदार ओळख पटविण्यासाठी नेमणूक करण्यात आली आहे. १७ जून रोजी सकाळी ९ वाजता बहुद्देशीय सभागृह, जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथे साहित्य वितरण होईल.



मतदान केंद्राध्यक्षांनी मतपेटी, मतपत्रिका, स्केचपेन, सील, टॅग, मतदार यादी इत्यादी साहित्याची काळजीपूर्वक तपासणी करावी. मतदान प्रक्रियेत गोपनीयता राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे. मतदान केंद्रांवर दबाव आणण्याचे प्रकार घडू शकतात, त्यामुळे सर्व पथकांनी सतर्क राहावे, असे निर्देश निवडणूक निरीक्षक हार्डीकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी बारकाईने लक्ष ठेवण्याचे आवाहन केले. मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून त्यांचा योग्य वापर करावा, असेही त्यांनी सांगितले.

**अशी असेल मतदानाची पद्धत**

मतदारांना उमेदवाराच्या नावासमोर पसंतीक्रम अंकात लिहावा लागेल. हा क्रमांक मराठी, इंग्रजी, रोमन किंवा भारतीय भाषांतील अंकात लिहिता येईल, परंतु शब्दात लिहिता येणार नाही. भारत निवडणूक आयोगाने पुरविलेला जांभळा स्केचपेन वापरूनच मतदान करावे. प्रत्येक मतपत्रिकेला काउंटर फाईल असेल ज्यावर मतदार यादी भाग क्रमांक, अनुक्रमांक व मतदाराची स्वाक्षरी/अंगठा नोंदविला जाईल.

**मतदान केंद्रावरील ही घ्यावी दक्षता**

मतदान केंद्रावर १०० मीटर परिसरात सुरक्षा यंत्रणा राबविण्यात येईल. मतदान पथक व प्रतिनिधींनी गोपनीयतेची शपथ घ्यावी. मतदान केंद्रात मोबाईल, स्मार्टवॉच यांसारखी उपकरणे नेण्यास बंदी असेल. मतदाराने मतपत्रिका दाखविल्यास ती रद्द केली जाईल.

## कंटेनरच्या धडकेत रिक्षाचालक जखमी; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ११ जून-**

रिक्षा मधील गॅस संपल्याने सर्व्हिस रोडवर थांबलेल्या एका रिक्षाला भरधाव कंटेनरने पाठी बघून जोराची धडक दिली. या अपघातात रिक्षाचालक गंभीर जखमी झाला असून रिक्षाचेही मोठे नुकसान झाले हा अपघात सोलापूर हैदराबाद महामार्गावर रसिक बार समोर दि. ९ जून रोजी रात्री पावणे अकराच्या सुमारास घडला.

दरम्यान याप्रकरणी संबंधित कंटेनर चालकाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रविणकुमार संगप्पा माचल (रा. ग्रुप विडी घरकुल, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीचे वडील त्यांची रिक्षा घेऊन जात असताना गॅस संपल्याने रस्त्याच्या कडेला थांबले होते. दरम्यान, हैदराबादकडून सोलापूरकडे जाणाऱ्या कंटेनरच्या चालकाने आपले वाहन भरधाव व निष्काळजीपणाने चालवून रिक्षाला जोरदार धडक दिली यात फिर्यादीची वडील जखमी होऊन रिक्षाचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार गायकवाड हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

# फुटपाथवर अतिक्रमण अन् रस्त्यावर पादचारी; मग चालायचं कुठून?

### सुरक्षित पायी चालण्याचा अधिकार अजूनही कागदावरच?

शहराचा विकास मोजायचा असेल तर उंच इमारती, रुंद रस्ते किंवा चमकदार प्रकल्प यांच्यापेक्षा त्या शहरातील पादचाऱ्यांना किती सुरक्षितपणे चालता येते, याकडे पाहावे लागते. कारण कोणताही नागरिक वाहनातून प्रवास करत असला तरी प्रवासाची सुरुवात आणि शेवट हा पायी चालण्यानेच होत असतो. मात्र सोलापूरसह अनेक शहरांमध्ये आज पादचारी नागरिक हा विकासाच्या चर्चेतील सर्वात दुर्लक्षित घटक ठरत आहे. फुटपाथ हे पादचाऱ्यांसाठी बांधले जातात. त्यांचा उद्देश नागरिकांना सुरक्षितपणे चालण्यासाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध करून देणे हा असतो. परंतु शहरातील अनेक फुटपाथ अतिक्रमण, व्यावसायिक वापर, पार्किंग किंवा विविध साहित्याच्या साठ्यामुळे पादचाऱ्यांसाठी निरुपयोगी ठरत आहेत. काही ठिकाणी फेरीवाल्यांनी संपूर्ण फुटपाथ व्यापलेले दिसतात तर काही ठिकाणी दुकानदारांनी आपला व्यवसायच फुटपाथवर थाटलेला आहे. परिणामी पादचाऱ्यांना जीव धोक्यात घालून रस्त्यावरून चालावे लागते.

शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर फुटपाथ अस्तित्वात असले तरी त्यांची अवस्था दयनीय आहे. तुटलेल्या फरशा, झाडांच्या वाढलेल्या फांद्या, विद्युत खांब, केबल बॉक्स आणि विविध अडथळ्यांमुळे फुटपाथ चालण्यायोग्य राहिलेले नाहीत. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, महिला आणि लहान मुलांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर ठरते. दिव्यांग अनुकूल सुविधा तर अनेक ठिकाणी केवळ कागदावरच असल्याचे दिसते.

स्मार्ट सिटी किंवा विविध विकास प्रकल्पांमध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण केले जाते. लाखो-कोट्यवधी रुपये खर्च करून फुटपाथ बांधले जातात. मात्र त्यांच्या देखभालीची जबाबदारी निश्चित नसल्याने काही महिन्यांतच ते पुन्हा खराब होतात. त्यांची दुरुस्ती मात्र वेळेवर होत नाही. त्यामुळे सार्वजनिक पैशांचा अपव्यय होत असतानाच नागरिकांची गैरसोय वाढते.महापालिका प्रशासन अतिक्रमणविरोधी मोहिमा राबविते मात्र कारवाईची सातत्यपूर्ण अंमलबजावणी होत नसल्याने काही दिवसांतच परिस्थिती पूर्ववत होते. फुटपाथ हे सार्वजनिक मालमत्ता असून त्यावर पहिला हक्क पादचाऱ्यांचा आहे, ही बाब प्रशासनाने आणि नागरिकांनीही लक्षात घेण्याची गरज आहे.

आज शहरात वाहनधारकांसाठी रस्ते, पार्किंग आणि उड्डाणपूल यावर चर्चा होते परंतु पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेवर फारसे बोलले जात नाही. रस्ता ओलांडण्यासाठी सुरक्षित झेब्रा क्रॉसिंग, सुस्थितीतील फुटपाथ, दिव्यांगांसाठी रॅम्प आणि अतिक्रमणमुक्त पादचारी मार्ग ही कोणत्याही आधुनिक शहराची मूलभूत गरज आहे. शहर विकासाच्या शर्यतीत पादचारी नागरिक मागे पडू नयेत, यासाठी महापालिकेने सर्व फुटपाथचे सर्वेक्षण करून अतिक्रमणमुक्ती, नियमित देखभाल आणि सुरक्षिततेची ठोस कार्यवाही करणे आवश्यक आहे. अन्यथा शहरात फुटपाथ असतील, पण त्यावर चालणारे पादचारी मात्र रस्त्यावरच दिसतील.






फुटपाथ पादचाऱ्यांसाठी आहेत की अतिक्रमणासाठी? आणि शहरात पादचारी नागरिकांचे खरोखर स्थान आहे का? फुटपाथ अतिक्रमणांनी गिळंकृत केले आहेत. फुटपाथवर दुकानांचे साम्राज्य, पादचारी रस्त्यावर अशी स्थिती चिंताजनक आहे. अतिक्रमण, दुर्लक्ष आणि बेजबाबदार व्यवस्थेमुळे नागरिकांचा सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. चालायचं कुठून? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### 'महावितरण'चे नूतन कार्यकारी अभियंता विनायक इदाते यांचे स्वागत

**सोलापूर, दि. ११ जून-**

महावितरण सोलापूर शहर विभागाचे नव्याने हजर झालेले कार्यकारी अभियंता विनायक इदाते यांचे विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन (१०२९) च्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आले. याप्रसंगी संघटनेचे पुणे प्रादेशिक संघटक सुनिल काळे, अनिलकुमार बनसोडे, मयुर गवते, अमोल धायगोडे, संजय फताटे, शिवलिंगप्पा हारगेरी, संजय स्वामी, श्रीराम सलवादे आदी सभासद व पदाधिकारी उपस्थित होते.



### मॉडेल पब्लिक स्कूलमध्ये पर्यावरण दिन

**सोलापूर, दि. ११ जून-**

मॉडेल पब्लिक स्कूलमध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृढ संकल्पासह साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून वृक्षसंवर्धनाची शपथ घेतली. तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन सृष्टी इकोव्हिजन, परसबाग आणि पर्यावरण गतिविधी यांच्या संयुक्त विद्यमाने सीडबॉल निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्रांत मंडल सदस्य, पर्यावरण संरक्षण गतिविधी, पश्चिम महाराष्ट्र आणि सीईओ सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशनचे प्रवीण तळे व राजेश वडिशेरला यांनी विद्यार्थ्यांना विविध स्थानिक वृक्षांच्या बियांचा वापर करून सीडबॉल तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. कार्यक्रमाला मॉडेल स्कूलचे सचिव अमोल जोशी, श्री साई प्रतिष्ठानच्या सचिव सायली जोशी, प्राचार्य अदिती कुलकर्णी आणि सर्व शिक्षक उपस्थित होते.



### महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या सोलापूर शहराध्यक्षपदी गंगणे

**सोलापूर, दि. ११ जून-**

पत्रकार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया शहराध्यक्ष वैभवजी गंगणे यांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या सोलापूर शहराध्यक्षपदी राज्याचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांनी ही निवड केली. त्यांच्या निवडीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराच्या वतीने त्यांच्या सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, रयत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार, प्रा. श्रीनिवास कोंडी, अनिल उकरंडे, ज्येष्ठ नेते भारत साबळे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, माजी नगरसेविका नूतन गायकवाड, युवक अध्यक्ष सुहास कदम, महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम, प्रतिभा कांबळे आदी उपस्थित होते. पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे, सामाजिक प्रश्नांवर परखड भूमिका घेणारे आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविणारे वैभव गंगणे यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे कार्य अधिक गतिमान होईल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

### दुष्कर्म केल्याप्रकरणीच्या गुन्ह्यातील आरोपीस जामीन मंजूर

**सोलापूर, दि. ११ जून-**

येथील रहिवासी अल्लाऊद्दीन हसन अत्तार (वय-३८ वर्षे, रा.घर नं.६२ सरवदे नगर, मुळेगाव रोड) यास पीडितेवर दुष्कर्म केलेप्रकरणीच्या गुन्ह्यात विशेष न्यायाधीश ए.आर.उबाळे साो यांनी जामीन मंजूर केला. याची थोडक्यात हकीकत अशी, मे २०१५ ते नोव्हेंबर २०१५ पर्यंत पिडीता ही तिचे आई वडिलांचे घरी रहात असताना, आरोपीने पिडीतेस ''मला तुझेशी बोलायचे आहे, मला तुझी आठवण येत आहे'', असे म्हणून पिडीतेशी जवळीक साधून पिडीतेची इच्छा नसताना पिडीतेसोबत शरीरसंबंध केले आरोपीपासून पिडीतेस अपत्य झाले, त्यानंतर आरोपीने पिडीतेस मारहाण करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली, त्यानंतर पिडीतेने घर बदलले त्यानंतरही आरोपीने पिडीतेसोबत वारंवार शरीरसंबंध केले अशा आशयाची फिर्याद पिडीतेने एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे दाखल केली होती.

सदर गुन्ह्यात आरोपीस अटक झालेली होती, त्यामुळे आरोपीने ॲड. गुरुदत्त बोरगांवकर यांचे मार्फत येथील सत्र न्यायालयामध्ये जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अर्जाची सुनावणी विशेष न्यायाधीश श्री.ए.आर. उबाळे साो यांचे कोर्टासमोर झाली, सदरकामी सरकारी वकीलांनी आरोपीच्या जामीन अर्जास तीव्र विरोध केला तथापि, आरोपीच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकून मे. कोर्टाने आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला. सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. गुरुदत्त बोरगांवकर, ॲड. देवदत्त बोरगांवकर, ॲड. शिवानी करवा, व सरकारतर्फे ॲड. शितल डोके यांनी काम पाहिले.

# आंबे येथे अवैध वाळू उपशावर कारवाई

## सोळा लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ जून -**

तालुक्यातील आंबे गावातील परिसरात भीमा नदीतून अवैध वाळू उपसा करत असताना तालुका पोलिसांनी कारवाई केली. यामध्ये टिपर, चार ब्रास वाळू असा सुमारे १६ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी टिपर चालक व मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पंढरपूर तालुक्यातील भीमा नदी पात्रातून अवैध वाळू उपसा करण्यात येत आहे. मात्र याकडे महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. यामुळे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी अवैध वाळू उपशावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यांनी पोलिसांना अवैध वाळू उपशावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. पंढरपूर तालुक्यातील आंबे गावातून अवैध वाळू उपसा होत असल्याची माहिती तालुका पोलिसांना मिळाली. लगेच पोलिसांनी तेथे जाऊन कारवाई केली. यावेळी नदीपात्रातून



अवैध वाळू उपसा करून टिपरमध्ये भरला जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी टिपर व चार ब्रास वाळू असा १६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी चालक व मालकावर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर, पोलिस उपनिरीक्षक विक्रम वडणे, पोलीस कर्मचारी मंगेश रोकडे यांच्या पथकाने केली.



## सार्थक जीवनासाठी शिव आराधना करा : भालचंद्र महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**

जीवनाचे सार्थक करायचे असेल तर शिव आराधनेचा अंगीकार करा असे सांगतानाच तन, मन आणि धनाने शिवाची प्रार्थना केल्यास आत्मशांती मिळते,असे विचार ह.भ.प.भालचंद्र महाराज केजकर यांनी मांडले.

दमानीनगर भागातील श्रद्धा महिला मंडळाच्यावतीने गड दर्शन समाज मंदिरात गेल्या सात दिवसापासून सुरू असलेल्या शिव महापुराण कथेचा समारोप बुधवारी दुपारी महाप्रसादाने झाला. यावेळी ते बोलत होतेभगवान कोणत्याही भक्ताची जात पाहत राहत नाही. भगवान फक्त आपला शुद्ध भाव पाहतो. शिव आराधनेत शक्तिशाली सामर्थ्य आहे. इच्छा ,भीती, चिंता, आकांक्षा आणि नापसंतीमुळे आपण फार थकून जातो. आपल्याला विश्रांतीची गरज असते,ती विश्रांती म्हणजे ध्यान. ध्यानच आपल्याला शिवतत्त्वाच्या अनुभवाकडे घेऊन जाते,असे सांगतानाच शिव सगुण असूनही वैश्विक आहे.शिव आराधना करणारा प्रत्येक व्यक्ती सुखी आणि समृद्ध जीवन जगतो, असेही भालचंद्र महाराजांनी सांगितले.



## कोळेगांवच्या उपसरपंचपदी मंगल बेंदगुडे

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव दि ११ जून-**

माळशिरस तालुक्यातील कोळेगांव येथील ग्राम पंचायत उपसरपंच सविता नागनाथ दुपडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मंगल गोपाळ बेंदगुडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

ही निवड प्रक्रिया लोकनियुक्त सरपंच सुषमा धनंजय दुपडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्राम पंचायत अधिकारी बी. आर. बाबर आणि ग्राम म हसूल अधिकारी ज्योस्ना लोखंडे यांनी काम पाहिले.

या निवडीच्या विशेष सभेला गावातील अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने माजी उपसरपंच धनंजय दुपडे, माजी सरपंच रंगनाथ बेंदगुडे, अधिकराव सावंत,अनिल बेंदगुडे, कैलास दुपडे, ॲड. धनंजय दुपडे, प्रसाद दुपडे, दत्तात्रेय बेंदगुडे, नागेश दुपडे, पांडुरंग माने, ग्रामपंचायत सदस्य केशव सावंत यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

बिनविरोध निवडीची घोषणा होताच कोळेगांव ग्रामस्थांच्या वतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर नूतन उपसरपंच मंगल बेंदगुडे यांचा सत्कार सरपंच सुषमा दुपडे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. या निवडीबद्दल मंगल बेंदगुडे यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## प्रभागवार आरक्षणासाठी पिलीव मंडलात आज विशेष ग्रामसभा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ११ जून-**

ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी जातीनिहाय आरक्षणासाठी, आरक्षण सोडतीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाच्या सचिवाने जाहीर केला आहे. त्यानुसार माळशिरस तालुक्यातील पिलीव मंडळ व परिसरातील सर्व ग्रामपंचायतीच्या सभागृहात शुक्रवार १२ जून रोजी ग्रामपंचायतीच्या सोयीनुसार विशेष ग्रामसभांचे आयोजन केले आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग त्याचप्रमाणे अनुसूचित जातीतील महिला आरक्षण अनुसूचित जमातीतील महिला आरक्षण नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिला आरक्षण व सर्वसाधारण महिला या सर्व आरक्षणासाठी सूचना व आदेश देण्यात आले. त्यासाठी या सभा होत आहेत. आरक्षणाच्या विशेष ग्रामसभेनंतर ग्रामसभेमध्ये ठरवलेल्या आरक्षणावर टप्प्याटप्प्याने प्रक्रिया राबवून आलेल्या हरकतीचा निपटारा काढला जाईल. त्याच्यावर निर्णय देऊन जिल्हाधिकारी दहा जुलै रोजी अंतिम प्रभाग वार आरक्षण जाहीर करणार आहेत.

मतदार याद्या प्रसिद्ध केल्यानंतरच सर्व संबंधित ग्राम पंचायतीच्या निवडणुकांचे प्रत्यक्षात मतदान प्रक्रियेचा कार्यक्रम जाहीर केला जाणार असल्याचे तहसीलदार सुरेश शेजुळ यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी विजय एकतपुरे यांनी सांगितले. .

पिलीव, सुळेवाडी, झिंजेवस्ती या ग्रामपंचायतीच्या मुदती फेब्रुवारी २०२४ ला संपल्या आहेत. बचेरी, शिंगोर्णी, कुसमोड या ग्रामपंचायतीच्या मुदती फेब्रुवारी २०२६ मध्ये संपल्या आहेत. यासाठी १७ जुन रोजी प्रभागनिहाय आरक्षण प्रारुप यादीला जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी घेणे, १९ जुन प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रसिद्धीकरण, १९ ते २५ जुन हरकती व सूचना दाखल करणे, ३ जुलै उपविभागीय अधिकाऱ्यांनी प्राप्त हरकती घेऊन अभिप्राय देणे, ८ जुलै उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांचे अभिप्राय घेऊन अंतीम अधिसुचनेस मान्यता, १० जुलै जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या अंतीम प्रभाग रचनेला प्रसिद्धी देणे असा कार्यक्रम असणार आहे.

## यत्नाळ येथील सार्वजनिक वाचनालयाच्या अनुदान प्रकरणी कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मौजे यत्नाळ येथील कै. व्यंकय्या कुसय्या गुत्तेदार सार्वजनिक वाचनालयाच्या अनुदान वितरणात मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी वाचनालयाचे अध्यक्ष श्रीशैल सिद्रामय्या स्वामी यांनी पत्रकार परिषदेत केली.

सन २०२३ ते २०२८ या कालावधीसाठी कार्यकारी मंडळाच्या बदल अर्जाबाबतचा वाद अद्याप सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयात प्रलंबित असून कोणत्याही गटाचा बदल अर्ज मंजूर झालेला नाही. असे असतानाही संबंधित वाचनालयाला सन २०२२-२३ आणि २०२३-२४ या दोन वर्षांचे अनुदान वितरित करण्यात आले. यासंदर्भात जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्याकडे अनेक वेळा लेखी तक्रारी करण्यात आल्याचा दावा स्वामी यांनी केला. दि. २६ जून २०२४ रोजी स्वतः जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांनी बदल अर्ज मंजूर झाल्यानंतरच अनुदानाबाबत पुढील निर्णय घेतला जाईल, असे लेखी कळविले होते. मात्र त्यानंतरही अनुदान वितरित झाल्याने संशय निर्माण झाला आहे. सध्या वाचनालयाचे अध्यक्ष किंवा सदस्यही नसताना संबंधित माजी अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया, होटगी स्टेशन शाखेतून सुमारे सहा लाख रुपयांचे अनुदान काढले. वाचनालयात वर्तमानपत्रे, पुरेशी पुस्तके, फर्निचर किंवा नियमित कर्मचारी नसतानाही दरवर्षी सकारात्मक तपासणी अहवाल दिला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. जिल्ह्यातील अनेक ग्रंथालये बंद अवस्थेत असतानाही अनुदानाचा लाभ घेत असल्याचे आरोप स्वामी यांनी केले आहेत.

## माळशिरस तालुक्यातील लाडक्या बहिणी अडचणीत

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव दि ११ जून -**




महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही अतिशय महत्त्वाकांक्षी योजना सुरु केली. योजनेअंतर्गत महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात.

यानंतर शासनाने सदरच्या लाभार्थी महिलांना केवायसी करण्यासाठी ३१ मार्च २०२६ ची मुदत दिली होती. यामध्ये अनेक महिलांनी केवायसी केली तरीही अनेक महिलांचा सध्या लाभच बंद झाला आहे.

सध्या माळशिरस तालुक्यातील अनेक लाडक्या बहीणींचा एप्रिलपासून लाभ बंद झाला आहे. अशा महिला माळशिरस पंचायत समितीमधील महिला व बालविकास विभागाकडील अधिकाऱ्याकडे हेलपाटे मारीत आहेत. मात्र त्या ठिकाणी त्यांना तुमची केवायसी नाही, तसेच तुमचा डाटा नाही अशी उत्तरे दिली जात आहेत. केवायसी केलेल्या महिलांनाही अशीच उत्तरे दिली जात आहेत.

यामुळे तालुक्यातील लाडक्या बहिणी प्रचंड वैतागल्या आहेत. लाभ सुरु करण्यासाठी महिलांची धडपड सुरु आहे आणि अधिकाऱ्यांकडून कोणताही प्रतिसाद मिळत नाही. मग जायचे कुठे अशा गहन प्रश्न सध्या माळशिरस तालुक्यातील लाडक्या बहिणींपुढे उभा आहे. तालुक्यातील अधिकारीच वंचित महिलांना दाद देईनात अशी विदारक परिस्थितीत तालुक्यात निर्माण झाली आहे. यामुळे तालुक्यातील अनेक महिलांना लाभ बंद झाला आहे.

**तालुकाध्यक्ष व अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष**

माळशिरस तालुक्यातील लाडक्या बहिणींचा लाभ बंद झाला आहे. याबाबत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब सरगर यांच्याकडे याविषयी कैफियत मांडली असता, याबाबत मी संबंधित अधिकाऱ्यांना बोलुन प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करेन, एवढेच उत्तर दिले. तालुक्यातील किती महिलांचा लाभ बंद झाला आहे, याची आकडेवारी सबंधित अधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी आकडेवारी सांगण्याऐवजी वेळ मारुन नेली.

## मोहरमनिमित्त २१ ते २६ जूनपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**

मोहरम कमिटी सोलापूरच्यावतीने मोहरम निमित्त २१ ते २६ जून या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती कमिटीचे अध्यक्ष हाजी मकबूल मोहोळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मोहरम सणानिमित्त १२ जून रोजी मोहरम कमिटी मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन बारा इमाम चौक येथील मोहोळकर कॉम्प्लेक्समध्ये होणार आहे. २१ ते २६ जून या कालावधीत कमिटीच्या नेतृत्वाखाली पंजांच्या शानदार मिरवणुका काढण्यात येणार आहेत. याअंतर्गत २१ जून रोजी सायंकाळी सात वाजता साखर पेठ, रंगा चौक येथून पीर बडे मुस्लिमची (प्रथम मानाचा पंजा) मिरवणूक काढण्यात येणार आहे. २२ जून रोजी सायंकाळी पाच वाजता दुर्वेश मस्जिद शनिवार पेठ येथून पीर छोटे अब्बास अली पंजाची मिरवणूक निघेल. २३ जून रोजी रात्री नऊ वाजता मराठा वस्ती येथून पीर इमाम कासिम पंजाची तसेच टिळक चौक परीट गल्ली येथून पीर इमामे कासिम पंजाची मिरवणूक काढण्यात येईल. याशिवाय शनिवार पेठ तालीम जिंदाशाह मदार मोहल्लाच्या वतीने पीर इमाम कासिम पंजाची व रात्री आठ वाजता बारा इमाम चौक अहमद अली शाह पटांगण येथून पीर शहीदे आझम पंजाची मिरवणूक निघेल.

२४ जून रोजी रात्री नऊ वाजता समाचार चौक येथून पीर छोटे मौलाली पंजाची, विजापूर वेस्ट डॉक्टर झाकीर हुसेन चौक येथून रात्री अकरा वाजता घोडेपीर पंजाची ताबूत निघेल. रात्री बारा वाजता कुंभार २० भुसार गल्ली येथून पीर बडे मौलाली 'मुशकिल कुशा' पंजाची मिरवणूक तसेच बाळीवेस येथून पीर बडे अकबर अली पंजाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. मंगळवार पेठ पोलिस चौकीजवळ पीर मौलाली व पीर अकबर अली यांची भेट होऊन तिन्ही पंजांची संयुक्त मिरवणूक काढण्यात येईल. २५ जून रोजी रात्री दहा वाजता बेगम पेठ मस्जिद लगत असलेल्या पीर हुसेन बाशा नाले हैदर इमामे हुसेन पंजाची मिरवणूक, रात्री बारा वाजता बेगम पेठ बडी बाणेकरी तालीम येथून पीर बडे इमाम हुसेनी पंजाची मिरवणूक तसेच रात्री साडेअकरा वाजता रविवार पेठ येथून पीर नालसाहेब पंजाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. २६ जून रोजी पहाटे चार वाजता शनिवार पेठ दुर्वेश मशीद येथून पीर इमाम हुसेन पंजाची मशालीसह मिरवणूक काढण्यात येणार आहे. सकाळी सहा वाजता दादा पीर पंजाची मिरवणूक सपार बांधव परिवाराच्यावतीने काढण्यात येणार आहे. त्यानंतर इमामे कासिम पंजे जमखंडीवाल्यांची पंजाची मिरवणूक निघेल. सकाळी सात वाजता इमामी कासिम पंजे नालबंद यांच्या परिवाराच्या पंजाची मिरवणूक, त्यानंतर मंगळवेढा तालीम येथून इमामे हुसेन साहेबांच्या पवित्र ७२ कुटुंब अहले हरम पंजाची मिरवणूक काढण्यात येणार आहे. याच दिवशी दुपारी दोन वाजता पानगल मस्जिद शनिवार पेठ येथून मानाचे पीर इमामे हुसेनची मिरवणूक तसेच अन्य ठिकाणी देखील मिरवणूक काढण्यात येणार आहे. दुपारी साडेचार वाजता बारा इमाम चौक, मोहोळकर कॉम्प्लेक्स येथे साडी, महाप्रसाद व शरबत वाटप करण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेला कमिटीचे सरचिटणीस हाजी शकील शब्बीर मौलवी, खजिनदार शाह इकबाल म. हनीफ दुर्वेश आदी उपस्थित होते.

## पर्यावरण दिनानिमित्त आज मोफत आरोग्य तपासणी, वृक्षारोपण उपक्रम

**आयपीएस अधिकारी अर्चना त्यागी यांची विशेष उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्स, सोलापूर, एन्व्हायरोसेफ कन्सल्टंट आणि महाराष्ट्र स्टेट पोलिस हाऊसिंग अँड वेल्फेअर कॉर्पोरेशनच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. १२ जून रोजी सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत मोफत आरोग्य तपासणी शिबिर, वृक्षारोपण, सेफ्टी ओरिएंटेशन कार्यशाळा तसेच 'गुड हेल्थ स्टेशन' उपक्रमाचे आयोजन केले आहे, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष भगवान जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिर अशोक चौक येथील पोलीस मुख्यालय परिसरातील ३०८ निवासी क्वार्टर्स साईट, सिटी पोलिस पेट्रोल पंपाशेजारी होणार आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र स्टेट पोलिस हाऊसिंग अँड वेल्फेअर कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक तथा आयपीएस अधिकारी अर्चना त्यागी या विशेष उपस्थित राहणार आहेत. यावेळी पोलिस आयुक्त एम. राजकुमार, ग्रामीण पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य अभियंता आर. एम. गोसावी, अधीक्षक अभियंता पी. आर. जाधव तसेच शासकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जास्तीत जास्त बांधकाम कामगारांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे सचिव संतोषकुमार बायस यांनी केले. पत्रकार परिषदेत संतोषकुमार बायस, मनोज महिंद्रकर, वैभव होमकर, गणेश इंदापुरे, इख्तकार नदाफ, सतीश महिंद्रकर, दत्तात्रय अंबुरे, नितीन पवार, प्रकाश तोरवी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कॉरिडॉरचे संकट दूर करण्यासाठी महायज्ञ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ जुन -**

पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या वतीने कॉरिडॉरचे अरिष्ट निवारणार्थ श्री पुरुषोत्तमयाग तथा विष्णुयाग (महायज्ञ) दि. ९ ते १५ जून या कालावधीत करण्यात येणार आहे. यामध्ये बाधितांनी व पंढरपूर नगरीचे पावित्र्य व प्राचीनत्व मोडू नये, असे वाटणाऱ्या सुज्ञ नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन समितीच्या वतीने केले आहे.

पुरातन पंढरी क्षेत्राचे मांगल्य नष्ट करू पाहणाऱ्या, पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पाला बाधितांनी सनदशीर मार्गाने विरोध केला आहे. आपली बाजू सत्याची व न्यायाची असल्याने आजवर सरकार आपल्याशी चर्चा करायला धजावले नाही.

हा महायज्ञ हिंदू महासभा भवन या ठिकाणी दि. ९ ते १५ जून या कालावधीत दररोज सकाळी ७.३० ते ११ या वेळेत होणार आहे. दि. १५ रोजी अवभृत स्नानची मोठी मिरवणूक काढून या यज्ञाचा समारोप होणार आहे. यात सहभाग नोंदवून ईशकृपा प्राप्त करून आपल्या आंदोलनास विजय मिळवावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष अभयसिंह इचगावकर, उपाध्यक्ष ह.भ.प. माउली महाराज गुरव व सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



### महत्त्वाचे...

### स्वामीनाथ पोतदार महाराज यांना श्री संत नरहरी महाराज प्रतिष्ठानचा समाजभूषण पुरस्कार जाहीर



**अक्कलकोट, दि. ११ जून**

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज प्रतिष्ठान यांच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त श्री स्वामी समर्थ सेवा विकास समिती ट्रस्ट शंकर महाराज मठ अक्कलकोटचे श्री स्वामीनाथ पोतदार यांना सम ाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. श्री संत शिरोमणी नरहरी महाराज प्रतिष्ठान यांच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त सामुदायिक उपनयन संस्कार व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा १६ जून रोजी होत आहे. कार्यक्रमात अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ सेवा विकास समिती ट्रस्ट श्री दत्त निर्गुण धाम, शंकर महाराज मठ श्रीक्षेत्र अक्कलकोट मठाचे प्रमुख श्री स्वामीनाथ पोतदार महाराज यांचा समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असल्याची माहिती संत शिरोमणी नरहरी महाराज प्रतिष्ठान मोडनिंब यांच्या वतीने दिली. पुरस्कार जाहीर झाल्याने स्वामीनाथ पोतदार यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. मोडनिंब येथील श्री संत शिरोमणी नरहरी महाराज प्रतिष्ठान संस्थेच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त समाजभूषण हा पुरस्कार संस्थेने पोतदार यांच्या धार्मिक आणि सामाजिक कार्याची दखल घेऊन जाहीर केला आहे. १६ जून रोजी वैराग येथे सामुदायिक उपनयन संस्कार व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे. यावेळी पोतदार यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. संत शिरोमणी नरहरी महाराज प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने मानाचा फेटा, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

### पंढरपूरच्या रामबाग मंदिरात उद्यापासून तीन दिवस आध्यात्मिक महोत्सव

**सोलापूर, दि. ११ जून-**

पंढरपूर येथील श्री रामबाग मंदिर तथा श्री रामचंद्रजी भगवान संस्थानाच्यावतीने अधिक मासनिमित्त १३ जून ते १५ जून या कालावधीत एका विशेष आध्यात्मिक महोत्सवाचे आयोजन केल्याची माहिती संस्थानचे पीठाधीश्वर तथा महंत जगद्गुरु डॉ. राघवाचार्य स्वामी महाराज व सचिव शरद सारडा यांनी पत्रकार परिषदेत दिली. परमपूज्य जगद्गुरु श्री श्री रामानुजस्वामी १००८ डॉ. राघवाचार्य महाराज (पीठाधीश्वर महंत, श्री रामबाग मंदिर संस्थांन) यांच्या मार्गदर्शनाखाली हा भक्तिमय सोहळा होणार आहे. तीन दिवसीय सोहळ्यात सुदर्शन यज्ञ, कथामृत आणि 'भजन संध्या अशा विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. श्री रामबाग मंदिर ट्रस्टतर्फे सर्व वैष्णव भक्तांना या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. महोत्सवासाठी कार्याध्यक्ष हिरालाल मालू, सचिव शरद सारडा, कोषाध्यक्ष विठ्ठलदास मुंदडा यांच्यासह वेणुगोपाल तापडिया, हरिनिवास कालानी, ईश्वरप्रसाद डागा, श्रीनिवास बोहरा, यतिराज झंवर, अरुण लोया आणि सीए नंदकिशोर काबरा आदी विश्वस्त परिश्रम घेत आहेत. पत्रकार परिषदेला विठ्ठलदास मुंदडा, अरुण लोया, नंदकिशोर काबरा आदी उपस्थित होते.



### एनसीएमसी स्मार्ट कार्ड शिबिराचा २५२ जणांनी घेतला लाभ

**सोलापूर, दि. ११ जून-**

राज्य परिवहन महामंडळाकडून महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणाऱ्या एनसीएमसी या ५० टक्के सवलतीच्या स्मार्ट कार्ड शिबिराचा लाभ २५२ जणांनी घेतला. प्रभाग क्रमांक ८ मधील भाजप महिला मोर्चाच्या कार्यकर्त्या स्नेहा वनकुद्रे यांच्यातर्फे शिबिर घेण्यात आले. सोलापूर महानगरपालिका शाळा क्र. तीन मध्ये घेण्यात आलेल्या शिबिराचे उद्घाटन भाजपचे शहर उपाध्यक्ष मोहन डांगरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी नगरसेवक अमर पुदाले, नगरसेविका गीता गवई, संयोजिका स्नेहा वनकुद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. वय वर्षे ११ ते ६५ वर्षांपर्यंतच्या मुली व महिलांना तसेच ६५ वर्षांवरील जेष्ठ नागरिक महिला व पुरुषांना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून एसटी प्रवासाच्या तिकिटामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येते. याकरिता शासनाकडून एनसीएमसी कार्ड मिळते. हे कार्ड ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिला, मुलींना त्यांच्या घराजवळच उपलब्ध व्हावे याकरिता या शिबिराचे आयोजन होते. मोहन डांगरे यांनी प्रास्ताविक केले. वैशाली काळे यांनी सूत्रसंचालन तर संयोजिका स्नेहा वनकुद्रे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी वैभव पाटील, सुदर्शन वनकुद्रे, गुणधर पांढरे, शशिकला पांढरे, रुपा कुताटे, श्वेता वनकुद्रे, सुयश वनकुद्रे आदी उपस्थित होते.

### विवाहितेने प्राशन केले सडा मारण्याचा रंग

**सोलापूर, दि. ११ जून-**

नवऱ्या बरोबरील तक्रारीत विवाहितेने सडा मारण्याचा पिवळा रंग पिल्याची घटना नवीन विडी घरकुल येथे आज सकाळी दहा वाजता घडली. अश्विनी नरेश म्हणता (वय २७)असे त्या विवाहितेचे नाव आहे. रंग पिल्यावर त्रास होऊ लागल्याने तिला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात भाऊ गणेश म्हंता याने दाखल केले.

# पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून अहवाल द्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. ११ जून -**

माढा तालुक्यातील गार अकोले परिसरात झालेल्या अतिवृष्टी व वादळी पावसामुळे केळी पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी शेतात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून झालेल्या नुकसानीची माहिती जाणून घेतली. कृषी तसेच महसूल विभागाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ पूर्ण करून अहवाल सादर करावेत, असे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी किसन देवकते, प्रकाश केचे, धनंजय वाळेकर, वामन देवकाते व अशोक केचे यांच्या शेतातील नुकसानीची पाहणी केली. त्यांच्याशी संवाद साधून धीर दिला. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, तालुका कृषी अधिकारी चंदन, नायब तहसिलदार विजय कवडे, नायब तहसिलदार अनिल ठोंबरे, उपविभागीय कृषी अधिकारी संजय वाकडे, मंडल अधिकारी भगवान मुंडे, तलाठी बाळासाहेब कांबळे, वैभव पाटील, बोऱ्हाडे तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी संबंधित कृषी अधिकारी व महसूल विभागाला तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे निर्देश दिले. अतिवृष्टी व वादळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची योग्य नोंद घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. शेतकऱ्यांनी धीराने परिस्थितीला सामोरे जावे. प्रशासनाकडून आवश्यक ती मदत मिळेल, असा विश्वास दिला. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी ८० टक्के पंचनामे पूर्ण झाले असून उर्वरित पंचनामे तातडीने करण्यात येतील. जिल्ह्यात प्राथमिक माहितीनुसार सुमारे ६ हजार हेक्टरवरील पिकाचे नुकसान झाल्याचे सांगितले.

**जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून फळबागांच्या नुकसानीची पाहणी, शेतकऱ्यांशी संवाद**



**तातडीने नुकसानभरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी**

अतिवृष्टी व वादळी पावसामुळे केळी व डाळिंब पिकांचे मोठे नुकसान झाले. या परिसरात ३०० ते ४०० एकरांवर केळीची लागवड झाली आहे. प्रत्येकी एकरी २.५० ते ३ लाख रुपये खर्च झाला. अतिवृष्टी व वादळी पावसामुळे फळबागांचे १०० टक्के नुकसान झाले असून शेतकऱ्यांनी तातडीने नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी केली आहे.

## रुग्णसेवा अधिक सक्षम करा : डॉ. कोपूरवाड



**जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची करजगी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट व पाहणी**

**ग्रामीण रुग्णालयामुळे आरोग्य सेवांना बळकटी : कोपूरवाड**

करजगीसह परिसरातील ग्रामीण नागरिकांना आधुनिक व सुलभ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रशासन कटिबद्ध आहे. ग्रामीण रुग्णालयाच्या उभारणीमुळे या भागातील आरोग्य सेवांना नवी दिशा मिळणार असल्याचा विश्वास यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी व्यक्त केला.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ जून -**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी जिल्हा परिषद सदस्य ॲड. विकास बुळा यांच्यासमवेत प्राथमिक आरोग्य केंद्र, करजगी ता. अक्कलकोट येथे भेट देत आरोग्य सेवांचा आढावा घेतला. तसेच अधिकाऱ्यांना रुग्णसेवा अधिक सक्षम करण्याच्या सूचना दिल्या.

अक्कलकोट तालुक्यातील करजगी परिसरात ग्रामीण आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणाला वेग आला आहे. प्रस्तावित ग्राम ीण रुग्णालय उभारणीच्या दृष्टीने जिल्हा आरोग्य यंत्रणेने स्थळ पाहणी केली.

यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत व बाह्य परिसराची पाहणी केली. करजगी येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर झाल्याने प्रस्तावित जागेची पाहणी करून भविष्यातील आरोग्य सुविधा अधिक परिणामकारकपणे उभारण्यासाठी आवश्यक बाबींवर चर्चा केली. जिल्हा परिषद सदस्य ॲड. विकास बुळा यांनी रुग्णालयाच्या नियोजनासंदर्भात काही महत्त्वपूर्ण सूचना करत स्थानिक नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हाव्यात यावर भर दिला.

डॉ. कोपूरवाड यांनी आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेतली. कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेत त्यावर उपाययोजनाबाबत मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक जलद, आणि प्रभावी आरोग्य सेवा मिळण्यासाठी दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या.

याप्रसंगी सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. मोहन शेगर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विन करजखेडे, सरपंच विवेकानंद उंबरजे, उपसरपंच शब्बीर पटेल, वैद्यकीय अधिकारी डॉ. समीर पटेल, डॉ. मुस्तकीम काझी तसेच ग्रामपंचायतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## उत्तम व्यवस्थापन कौशल्याबद्दल डॉ. यशवंत कुलकर्णी यांचा रिपाइंतर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ११ जून -**

श्रीपूर ता. माळशिरस येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी कार्यकारी संचालक म्हणून कारखान्याची धुरा हाती घेवून एक तपापेक्षा (१२ वर्ष) कार्यकाळ लोटला.

या काळात त्यांनी व्यवस्थापन कौशल्याच्या जोरावर कारखान्याची प्रगती करत कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन १० हजार टनावर नेली. सातत्याने एफआरपी पेक्षा जास्त दर देणे, डिस्टलरी क्षमता ९० हजार लिटर प्रतिदिन करणे, या बरोबरच कोवीड काळात ऑक्सीजन निर्मिती, वृक्षारोपण आदी सामाजिक उपक्रम राबविणे या कार्याची दखल घेवून कारखान्यास विविध पुरस्कार मिळवून दिले. याबरोबरच डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या या कार्याची दखल घेवून विविध संस्थांनी त्यांचा गौरव केला. या अनुषंगाने त्यांना नुकताच ग्रीन वर्ल्डचा रिअल अचिव्हर्स पुरस्कार मिळाला. डॉ. यशवंत कुलकर्णी यांचे कार्य संस्था व इतरांसाठी आदर्श असल्याने त्यांचा रिपाइंच्या वतीने ज्ञानेश्वर सुरवसे, शैलेश साबळे, महादेव सावंत, सागर भोसले यांचे वतीने पुणेरी पगडी, शाल व बुके देवून सत्कार करण्यात आला.



## निवृत्तीनंतर आर्वे यांनी घेतली कायद्याची पदवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जून -**

सहायक पोलिस निरीक्षक पदावरून निवृत्त दीपक आर्वे यांनी एल.एल.बी.ची पदवी संपादन केली आहे. निवृत्तीनंतर त्यांनी दयानंद विधी महाविद्यालयात प्रवेश केला. अंतिम परीक्षेत त्यांनी प्रथम श्रेणीत येण्याचा मान मिळवला. आता वकिली व्यवसायाच्या माध्यमातून गोरगरीब, गरजू पक्षकारांकडून एक रुपया फी न घेता त्यांना मोफत कायदेशील सल्ला देणार असल्याचे आर्वे यांनी सांगितले. पोलिस खात्यातील अधिकाऱ्यांनी आणि वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांचे त्यांच्या या यशाचे कौतुक केले.



## बजरंग दल कार्यकर्त्यांवर अत्याचाराविरोधात विहिंप, बजरंग दल आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ११ जून -**

अक्कलकोट तालुक्यातील बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांवर सातत्याने पोलिसी, राजकीय तसेच जिहादी अत्याचाराच्या निषेधार्थ विश्व हिंदू परिषद, बजरंग दल सोलापूर जिल्ह्याच्या वतीने अक्कलकोट पोलिस ठाण्यावर धडक मोर्चा काढण्यात आला. उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार यांनी हल्ला करणाऱ्या जिहादी घटकांवर अटकेची कार्यवाही लवकरात लवकर करू, अशी ग्वाही दिली.

दि.३१ मे रोजी तालुक्यातील सांगवी(बुद्रुक) येथे कोळेकरवाडी येथील सुनिल शिंदे व रोहन पालकर या दोन बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांवर प्राणघातक हल्ला झाला होता. यासंदर्भात संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत अक्कलकोट पोलिस प्रशासनाने दिरंगाई केली. याबद्दल हिंदुत्ववादी संघटनांमध्ये तीव्र संताप आहे. राजकीय दबावापोटी पोलिस गुन्हे दाखल करत नाहीत आणि अटकेची कारवाई करत नाही, याचा निषेध केला जात आहे.

बजरंग दलाचे कार्यकर्ते पुण्यातील शौर्य प्रशिक्षण वर्गावरुन गावाकडे जात असताना सांगवी (बुद्रुक) येथे १६ ते १७ जिहाद्यांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. पोलिसांनी या घटनेची खबर घेतली ना फिर्याद दाखल करून घेतली. उलट अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना दम व उपदेशाचे डोस दिले. विहिंप बजरंग दलाचे काम कशाला करता, असा सवाल केला. दि. ३१ मे रोजी घडलेल्या घटनेनंतर चार दिवसांनी गुन्हे दाखल झाले. त्यानंतर या टोळीचा म्होरक्या सद्दाम शेरीकर व त्याच्या अन्य प्रमुख साथीदारांवर अटकेची कारवाई होत नसल्याचा जाब विचारण्यासाठी बजरंग दलाचे प्रांत संयोजक नितीन महाजन, विहिंप विभागमंत्री विजयकुमार पिसे, जिल्हा मंत्री जयदेव सुरवसे, बजरंग दल जिल्हा संयोजक अभय कुलथे, प्रखंड मंत्री मेजर बालाजी राजपूत व प्रखंड संयोजक मदन राठोड यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यावर धडक मोर्चा काढण्यात आला.

ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिर येथे महाआरती करुन धडक मोर्चास प्रारंभ झाला. प्राणघातक हल्ल्यानंतर सात दिवस उलटल्यानंतरही पोलिसांकडून जिहाद्यांच्या मुसक्या आवळण्याचे काम झाले नाही. याबद्दल बजरंग दल प्रांत संयोजक नितीन महाजन यांनी अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यावर उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार यांना जाब विचारला. तसेच तात्काळ अटकेची कारवाई करा, अन्यथा अशा जिहाद्यांचा बंदोबस्त करावा लागेल, असा इशारा दिला.या दरम्यान सुमारे दीड तास पोलिस ठाण्याच्या गेटवर श्रीराम भक्त व बजरंगी यांनी भजन, भक्तीगीते, देशभक्तीपर घोषणांनी परिसर दणणून सोडला. अक्कलकोट येथील धडक मोर्चात सिध्देश्वर गोकावी, रवि बोल्ली, चंद्रकांत कुलकर्णी, प्रवीण जिल्ला, अमित सारोळकर, अनिल कोळी, विश्वनाथ जवळगे, ॲड.गोविंद शिंदे, माणिक रेड्डी, अदित्य चिप्पा, प्रशांत गायकवाड, सागर सिध्दुल, नरेश सिध्दुल, दत्तात्रय कोंतम, प्रज्वल बासुतकर, अक्कलकोट प्रखंड मंत्री मेजर बालाजी राजपूत, बजरंग दल अक्कलकोट प्रखंडाचे संयोजक मदनकुमार राठोड, अक्कलकोटचे बजरंगी ऋषीकेश लोणारी, सहसंयोजक सुनिल पाटील, समर्थ अडवीतोटे, योगेश रेड्डी, परशुराम रेड्डी, दादा भोसले, प्रकाश मोरे, लखन अवटे, सुनिल शिंदे, रोहन पालकर, रावसाहेब मोरे, सूरज खरात, पवन चव्हाण, राजेश राठोड, समर्थ लवटे, राम चव्हाण, अभय वाले, शिवानंद कलशेट्टी, भालके, व्यंकट सलगरे, सिध्दाराम बडुरे, सिद्धाराम हिरेमठ या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह चपळगाव व बोरोटी येथील कार्यकर्ते सहभागी झाले होते.

दरम्यान विहिंप, बजरंग दल व ग्रामस्थांची बैठक प्रांत संयोजक नितीन महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत कोळेकरवाडी येथे झाली. ग्रामस्थांनी एकत्रित राहून जिहादी शक्तींना रोखले पाहिजे, असे आवाहन महाजन यांनी ग्रामस्थांना केले. विभाग मंत्री विजयकुमार पिसे, जिल्ह्याचे मंत्री जयदेव सुरवसे, जिल्हा सहमंत्री विष्णू जगताप, बापूसाहेब कदम, बाबू गिरगल, बजरंग दल जिल्हा संयोजक अभय कुलथे, अक्कलकोटचे प्रखंड मंत्री बालाजी राजपूत, बजरंग दलाचे संयोजक मदनकुमार राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक घेण्यात आली. बैठकीत दोन्ही बजरंगीच्या कुटुंबियांची वैयक्तिक भेट घेत त्यांना धीर देवून तुमच्या पाल्यांना नेटाने धर्मकार्य करु द्या, त्यांच्या पाठीमागे विश्व हिंदू परिषद व बजरंग दल खंबीरपणे उभा आहे, अशी ग्वाही महाजन यांनी दिली.

